?

फर्स्ट क्लास !

नापास !

पास !

आत्महत्त्या ! !

गोरेगावचा

एक विद्यार्थी

विद्यापीठ भ्रष्टाचाराला

जेव्हा

नाहक बळी पडतो !



साप्ताहिक

# माणूस

शनिवार । २० जुलै १९७४

एक रुपया


आम्ही पेपरात
चांगली उत्तरं का म्हणून
लिहावीत? बांद्रा
गटारांत पडायला?


जय जवान!
जय किस्सान!!
जय प्रकाश!!!


(वट)वटहुकुम*
इतरांना विजयी करण्यासाठी भरपूर क्रिकेट खेळावे.
कामात फार हुषारी दाखवू नये. (पगार वाढीचे भय संभवते.)
zzzzz
जोपर्यंत दारूची बाटली परवडतीय तोपर्यंत दुधाच्या बाटलीच्या किंमती बद्दल तक्रार करू नये!
(चोट कलम.)
श्यामजोशी—

# साप्ताहिक माणूस

| संपादक | साहाय्यक | शनिवार | वर्ष : चौदावे |
| --- | --- | --- | --- |
| श्री. ग. माजगावकर | दिलीप माजगावकर | २० जुलै | अंक : आठवा |
| | सौ. निर्मला पुरंदरे | १९७४ | किंमत : एक रुपया |


# मुंबई (भ्रष्टाचार) विद्यापीठ

## स्फोट पहिला : प्रतिनिधी

ह्या महिन्याच्या सुरुवातीला मुंबईत पाऊस कोसळायला लागला. आजतागायत ते थैमान सुरू आहे. पावसाच्या ह्या न भूतो झंझावाताने सर्वसामान्य मुंबईकराचे जीवन पार विस्कळीत करून टाकले. रेल्वे व्यवस्था कोलमडली. ऑफीसला जाऊन परत घरी येणे हे एक कठीण काम होऊन बसले. साधारणतः दोन-तीन तास दिवसाकाठी प्रवास करणारा, रोजी चार-पाच तास प्रवास करायच्या तयारीने बाहेर पडू लागला. मुंबईतल्या झोपडपट्ट्यातून जीवन कठणाऱ्या हजारो-लाखो मुंबईकरांना पावसाळ्यातला ताप नकोसा होतो. यंदा तर पावसाने त्यांना जास्तच झोडपून काढले. सरकारी यंत्रणा त्यांना एरवी पिळीत असतेच. महागाईचा राक्षस त्याच्या जोडीला. भ्रष्टाचार, अनैतिकता आहेच. ह्या जखमावर पावसाचे पाणी. जखमा चिघळायला अर्थातच भरपूर वाव. तशा त्या चिघळल्याही. चर्चगेट, पार्ला, भांडूप, विक्रोळी वगैरे ठिकाणी, ह्या चिघळीतून थोडा भडकाही उडाला ! झोपडपट्ट्या, सखल भागातली घरे ह्यातून सालाबादप्रमाणे पाणी शिरले. यंदा थोडे जास्तच. घरे कोसळली, आगी लागल्या. थोड्या जास्त प्रमाणात.

दरवर्षी पावसाळ्यात हे सारे घडतेच. यंदा थोड्या जादा प्रमाणात. मुंबईची ही वार्षिक डोकेदुखीच आहे बेबंद वाढीमुळे, बॅक-बे व इतरत्रच्या गगनचुंबी इमारती पावसाचे पाणी साठून राहायला साहाय्यभूतच होत असल्यामुळे, ही डोकेदुखी दरवर्षी वाढतच जाणार आहे. तेव्हा, वर मी जे काही म्हटले त्यामुळे हळहळ वाटली तरी फारसे आश्चर्य वाटले नाही. कारण मुंबईची अशी अनिबंध वाढ होऊ द्यायला अनेकांचा हातभार लागला आहे. त्यात अनेकांचे उखळ पांढरे झाले आहे. त्याची संपूर्ण चौकशी करायचे कुणी मनात आणले तर त्या प्रकरणापुढे वॉटरगेट प्रकरण फिके पडेल असे मला वाटते. पण ह्या पावसाने आणखीही एका प्रकरणावर लख्ख प्रकाश पडायला मदत होईल असे मात्र मला जरूर वाटते. झोपडपट्ट्यातून पावसाचे गुडघाभर पाणी झाले तर ती घटना नेहमीच घडणारी वाटते. त्याचे फारसे आश्चर्य वाटत नाही. पण परवाच्या पावसात मुंबई विद्यापीठाच्या रजिस्ट्रारच्या कार्यालयात पाणी गळले. अर्ध्या इंची नळातून गळावे एवढ्या मोठ्या वेगाने. कार्यालयात गुडघा गुडघा पाणी साचले. टेबला-कपाटातून पाणी घुसले. फायली साफ ओल्या झाल्या. विद्यापीठाच्या लायब्ररीतून हिटर्स आणून ह्या फायली सुकवण्याचा उद्योग नतर तीन-चार दिवस झाला. एवढे होऊनही काही कागदपत्र खराब झालेच. विद्यापीठात हा प्रकार पावसामुळे घडला, म्हणून आश्चर्य.

हे आश्चर्य आणखी द्विगुणित होते ते, गेल्यावर्षीच ह्या कार्यालयाच्या वॉटर प्रुफिंगवर तेवीस-चोवीस हजार रुपये खर्च झाल्याचे कळल्यावर. हे वॉटर प्रुफिंग (पाणी गळू नये म्हणून छताची डागडुजी !) सहजी माझ्या एका मित्राला दाखवले. हा मित्र ह्या कामातला जाणकार. अशी कामे करणारा. त्याने एकूण कामाचे स्वरूप, त्यावर झालेला खर्च वगैरे ऐकून कपाळावर हात मारून घेतला. त्याच्या मते, 'ह्या वॉटरप्रुफिंगचा खर्च सध्याची भावपातळी लक्षात घेताही, आठ-दहा हजारावर जाऊ नये...' द्विगुणित झालेले आश्चर्य, मित्राच्या ह्या उद्गारांनी आणखीनच वाढले. आठ-दहा हजारात होऊ शकेल (असे 'एक्स्पर्ट' मित्राला वाटते !) अशा कामाला वीस-पचवीस हजार रुपये लागले आणि तरीही विद्यापीठाच्या कागदपत्राची वाट लागलीच. माझ्या माहितीतल्या एका गृहस्थांचे घर आहे. जुन्या मांडणीचे साधे कौलारू. पण बरेच मोठे. किमान शंभरएक वर्षांचे जुने. तीन-चार वर्षांपूर्वी पावसाळ्यात ते अतोनात गळले. सात-आठशे रुपयात त्या डागडुजीचा बंदोबस्त त्यावेळी केला गेला. आज तीन वर्षात, त्यानतर त्या घरावर वॉटर प्रुफिंगसाठी एका पैचाही खर्च झालेला नाही. आणि तरीही, अगदी यंदाच्या बेफाट पावसातदेखील, एक टिपूसही तिथे पाण्याचा गळला नाही.

पण विद्यापीठाच्या इमारतीच्या बाबतीत सारेच काही न्यारे वाटते. तिथे हे डागडुजीचे काम दरसाल चालते. एवढे सततच 'मेंटेनन्स' असूनदेखील यंदा तिथे पावसाने एवढा कहर उडवून द्यावा म्हणजे कुठेतरी, काही तरी मुळातच गाडे बिनसलेले आहे असे वाटते. सिनेटचे एक सदस्य डॉ. बागळे ह्यांनी ह्या सतत चालत आलेल्या दुरुस्त्याची आकडेवारीच दिलेली आहे. (संदर्भ : त्यांचे कुलपतींना मार्चमधील पत्र !) ही आकडेवारी इथे उद्धृत करायला हवी असे वाटते. ...स्वातंत्र्यपूर्व काळात, म्हणजे, १९४६ मध्ये संपूर्ण वॉटर-प्रुफिंगच्या कामावर केवळ अकराशे रुपये खर्च झाले होते. त्याच्या नतर १९५७-५८ पासून नंतर झालेला खर्च असा–

| सन | एकूण खर्च रु. | चौ. फुटाचा दर रु. | काम केलेल्या कंपनीचे नाव |
|---|---|---|---|
| १९४६ | १११२ | | |
| १९५७ | ५६३५ | १ | शालीमार टार प्रॉडक्टस |
| १९६६ | ५६५०० व २१००० | १० | सोराबजी मिस्त्री |
| १९७१ | १८२६६ (माटुंगा कॅम्प्स) | २·४० | इंडिया वॉटर प्रूफिंग |
| | ४८५०० (रेक्लेमेशन व इतर) | १२·५० | सोराबजी मिस्त्री |
| १९७२ | २९८९६ व ७५,००० | १२·५० | ल्यूका प्रायव्हेट क. |

१९७३–७४ मध्ये झालेल्या कामाची आकडेवारी उपलब्ध नाही, व वर उद्धृत केलेली आकडेवारीही सपूर्ण नाही. तथापी, केवळ १०–१२ वर्षात वॉटरप्रूफिंगच्या कामाचे भाव दसपटीने वाढले आहेत हे पटत नाही. १९६६–६७ मध्ये हा भाव, विद्यापीठाच्या लाडक्या कत्राटदाराला १० रु. चौरस मीटरचा मिळाला आहे. गंमत अशी ही की, १९७१ मध्ये, म्हणजे पुढे पाच वर्षांनी, बाहेरच्या दुसऱ्या कॉन्ट्रॅक्टरला मात्र तोच भाव २·४० चा मिळाला आहे. त्याच वर्षात, तशाच कामाला सोराबजी मिस्त्री ह्या लाडक्या कत्राटदाराला पुन्हा १२॥ रु. चा भाव मिळाला आहे. ह्याच प्रकार गतवर्षीही झाला असावा.

ह्यातही पुढे ग्यानबाची मेख आहे. सोराबजी मिस्त्री किंवा ल्यूका प्रा. लि. वगैरे कत्राटदारानी पाऊण-पाऊण लाखाची कामे झाल्यानतर, वर शिवाय पेंटिंग, चुनामचा हात, काही ठिकाणी प्लॅस्टरिंगची दुरूस्ती वगैरेवर दीड दीड लाखाचा खर्च झाला आहे. म्हणजे, गळती थांबविण्यासाठी, सुमारे दोन-अडीच लाखाचा खर्च, १९६६–६७ नतर दर दोन-तीन वर्षांनी होत आला असावा असे दिसते. उदार मतांप्रमाणे व्हावयाच्या खर्चाच्या दुप्पट-तिप्पट खर्च होऊन सुद्धा विद्यापीठाच्या इमारतीची गळती मात्र आहे तशीच आहे. मुळात हा खर्चच सशयास्पद आहे. तो होऊनही गळती कायम. तेव्हा एकूण प्रकार फारच घृणास्पद ठरतो. गमत ही की, ह्या अवाजवी खर्चावर व कदाचित त्यात भ्रष्टाचार झाला असण्याची शक्यता असण्यावर, सिनेट सदस्य डॉ. वागळे ह्यांनी केव्हाच प्रकाशझोत टाकला आहे, त्यासबधात, नि पक्ष. चौकशी व्हावी ही मागणी केली आहे. डॉ. वागळे ह्याना अनेक प्राध्यापकाचा, प्राचार्यांचा पाठिंबा असला तरी, सिनेटमध्ये त्यांच्या पाठीशी पुरेसे लोक नाहीत. असे असले तरी विद्यापीठ कर्मचारी सघाने डॉ. वागळयांच्या पाठिशी आपली ताकद उभी केली आहे. कुठल्याही विद्यार्थी संघटनेचा मुंबईत तसा जोर नाही. त्याची अनेक कारणे आहेत. तरीसुद्धा जी काही तुटपुजी ताकद ह्या सस्थापाशी आहे ती घेऊन ह्या सघटना आज ह्या लढ्यात उतरू पाहात आहेत. आज तरी ह्यात प्रामुख्याने उल्लेख केला पाहिजे तो 'युक्राद 'चा. काही समाजवादी युवकांचा ! ह्या सर्वांनी डॉ. वागळयाची चौकशीची मागणी उचलून धरली आहे. आज तीन-चार महिन्यांपासून ही मागणी मान्य व्हावी यासाठी डॉ. वागळे व अन्य धडपडत आहेत. कुलपतीना (राज्यपालाना !) भले मोठे पत्र पाठवून झाले आहे. कुलगुरू, शिक्षणमत्री, मुख्यमत्री, केंद्रीय शिक्षण मत्री, युनिव्हर्सिटी ग्रँट्स कमिशन...वगैरे सर्वांना ह्या बाबतीत पत्रे लिहून झाली आहेत. पण कुठूनही काही पत्तोत्तरेच नाहीत. सगळयांची आपली आळी मिळी गूपचिळी ! आता ही मंडळी आदोलनाकडे वळू पहात आहे. मुबई विद्यापिठातल्या भ्रष्टाचाराबरोबरच, स्वतःच्या मागण्यांचे पत्रक घेऊन विद्यापीठ कर्मचारी सघ आखाड्यात उतरू पाहात आहे....विद्यार्थी आपल्या सघटनांद्वारे एक युवक आंदोलन म्हणून ह्या प्रश्नाची तड लावू पाहात.... मुंबईत जयप्रकाशाच्या आगमनाच्या दिवशी, जेपीच्या भ्रष्टाचार विरोधी आंदोलनाशी इथल्या भ्रष्टाचारविरोधी हालचालीची सांगड कशी घालता येईल ते पहात आहेत....तर सनदशीर मार्गही चोखाळता यावेत, म्हणून, डॉ. वागळे आमदारखासदाराना, सभापतीना, राष्ट्रपतीना, शिक्षणमत्र्यांना आपल्या तक्रारीच्या प्रती पाठवून विधानसभा, लोकसभेच्या व्यासपीठावरूनही ह्या प्रश्नाना वाचा फोडण्याचा प्रयत्न करीत आहेत....

डॉ. वागळयांशी मी स्वत: ह्या प्रश्नावर सविस्तर बोललो. तारीख, वार व इतर अनेक कागदोपत्री पुरावे उपलब्ध करून डॉक्टरांनी, विद्यापीठातल्या भ्रष्टाचारांच्या असंख्य भानगडीवर लख्ख प्रकाशझोत टाकला आहे. ह्या प्रकाशझोतात, एवढी काळीकुट्ट प्रकरणे उजेडात आली आहेत, व तीही गेल्या १०–१२ वर्षांतलीच की त्यामुळे ११८ वर्षे दिमाखात वावरत असणाऱ्या राजाभाई टॉवरची शान पार धुळीला मिळण्याची शक्यता आहे. ११८ वर्षांच्या दैदीप्यमान कारकिर्दीत मुबई विद्यापीठाने अनेक राष्ट्रीय नेते देशाला दिले. विद्वज्जन दिले. तत्रज्ञ दिले. शास्त्रज्ञ दिले. पण गेल्या १०–१२ वर्षात मुबई विश्वविद्यालयाचा नूर बदलत गेला आहे. विद्यापीठाच्या अखत्यारीत, गेल्या १० वर्षात, भ्रष्टाचार आस्ते आस्ते वाढत गेला आहे. नुसत्या वेगवेगळ इमारतींच्या बाधकामांवर, त्यांच्या दुरूस्त्यांवर गेल्या १० वर्षात दोन ते सव्वादोन कोटीच्यावर खर्च झाला आहे. तंत्रज्ञांच्या मते व आजच्या महागाईच्या काळातला बांधकामाचा दर बघता, ह्या दोन-सव्वादोन कोटी रुपयात, किमान पन्नास ते पंचाहत्तर लाखापर्यंतची रक्कम ज्यादा खर्च झाली आहे. व ती बहुधा काळया पैशांच्याच स्वरुपात विद्यापीठ अधिकारी व कॉंट्रॅक्टर्स व अन्य मंडळी ह्यांच्याच खिशात गेलेली असावी. विद्यापीठाचा पैसा ह्या एका अर्थी, जनतेचाच पैसा. त्याचा असा अपहार झाला, की एकूण गैरप्रकाराचे गाभीर्य अधिकच वाढते. विद्यापीठातून शिक्षण घेणारे विद्यार्थी हे उद्याचे जबाबदार नागरिक. हे गैरव्यवहार, विद्यापीठ अधिकाऱ्यांची राहाणी, वगैरे साऱ्या गोष्टी त्यांच्या नजरेतून सुटणे शक्यच नाही. तेव्हा ही मडळी उद्या विद्यापीठातून बाहेर पडताना हेच भ्रष्टाचाराचे धडे घेऊन बाहेर पडणार. विद्यापीठातून बोकाळणाऱ्या भ्रष्टाचाराचे हे सर्वात वाईट अंग आहे.

ज्या विद्यापीठाने मान्यवर व्यक्ती देशाला दिल्या, तेच विद्यापीठ जर उद्याचे भ्रष्ट नागरिक तयार करणार असेल, तर त्याहून मोठा दैवदुर्विलास कोणता ? ह्याच दृष्टीने ह्या एकूण प्रकाराची त्वरित चौकशी होणे आवश्यक होते. विद्यापीठाचा कारभार सीतेच्या चारित्र्याएवढा निष्कलंक हवा. थोड्या संशयाने देखील अग्नि-दिव्याला तयार होण्याचे सामर्थ्य विद्यापीठाकडे हवे, पण इथे, विद्यापीठावर वारंवार हल्ले होत असूनही, विद्यापीठाच्या चारित्र्याचे पार धिंडवडे निघत असूनही, विद्यापीठातल्या अधिकारी व्यक्ती तिकडे लक्षही द्यायला तयार नाहीत. चौकशी करण्यासाठी समिती नेमण्याचे तर सोडूनच द्या, पण जाहीर आरोपाबाबत साधे जाहीर खुलासेही आजतागायत विद्यापीठाने केलेले नाहीत !

म्हणूनच आज पुन्हा एकदा ह्या प्रकरणाला वाचा फोडणे आवश्यक ठरले आहे. विद्यापीठातल्या एकेका प्रकारावर तपशील-वार माहिती ह्या मालिकेतून मी देणार आहेच; पण आज एवढेच सांगतो, की शासनाचे हात देखील ह्या प्रकरणातून बरबटलेले असावेत असा संशय येऊ लागला आहे. आणि वेळीच जर शासनाने विद्यापीठातल्या सावळ्या गोंधळाची संपूर्ण निःपक्षपाती चौकशी करून सर्व संबंधित अपराध्यांना ठेचून काढले नाही तर, हा संशय बळावत जाईल. विद्यापीठ व शासन ह्यांना एका बाजूला लेखून, भ्रष्टाचार विरोधी आंदोलन मुंबईत जोर धरील. आज मुंबईचा विद्यार्थी एकूण प्रकरणात काहीही रस घेत नाही असे चित्र आहे. पण आंदोलनाच्या ओघात, तोही विद्यार्थी आंदोलनात सहभागी होईल; व संपूर्ण विद्यापीठ ढवळून निघेल. कारण हा विद्यार्थीही विद्यापीठातल्या ह्या भ्रष्टाचाराच्या सुळसुळाटाने कावून गेला आहे. त्यात त्याचेही अनेकदा नुकसान होत आहे. काही आवडत्या व चांगल्या प्राध्यापकांना, ह्या विद्यार्थ्यांना, अधिकाऱ्यांच्या राजकारणा-मुळे, भ्रष्टाचारांमुळे मुकावे लागते. कित्येक विद्यार्थ्यांना नापास व्हावे लागते. तर, वशिल्याची तट्टे पुढे असल्यामुळे कित्येकांना चांगले गुण असूनही डॉक्टर्स, इंजिनियरींग वगैरे शाखामधून प्रवेश मिळू शकत नाही. ह्या साऱ्याचे कारण म्हणजे परीक्षा विभागातून विद्यापीठातून चालू असलेला भ्रष्टाचार !

परवाच्या पावसात, ह्या परीक्षेच्या भ्रष्टाचाराला देखील वाचा फोडील असा एक प्रकार घडून आला. माटुंग्याला, हजारो उत्तर पत्रिकांचे गठ्ठे वाहत्या पाण्याबरोबर वाहताना दिसून आले. हे गठ्ठे आले कसे, कुठून ह्याबाबत काहीही खुलासा विद्यापीठाने केलेला नाही. विद्यापीठाच्या काही कर्मचाऱ्यांच्या व प्राध्यापकांच्या मते, 'हे काही नवल नाही. उत्तर पत्रिकांचे असे असंख्य गठ्ठे बाहेर सापडणारच. त्याशिवाय, विद्यापीठाच्या अनेक परीक्षांचे (विशेषतः इंटर सायन्स, बी. एस. सी, बी. कॉम)पेपर्स बाहेरून लिहून घेऊन, परीक्षकाच्या घरी मूळ पेपरबरोबर बदलले जाऊच शकतील कसे ?...

'...मिस्टर तुम्हाला काही कल्पना नसेल. पण तुमचा मुलगा मॅट्रीक झाला व पुढे तो 'ढ' असूनही त्याला डॉक्टर बनवायची तुमची इच्छा असली, आणि तुमच्याकडे लाख-दोन लाख असले तर ते सहज शक्य आहे. आमच्याकडे अशा 'पॅकेज डील'ची सोय आहे. मॅट्रीक होताच तुम्ही फी सोडून शिवाय लाख दीड लाख भरायचे. सात वर्षांनी तुमचा मुलगा डॉक्टर होऊन बाहेर पडेल. मग त्याने अभ्यास केला नाही तरी काही बिघडत नाही. क्लासेस अटेन्ड केले नाहीत तरी चालतं. प्रॅक्टिकल्स बुडवली असली तरी काही नापासाची भीती नाही. थोडे जास्त पैसे मोजले की, क्लासही तुम्हास ईझिली मिळेल.

अशीच एक दुसरी कथाही ऐकायला मिळाली. गोरेगावच्या यशवंत क्लासेसच्या चपारनेकरांचे चिरंजीव F. E. ला नापास झाले. मुलगा हुशार होता. फर्स्टक्लास अपेक्षित होता. पण नापास म्हणून जाहीर केला गेला. मुलाने विद्यापीठाकडे धाव घेतली. मार्क तपासून पाहण्याची विनंती केली. पण तरीही 'नापास' हा शेरा कायम. मुलगा जाम निराश झाला. आपण 'नापास' झालो हे त्याला पटेचना. त्याने हाय खाऊन आत्महत्या केली. आत्महत्येनंतर ८ दिवसांनी मुलाच्या घरी पत्र गेले—तो पास असल्याने ! श्री. चपारनेकर वैतागले. तक्रारी अर्ज केले. पण कशाचा काही फायदा झाला नाही. निदान आजतागायत तरी ! हे सारे झाले कसे ? विद्यापीठातल्या एका कर्मचाऱ्याच्या म्हणण्यानुसार, '...विद्यापीठ परीक्षांना बसलेल्या 'आपल्या खास' विद्यार्थ्यांचे पेपर्स गोळा केले जातात. उत्तर पत्रिकेचा वरचा कागद, वेगळा केला जातो. ह्याच कागदावर, विद्यार्थ्यांनी परीक्षा क्रमांक व इतर माहिती असते. दुसऱ्या हुशार गणल्या गेलेल्या विद्यार्थ्यांचे पेपर्सही असेच जमवले जातात. त्यांच्या पेपर्सचा देखील वरचा कागद काढला जातो. मग 'आपल्या खास' विद्यार्थ्यांच्या उत्तर पत्रिकांची अदलाबदल होते. वरचे विद्यार्थ्यांची माहिती असणारे कागद इकडचे तिकडे डकवले जातात. 'खास' विद्यार्थी पहिल्या श्रेणीत उत्तीर्ण होतो; तर हुशार विद्यार्थी नापास तरी किंवा तिसऱ्या श्रेणीत तरी ! चपानेरकरच्या बाबतीतही असेच काहीसे घडले असावे...'

परीक्षांच्या बाबतीतला हा भ्रष्टाचार जास्तच उद्वेगजनक आहे. परीक्षा विभागातल्या मंडळींच्या बदल्या विद्यापीठाच्या साऱ्या नियमांना धाब्यावर बसवून वीस-वीस वर्षे होत नाहीत. एकाच खात्यात ही मंडळी आज २५-२५ वर्षे आहेत आणि साध्या ८००–१००० पगाराच्या जागावरील ह्यातली काही मंडळी पार्ले-चर्चगेट प्रवास येता जाता टॅक्सीशिवाय किंवा खाजगी मोटारीशिवाय करीत नाहीत. ह्याही बाबतीत सुस्पष्ट आरोप, विद्यार्थी व डॉ. वागळ्यां-सारखे काही लोक करीत आहेत. पण विद्यापीठ त्यावरही मूग गिळूनच आहे...ह्या क्षेत्रातला लाचलुचपतीचा, भ्रष्टाचाराचा आकडा पाऊण कोटीच्या घरातला आहे...

ह्याखेरीज, विद्यापीठ प्रकाशन, छापखाना आहे; गाड्या आहेत, इतर मेंटेनन्स आहेत, तिथलेही आकडे आहेत...

डॉ. वागळे, इतर प्राध्यापक, काही सामाजिक कार्यकर्ते व विद्या-पीठाचे हितचिंतक ह्यांचा तर स्पष्टच आरोप आहे की, 'प्रा. डोंगर-केरी इथे असेपर्यंत, मुंबई विद्यापीठ 'विद्यापीठ' या संज्ञेला पात्र होते. ते गेल्यावर सध्याचे रजिस्ट्रार चिदम्बरन यांना मुक्तद्वार मिळाले. गजेंद्रगडकर कुलगुरू असताना, त्याच्या स्टेटसमुळे विद्या-पीठाला काही तरी स्टेटस शिल्लक होते. पण टोपे आल्यापासून मुंबई विद्यापीठ हे विद्यापीठ न राहाता, राजकारणाचा, भ्रष्टाचाराचा अड्डा बनले आहे आणि चिदम्बरन हे त्याचे एकमेव कारण आहे...'

एकंदरीत मुंबई विद्यापीठातला भ्रष्टाचार आणि रजिस्ट्रार ह्यांचा अन्योन्य संबंध लावला जात आहे त्याचा नैसर्गिक परिपाक म्हणजे 'चिदम्बरन हटाव'ची नव्या शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीला उठलेली घोषणा ! जयप्रकाशजींचा सल्ला आणि आशीर्वाद लाभला तर वातावरण चांगलेच तापण्याची शक्यता आहे. □

**पुढील अंकी : स्फोट दुसरा**

# स्वदेशी आंदोलन पुन्हा पेटवावयास नको काय ?

डॉ. नरेंद्र दाभोळकर

तलवारीपेक्षाही समर्थपणे आणि अक्कलहुशारीने ज्यांनी तागडी तोलली अशा धूर्त ब्रिटिशानी या देशावर दीडशे वर्षे राज्य केले. या देशाच्या धमन्यातून वहाणारे समृद्धीचे प्रवाह सातासमुद्रापलीकडे आपल्या देशात नेले. पडुरोगाने पछाडलेल्या माणसाची दैन्यावस्था या देशाला प्राप्त झाली.

राजकीय आक्रमणाचा मुकाबला करणाऱ्या थोराना ब्रिटिशाच्या पोटातील या तेवढ्याच व्यापारी आक्रमणाचा विचार करावाच लागला. टिळक-सावरकरानी, म्हणूनच परदेशी मालाच्या होळ्या केल्या. स्वदेशीचा पुरस्कार केला. महात्मा गाधीनी तर त्याचे शास्त्र आणि शस्त्र बनवले.

इतिहासापासून धडा शिकण्याची आमची कुवत आधीच कमी. त्यात स्वराज्यप्राप्तीनतर यक्षिणीची काडी फिरल्याप्रमाणे देश बदलेल असे भाबडे आशावादी मन. दुसऱ्या महायुद्धानतर सर्वच जगात उसळलेली अधिकाधिक भोगलालसेची लाट. पैशाच्या आणि चैनीच्या वस्तूच्या आधारे जीवन आणि सस्कृती सपन्न करण्याची धडपड. या साऱ्यातून शेवटी काय प्रावतन वाढून ठेवलेले आहे ते सागण्यास कोण्या अर्थवेत्त्याची गरज नाही. रोजच्या रोज आपले पोट अधिकाधिक आवळणारा कोणताही सामान्य माणूस ते सागेल.

राजकारण आणि अर्थकारण ही (या समाजवादी देशात) मूठभरांची मक्तेदारी झाली आहे. आपण अगतिकपणे या साऱ्याचे साक्षीदार होण्यापलीकडे काय करू शकतो. देशातला सर्वसामान्य सुशिक्षित माणूसही आज या भावनेने वैफल्यग्रस्त दिसतो.

ही अगतिकता आपण समजू शकत असलो तरी समर्थनीय नक्कीच नाही. प्राप्त परिस्थिती समजावून घेणे, ती इतराना समजावून देणे आणि आपल्या कुवतीनुसार आपल्या मर्यादेत ती बदलण्यासाठी धडपडणे हे अत्यावश्यक नाही काय ?

माणूसचा अन्नस्वतत्रता सचलन हा असाच एक बाणेदार प्रयत्न होता. परदेशी भिकेच्या थाळीवर जगणार नाही, या मातीत उगवेल तेच खाऊ आणि ही भूमी खऱ्या अर्थाने सुजलाम् सुफलाम् होईल, साऱ्याना पुरून उरेल, इतकी बहुप्रसवा होईल, यासाठी धडपडू असा त्या आदोलनाचा गर्भितार्थ होता. हे सारे करावयाचे तर अर्थव्यवस्थेचा कणाच मुळी छोट्या छोट्या गावातल्या शेतीचा विकास आणि इतर प्रगती या भोवती बाधला जावयास हवा. (आज नेमके याच्या उलटे घडते आहे.) यासाठी ग्रामायन सकल्प ही माणूस परिवाराची पुढील पायरी ठरली.

खऱ्या अर्थाचे हे नवनिर्माण एका बाजूला अतिशय आवश्यक असतानाच त्याची दुसरी शहरी बाजूही महत्त्वाची आहे. विकास करावयाचा तर भाडवल पाहिजे. लोकाच्या खिशातून गेलेले पैसे व उत्पादकाचा नफा हा या देशातच या देशाच्या माणसाकडूनच अधिक सुयोग्य ठिकाणी गुतवला गेला पाहिजे. आज या दोन्ही बाजूनी अक्षरशः दिवाळखोरी वाजली आहे. सामान्य ग्राहकाचा विचार न करता छन छनचा आवाज ज्या मूठभराच्या खिशात घुमतो आहे त्याच्याच आवडीचे उत्पादन निघतेच परंतु त्याहीपेक्षा भयकर म्हणजे जे उत्पादन काही प्रमाणात चैनीचे आणि अनेक वेळा सामान्य माणसाच्या दैनदिन गरजेचे केले जाते त्यात फार मोठ्या प्रमाणावर परकीय भाडवल गुतलेले असते आणि स्वातत्र्याचा रौप्यमहोत्सव साजरा होऊन गेला तरी आमचे रक्त पिणाऱ्या या जळवाची तहान वाढतच आहे. आमचे नादान राज्यकर्ते याकडे सोयिस्करपणे दुर्लक्ष करतात हे एक वेळ समजू शकतो. परतु जो स्वतःला राष्ट्रप्रेमी म्हणवतो, जागरुक म्हणवतो, बाजारपेठेची मागणी अनेक अंशी ज्याच्या हातात आहे तो सुशिक्षित ग्राहकही याचा काहीच विचार कसा करीत नाही ? ग्रामीण अर्थव्यवस्था मजबूत करण्याच्या नाण्याची दुसरी बाजू हे सर्व परकीय ओघ थाववण्याचीच नाही का ?

सकाळी उठलेला मध्यमवर्गीय भारतीय कोलगेट अगर फोन्हान्सने आपले दात घासतो. ब्रुकबाँड अगर लिप्टनचा चहा पितो. बरोबर ब्रिटानिया ब्रेड. ऑफीसला जाताना अगावर टेरलिनचे कपडे चढवतो आणि तळमजल्यावरून इरॉस लिफ्ट त्याला आपल्या मजल्यावर सोडतो. आर्थिक कुवतीप्रमाणे सौदर्यप्रसाधन, रेडिओ, फ्रीज आणि इतर असख्य गोष्टी घरात वापरतो.

या साऱ्या चैनीच्या सुखसमाधानी मनामध्ये आपल्या खिशातील घरंगळलेली नाणी सातासमुद्रापल्याड जात आहेत, याचा तो कधी विचारही करीत नाही. आपण वापरीत असलेल्या सर्व टेरलिनच्या कापडाचे उत्पादन, जवळ जवळ ८५% चहाचे उत्पादन, साठ टक्के सिगरेट, पन्नास टक्क्याहून अधिक, थड पेये अशा असख्य गोष्टीच्या उत्पादनावर परदेशी भाडवलाचे सर्वस्वी वर्चस्व आहे आणि त्यावर अक्षरशः डोळे फिरवणारा नफा त्याना मिळत आहे हे कुणी कुणाला सागावे ?

जी दैनदिन वापराची तीच गोष्ट इतर अनेक महत्त्वाच्या आणि नफ्याच्या उद्योगधद्याची, ट्रॅक्टर, जूट, स्फोटक द्रव्ये, गिरणीतील विविध मशिनरी, तावे, जस्त, अॅल्युमिनियमसारखे अनेक महत्त्वाचे धातु, औषधे, प्लॅस्टिक, केमिकल्स, रबर या सर्व गोष्टीच्या उत्पादनावरही आज परदेशाचेच प्रभूत्व आहे.

हे सारे काही एकदम आणि अचानक घडलेले नाही.

राष्ट्रीय काँग्रेसच्या राष्ट्रीय नियोजन समितीने १९४५ सालीच

पृष्ठ २८ वर

# भुट्टोवरील लष्कराचे दडपणाने मुजीबशी बोलणी अयशस्वी

वा. दा. रानडे

पाकिस्तानने बांगला देशाला मान्यता दिल्यानंतर भारतीय उपखंडातील पाकिस्तान, भारत आणि बांगला देश या तिन्ही राष्ट्रांचे संबंध सुधारून संघर्ष व तणावाऐवजी सलोख्याचे व सहकार्याचे वातावरण निर्माण होईल अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली होती. पण दोन घटनांनी या अपेक्षेस मोठा हादरा दिला. भारतीय अणुस्फोटाचे निमित्त पुढे करून भारत व पाकमध्ये टपाल, दळणवळण आणि प्रवास सवलती पुनः सुरू करण्याच्या प्रश्नावर व्हावयाच्या वाटाघाटी पाकिस्तानने रद्द केल्या ही एक घटना आणि दुसरी घटना म्हणजे डाक्का येथे पाकचे पंतप्रधान भुट्टो आणि बांगला देशचे पंतप्रधान शेख मुजीबूर रहमान यांच्यात झालेल्या शिखर वाटाघाटी फिसकटल्या. या दोन्ही घटनांबाबत भुट्टोंनी स्वीकारलेली भूमिका पाहिली म्हणजे उपखंडातील देशामध्ये सलोख्याचे व सहकार्याचे संबंध प्रस्थापित व्हावेत अशी पाकची इच्छाच नाही असाच निष्कर्ष निघतो.

आपल्याला अनुकूल असलेल्या गोष्टींबद्दल आग्रह धरून त्या प्रथम साधून घ्यावयाच्या, प्रतिकूल व अप्रिय निर्णय शक्य तितके लांबणीवर टाकावयाचे आणि अगदी अपरिहार्य झाले तरच मान्य करावयाचे असे धोरण भुट्टोंनी उपखंडातील प्रश्नासंबंधात प्रथमपासून स्वीकारले आहे. युद्धात गमावलेला प्रदेश त्यांनी प्रथम परत मिळविला. त्यात त्यांचे कर्तृत्व किंवा पराक्रम काही नाही. भारताने हा प्रदेश परत करायचे ठरविलेच होते. त्यानंतर दुसरा प्रश्न होता युद्धकैदी परत मिळविण्याचा. युद्धकैदी परत करायला भारताची तयारी होती पण याबाबतचा निर्णय बांगला देशाच्या संमतीने घेतला पाहिजे असा भारताचा आग्रह होता. पाकच्या काही कैद्यांवर युद्धगुन्ह्यांच्या आरोपावरून खटले भरण्याचे बांगला देशने ठरविले होते. पाकचा त्यास विरोध होता. अखेर हे कैदी वगळून बाकीचे युद्धकैदी परत करण्याबाबत तडजोड झाली. यानंतर प्रश्न राहिला युद्धगुन्ह्यांचे आरोप असलेले कैदी परत मिळविण्याचा. बांगला देशने त्यांच्यावरचे खटले काढून घेतल्याशिवाय पाक बांगला देशला मान्यता देणार नाही अशी अट भुट्टोंनी घातली व या कैद्यावर आम्ही खटले भरणारच असा आग्रह बांगला देशनेही कायम ठेवला. ही कोंडी फुटायची कशी? लाहोरला भरलेल्या इस्लामी राष्ट्रांच्या शिखर परिषदेने भुट्टोंना ती संधी दिली. इस्लामी राष्ट्रांच्या विनंतीला मान्यता देऊन पाकने अखेर बांगला देशला मान्यता दिली. पाकने ही मान्यता बिनशर्त दिली आहे. युद्ध गुन्हेगारावरचे खटले काढून घेण्याची अट आम्ही मान्य केलेली नाही असे बांगला देशने जाहीर केले. पण याबाबत प्रत्यक्ष लेखी करार झाला नसला तरी तोंडी समझोता झाला असावा असे नंतरच्या घटनांवरून दिसते. पाक सैनिकांकडून घडलेल्या गुन्ह्याबद्दल पाक सरकारने जाहीर रीत्या दिलगिरी व्यक्त केली व युद्ध गुन्हेगारांवरील खटल्यांचा आग्रह बांगला देशने सोडून दिला. अशा रीतीने पाकने आपले सर्व युद्धकैदी परत मिळविले.

आपणास हव्या असलेल्या गोष्टी साधताना नको असलेल्या गोष्टींबद्दल पाकने म्हणजेच भुट्टोंनी कशी टाळाटाळ केली व व लांबण लावली तेही पाहण्यासारखे आहे. टपाल, दळणवळण व प्रवास सवलती पुनः सुरू करण्याच्या प्रश्नावर बोलणी करण्याची सूचना भारताने अनेकदा केली, पण प्रत्येक वेळी काहीना काही सबब पुढे करून पाकने ही बोलणी पुढे ढकलली. दोन्ही देशानी राजकीय संबंध प्रथम सुरू करावेत व नंतर इतर प्रश्नावर बोलणी करावीत अशी पाकची भूमिका दिसते. तर दोन्ही देशात अनिर्णित व वादग्रस्त प्रश्नावर बोलणी होऊन ते सुटण्याच्या मार्गास लागल्यावर मग राजकीय संबंध प्रस्थापित करावेत. संघर्ष चालू राहणार असेल तर राजकीय संबंध प्रस्थापित करून काही उपयोग नाही अशी भारताची भूमिका आहे. भारताने अणुचाचण्या बंद कराव्या अशी नवी अट वाटाघाटी सुरू करण्यासाठी पाकने घातली आहे. पाकच्या या धोरणाने दोन्ही देशातील संघर्ष व तणाव कायम राहणार आहे. दोन्ही देशात नव्या संबंधाचे युग सुरू होईल या सिमला कराराच्या आशा विफल ठरल्या आहेत.

पाक-बांगला देश संबंधाच्या वाटाघाटीतही तसेच घडत आहे. भारत-बंगला देश मैत्री भुट्टोंना मनातून डाचते आहे. बांगला देश पुन्हा पाकिस्तानचा भाग होणे आता शक्य नाही पण निदान त्याच्याशी सहकार्याचे संबंध ठेवून त्याला भारतापासून अलग काढणे कितपत शक्य होईल हे चाचपण्याचा डाक्का भेटीत भुट्टोंचा प्रयत्न होता. पण मुजीब अधिकारावर असेपर्यंत तरी भारत-बांगला देश मैत्री तोडणे शक्य नाही हे भुट्टोंना स्पष्टपणे दिसून आले.

भुट्टो-मुजीब वाटाघाटीत दोन मुख्य प्रश्न होते एक पूर्वीच्या अखंड पाकिस्तानची जी देणी-घेणी होती त्याची पाक-बांगला देशांमध्ये योग्य प्रमाणात वाटणी करणे आणि दुसरा बांगला देशमधील बिहारींना पाकने परत घेण्याचा प्रश्न. देण्याघेण्याच्या प्रश्नांवरील वाटाघाटीत बांगला देशला त्याचा न्याय्य वाटा देण्याचे भुट्टोंनी साफ नाकारले. पूर्वीच्या अखंड पाकिस्तानच्या ज्या विकास योजना होत्या त्यात बंगला देशवर त्याच्या लोकसंख्येच्या प्रमाणात खर्च व्हावयास हवा होता. ही रक्कम पाककडून आम्हाला मिळाली पाहिजे ही बंगलादेशची मागणी अवास्तव

पृष्ठ १३ वर

# सोलकढी

## □ लोकभाषा संस्कृत

आपला हा भारतदेश कित्तीकित्ती थोर्थोर आहे ते आपल्यासकट सगळ्या जगाला चांगले ठाऊक आहे. या देशाच्या थोर्थोरवीचे एक गमक असे की त्याला जगातल्या इतर कोणत्याही देशापेक्षा अधिक मोठी वा प्राचीन परंपरा आहे. प्राचीन्याबद्दल एकच बिनतोड गोष्ट सांगायची म्हटली तर असे म्हणता येईल की बाकीच्या देशांना जेव्हा कंठ फुटला नव्हता किंवा पुढे कंठ फुटून ते बोबडेबुबडे बोलू लागले तेव्हा आम्ही बिनहाडाच्या जिभेला कर्तबगारी दाखवायला पूर्ण वाव देणारी गीर्वाणवाणी संस्कृत, शिंका आणि जांभया याव्या तितक्या सहज, वदत होतो : त्या लौकिक आणि म्हणूनच अलौकिक सुरभारतीला माझे वंदन असो.

संस्कृत फाडफाड बोलणारी माणसे आजकाल दिसत नाहीत. मी मात्र आजवर अशी दहाबारा देवाघरची माणसे पाहिलेली आहेत. मला तर मराठीसुद्धा धड बोलता येत नसल्यामुळे संस्कृत धड बोलणाऱ्यांबद्दल पराकाष्ठेचा आदर वाटतो. या महाभागांच्या मते : संस्कृत ही अत्यंत सोपी भाषा आहे; (पुरणपोळी हे सहज होण्यासारखे पक्वान्न आहे; ऊंट हा नयनाभिराम प्राणी आहे; निक्सन हा सचोटीचा माणूस आहे; मुंबई हे निसर्गरम्य स्थान आहे. नामदेव ढसाळची कविता रसाळ आहे.) नीट शिकवली-शिकली गेली तर संस्कृत लिहिणे-बोलणे बिलकुल अवघड नाही. किंबहुना संस्कृत ही इतकी शुद्ध आणि परिपूर्ण भाषा आहे की अल्पप्रयत्नांनी ती राष्ट्रभाषा होऊ शकेल. संस्कृत राष्ट्रभाषा होऊ शकली तर सगळेच भाषिक वाद मिटतील. साठसत्तर कोटींचा हा देश संस्कृत बोलू-लिहू लागला की त्या महान परंपरेशी पुन्हा नाते जुळून त्याचा भाविकाल रम्य होऊन जाईल.

ही प्रक्रिया खासगी पातळीवर सुरू झालीच होती; आता खुद्द सरकारच तिला गतिमान करणार आहे. जूनच्या तीस तारखेपासून आकाशवाणीवरून दर दिवशी तब्बल पाच मिनिटे संस्कृतमधून बातम्या देण्यात येऊ लागल्या आहेत. या बातम्या सर्व केंद्रांवरून प्रक्षेपित करण्यात येतात. संस्कृत ही मृतप्राय भाषा आहे, आधुनिक समाजाच्या भाषिक अपेक्षा ती पुऱ्या करू शकत नाही, असा एक चिटवळ आरोप या वेद उपनिषदकारांच्या, व्यासवाल्मिकींच्या, कालिदासभवभूतींच्या, मम्मटजगन्नाथांच्या, वेर्णेकरगाडगिळांच्या संस्कृत भाषेवर करण्यात येतो. वस्तुस्थिती मात्र तशी नाही. आपल्या आधुनिक आणि सुसंस्कृत समाजाचे सगळे ऐटबाज व्यवहार संस्कृतमधून छान सुरळीत चालू शकतील असे छातीठोकपणे सांगणारे काही फक्कड देवदत्त आणि सोमदत्त आजही विद्यमान आहेत. मी सोडून बाकीचे लोक त्यांना वेडगळ मानतात. खुद्द त्या देवदत्त-सोमदत्तांना मात्र, मी सोडून बाकीचे लोक वेडगळ वाटतात. खरे म्हणजे संस्कृत अतिप्राचीन असल्यामुळेच अत्याधुनिकही आहे ! ही साधी गोष्ट कित्येकांच्या ध्यानात येऊ नये याचा मला नेहमी अचंबा वाटत आलेला आहे. आपल्या प्रजापरायण सरकारच्या ध्यानात मात्र ही गोष्ट नेहमीच होती. त्यामुळे सरकारकडून संस्कृतला सतत उत्तेजन लाभले आहे, हा इतिहास आहे. हे उत्तेजन यावच्चंद्रदिवाकरौ देण्याचा सरकारचा निर्धार दिसतो : सुरुवातीला आकाशवाणीवरून संस्कृत बातम्या फक्त पाचच मिनिटे देण्यात येत आहेत. हळुहळू ही कालमर्यादा वाढत जाऊन, नजिकच्या भविष्यात आकाशवाणीवरून बातम्यांसुद्धा सगळेच कार्यक्रम संस्कृतमधून सादर करण्याचा सरकारचा इरादा आहे, असे म्हणतात. तसे झाले तर देवभाषा संस्कृत हा हा म्हणता लोकभाषा होऊन जाईल.

लोकांनी लोकांकरता चालवलेल्या लोकांच्या आकाशवाणीला संस्कृतसारखी लोकभाषा लाभली तर तिला (पक्षी : आकाशवाणीला किंवा संस्कृतला) अलौकिक डौल येईल.

—अनंतराव



# कलकत्ता मेल

**तारा पंडित**

## पुष्किनचा वाढदिवस

गॉर्की सदनची इमारत. पुष्किनचा १७५ वा वाढदिवस मोठ्या प्रमाणावर साजरा होत होता. रशियाच्या व्हाईस कौन्सुलनी प्रास्तविक भाषण केले. नतर बोलायला उभे राहिले श्री. सुभाष मुखपाध्याय. घरी धुतलेले धोतर, गेरव्या रगाचा सदरा, खाद्यावर झोळी, कुरळे केस पिंजारलेले, डोळ्यावर चष्मा. श्री. सुभाष मुखपाध्याय हे साहित्य अकादमीचे पूर्वांचल प्रदेशाचे मुख्य सेक्रेटरी असून विख्यात कवी आहेत. बगालीत त्यानी पुष्किनबद्दल, त्याच्या काव्यरचनेबद्दल, त्याच्या श्रेष्ठपणाबद्दल थोडक्यात पण सुदर भाषण केले. अमेरिकेच्या व्हाईस कौन्सुल नाही आमत्रण होते त्यानी पुष्किनविषयक लावलचक माहिती लिहून आणली होती मधून मधून कागदावरून वाचून त्यानी आपले विस्तृत भाषण ऐकवले आणि शेवटी पुष्किनची एक कविता मूळ रशियन भाषेत व नतर तिचा इग्रजी अनुवाद वाचून दाखवला त्यावेळी अमेरिका-रशिया हा भेदभाव जाणवला नाही. उलट सामान्य व्यक्तीकडून एका असामान्य व्यक्तीची शब्दसुमनानी पूजा होत होती असेच दृश्य दिसले 'विद्वान् सर्वत्र पूज्यते !' ह्या वचनाची सत्यता प्रत्ययाला आली. त्यानतर कवी विश्वजीत राय यांनीही रशियन भाषेतील पुष्किनच्या दोन कविताचा स्वतः केलेला बगाली अनुवाद वाचून दाखवला ते रशियन भाषेचे उत्तम जाणकार आहेत कार्यक्रमाची सागता झाली टॉलस्टॉयच्या ॲना कॅरेनिना ह्या चित्रपटाने

पुष्किन हा रशियन काव्याचा प्रतिभासूर्य आता पुष्किनवर सशोधनच सुरू झाले आहे अलीकडेच (gr) R. Proffer (London) याचे The Critical Prose of Alexander Pushkin हे नवे पुस्तक प्रकाशित झाले आहे एका भाषाशास्त्रज्ञाने पुष्किनच्या नव्याने अनुवादित झालेल्या साहित्याचा ग्रथ तयार करण्याचे काम सुरू केले व अकस्मात त्याचा अत झाला. काम अपुरे राहिले पण आता तेच काम त्याची पत्नी Irene करीत आहे.

पुष्किन यानी आता स्वदेशाची मर्यादा ओलांडली असून त्यांचा आवाज अनेक भाषामधून ऐकू येऊ लागला आहे. म्हणूनच अलीकडे त्याचा उल्लेख जपानी पुष्किन, इथोपियन, अरब किंवा फ्रेंच पुष्किन अशा तऱ्हेचे शब्दप्रयोग वापरून करण्यात येत असेल तर आश्चर्य वाटण्याचे कारण नाही.

पुष्किनच्या स्वतःच्या लायब्ररीत ३५०० पुस्तके असून त्यात १६ भाषामधील पुस्तके आढळतात त्याच फ्रेंच, इग्लिश, इटालियन, स्पॅनिश आदि भाषा समाविष्ट आहेत. त्याना पुस्तकाचे भारी वेड होते. मृत्यूसमयी आपली सर्व पुस्तके त्यानी डोळे भरून पाहून घेतली व त्याच्या तोडून Farewell my friends ! असे उद्गार बाहेर निघाले.

पुष्किन Sovremennik (Contemporary) नावाची मासिक पत्रिका चालवीत असत स्वतःच्या काव्यरचना करता करता त्यानी चाळा म्हणून काढलेली सुदर रेखाचित्रे तिकडील वर्तमान पत्रानी प्रसिद्ध केली आहेत अलीकडे तर पुष्किनवर सशोधन करणाऱ्या विद्वानानी त्याच्या हातून पडलेल्या शाईच्या डागाची देखील चिकित्सा करणे सुरू केले आहे. न जाणो, त्यातही काही गर्भितार्थ असायचा.

लेनिनग्राड शहर म्हणजे जणू पुष्किनच्या चाहत्याची मक्का-मदिना जो जो जास्त माहिती मिळवावी तो तो माणसाला त्याचेविषयी अधिकाधिक आदर आणि प्रेम वाटू लागते.

ह्या श्रेष्ठ कवीच्या बुद्धिमत्तेचे साऱ्या पृथ्वीवर पसरलेले तेज Pushkiniana नावाच्या ग्रथामधून एकत्रित केले आहे पुष्किनियानाचे आजवर दहा मोठाले जाडजूड खड प्रकाशित झालेले आहेत त्याच्या अनुवादित साहित्यविषयक भाषाची यादी शभराहून अधिक आहे

आता पुष्किनविषयक ज्ञानकोष तयार होत आहे. तो तीन भागात विभागला असून Prof. Boris Meilakh यानी लिहिलेले पुष्किनचे विस्तृत जीवनचरित्र त्यात प्रसिद्ध होणार आहे पुष्किनच्या १७५ व्या वाढदिवसानिमित्त हे सारे होणार. त्याची सर्व इस्टेट म्युझियममध्ये परिवर्तित झाली असून तेथे मोठमोठे समारभ आणि उत्सव साजरे करण्यात येतील

एवढा मोठा रशियन कवी वयाच्या अवघ्या ४८ व्या वर्षी अफाट कीर्ति सपादन करून गेला. साऱ्या जगभर त्याने नाव केले. अशा ह्या महान् कवीच्या काव्याची ओळख आमच्याकडील कवींनी मराठी भाषेतून सर्वसाधारण लोकाना करून दिली तर फार चांगले होईल असा एक विचार जाता जाता मनात येतो. ◻

## खंत जाळिते उरा-

अलीकडेच इदिराजीनी माडलेल एक विधान डोळ्याखालून सरकल. त्यात त्यानी म्हटलय-आम्ही अमेरिकेकडून एवढी मदत घेतो ती काही अगदीच फुकट नाही. आमची अनेक कार्यक्षम व बुद्धिमान डोकी आम्ही त्याना दिली आहेत. आमची कित्येक असामान्य बुद्धीची माणसे तिकडेच स्थायिक झाली आहेत.

हे वाचता वाचता मला एका 'रशियन सत्यकथेची आठवण झाली. रशियातील एका शिल्पकाराने छोट्या छोट्या चमकदार दगडाच्या साह्याने एक सुदर फुलदाणी तयार केली होती. सूर्यप्रकाशात तिच्यातील फुलाची शोभा काही औरच भासू लागे. प्रत्येक पाकळीपाकळीतून सूर्यकिरण पाझरत नि ते अलौकिक सौंदर्य पाहून माणूस हतवाक होई अशा ह्या सुदर वस्तुची कीर्ती अन्यत्र पसरली. एका अमेरिकन सग्राहकाला ती सौंदर्यशाली वस्तु आपल्याकडे असावी असे वाटले. पाच नवी रेल्वे एजिने त्या मोबदल्यात देण्यास तो तयार झाला. सारी हकीगत मग लेनिनच्या कानावर घालण्यात आली. लेनिनने स्वत ती फुलदाणी पाहिली. अत्यत रसिक मनाचा तो राजकीय नेता होता. त्याने अर्थशास्त्रज्ञाना ह्यावावत मत विचारले. ते म्हणाले, काय हरकत आहे द्यायला ? आपला देश गरीब आहे. आपल्याला आज पैशाची, वस्तूची फार गरज आहे एका फुलदाणीच्या मोबदल्यात एवढी मोठी सोय होत असेल तर तिचा अवश्य अवलब करावा.

ह्यानतर लेनिनने स्वतःचे मत माडले त्याने म्हटले, माझ्या मते आपल्या देशातील माणसाची ही अपूर्व कला जोपासन- करण्यातच तिचे वैशिष्टय आहे. आपल्या लोकाना ते अभिमानास्पद आहे, गौरवास्पद आहे, स्फूर्तिदायक आहे. त्या वस्तूची किंमत पाच काय पण पचवीस एजिनाच्या किंमतीपेक्षाही फार अधिक आहे. आपल्या देशाचे ते वैभव आहे लेनिनने पुढे म्हटले, आपण गरीब आहोत हे खरे. ह्यातून आपण मार्ग शोधून काढू. पण आपल्याच देशातील माणसाने घडवलेल्या ह्या कलाकृतीला आपण अतरता कामा नये. वस्तुसग्रहालयात सर्वांना बघण्यासाठी ती फुलदाणी ठेवावी असे मला वाटते.

...इदिराजीच विधान वाचून मला वाईट वाटल आपल्या देशातील चालत्या फिरत्या बुद्धिशाली माणसाची किंमत फुलदाणीसारख्या एका लहानशा निर्जीव कलाकृतीपेक्षा अनेक पटीनी कमी असावी ह्याची खत वाटली. ◻ ◻

# एक सुनहरा ख्वाब है

श्याम कदम 'मानव', वर्धा

युग की जडता के खिलाप
एक इन्कलाब है।
हिन्द के जवानो का
एक सुनहरा ख्वाब है।
भारतीय सांस्कृतिक क्रांती ..

मेंडोलिनच्या मद लयीच्या तालबद्ध पार्श्वसगीतावर ह्या समूह-क्राती गीताच्या सुमधूर लकेरी वातावरणात निनादत होत्या. मेघानी पादाक्रात केलेला सपूर्ण आसमत ह्या स्वप्नील, रोमहर्षक वीररसाने भारले गेले होते. जणू . जमलेल्या पचवीस सहस्र भव्य जनसमुदायाच्या बोलक्या दृश्याचे पडसाद ह्या समूहगीतामधून प्रतिध्वनित होत होते. म्हणूनच एवढा प्रचड जनसागर अगदी शात, एकाग्र चित्ताने लयीवर डोलत होता. आणि प्रत्येक जीवत हृदय आळवीत होत, मनोमन पण करीत होत...

हमारा.
...एक सुनहरा ख्वाब है।
भारतीय सास्कृतिक क्राती..।

प्रयागमधील त्या ऐतिहासिक पी. जी. टडन पार्कमध्ये पचवीस हजार लोक शातपणे पावसाच्या वेगवान सरीत भिजत होते. सपूर्ण अगावरून पाणी निथळायला लागल होत सुटलेल्या गार वाऱ्यान अगात हुडहुडी भरत होती. एक-दोघानी उठून झाडाच्या आडोशाला जाण्याचा प्रयत्न केला.. पण...

तात्काळ एक चिपाड छातीचा पिचपिचा तरुण डाफरला–
' वो बूढा शेर पानीमे भीग रहा है।
और तुम ?... पानीसे डरते हो ? कैसे तरुण हो ?
डूब मरो चुल्लूभर पानी मे...'

होय खरच आहे. एक म्हातारा सिंह, ७४ वर्षाचे वयोवृद्ध जयप्रकाश नारायण भर पावसात पाण्यानं निथळत बोलत होते. त्यांच्या डोक्यावर कुणा हितचिंतकान छत्री धरली. त्वरीत त्यानी ती बाजूला सारली आणि तसेच पाण्यात भिजत बोलत राहिले. पाण्यान न्हाऊन निघत असलेली जनता आपल्या एकमात्र प्रिय लोकनेत्याचा शब्दन् शब्द हृदयात साठवीत होती. जनसागराला वाटत होत, प्रत्येकाला वाटत होत असच हे भाषण सुरू असावं आणि ह्या तरुणालाही लाजविणाऱ्या म्हाताऱ्याचे बोल असेच पाण्यात भिजत निथळत आपण ऐकत रहावेत.

पण...काही लोक भाषण कधी सपते त्याची वाट पहात होते. पाण्यात बसायला घाबरले म्हणून नव्हे ! भाषणाला कटाळले म्हणूनही नव्हे ! तर त्याच्या नेत्याची तब्येत चिंताजनक अवस्थेत असताना हे पाण्यात भिजण त्याच्या प्रकृतीला सोसविणार नव्हत म्हणून...हीच एक चिंता साऱ्या जाणत्या श्रोत्याना अस्वस्थ करीत होती.

ह्याच पी. जी. टडन पार्कमध्ये १९३० साली 'नमक सत्याग्रह' प्रतिकात्मक स्वरुपात नेहरूसमवेत साजरा केला होता. त्या आठवणीनी ढवळून निघालेल्या जयप्रकाशाच हृदय त्याच आणि इदिरेचे जवळचे नाते सांगून जात होते. ते म्हणत होते–

'इदिरा माझ्या मुलीसारखी आहे. तिचे आणि माझे व्यक्तिगत मतभेद नाहीत. पण तिच्या नीतीला, तिच्या कार्यप्रणालीला, शासनव्यवस्थेला मात्र माझा प्रखर विरोध आहे.'

बिहारमध्ये शासनाने घेतलेल्या लष्करी मदतीबद्दल चिडून पोटतिडकेने ते बोलत होते– 'अशाने एक दिवस भारतात लष्करी राजवट येईल. आतरिक व्यवस्थेत लष्कराची मुळीच मदत घ्यावयास नको. लष्कराचे काम सीमाचे रक्षण करण्याचे आहे. आपल्याच जनतेवर निष्ठूरपणे गोळ्या झाडण्याचे नव्हे.

जर बिहारमधील हे शातीमय आदोलन असफल झाले तर भारतात हुकूमशाही येईल. लोकशाही जिवत राहूच शकणार नाही. पुढे कोणत्याच आदोलनाचा शातीमय क्रातीचा मार्ग ह्या देशासाठी खुला राहणार नाही. हुकूमशाहीशिवाय दुसरा पर्यायच शिल्लक असू शकणार नाही...'

असले उद्गार त्या क्रातीदृष्टयाच्या हृदयातून कळवळून बाहेर पडत होते. आणि म्हणूनच सपूर्ण क्रातीचा, शातीमय आदोलनाचा बिहारमधला प्रयोग सफल व्हावा, तो देशव्यापी व्हावा म्हणून जनतेला, तरुणाना ते पोटतिडकेने आवाहन करीत होते. तरुणाना त्यानी पिळवटून साद घातली– 'मुझे आप अपना एक साल दीजिए, सिर्फ एक साल, एक वर्ष, फक्त एक वर्ष शाळा-कॉलेजे बद ठेऊन आदोलनात सक्रीय भाग घ्या. मग पहा ह्या देशाचे चित्र आमूलाग्र कसे बदलते ते.

आणि जमलेल्या तरुणानी, जनतेने टाळयाच्या उत्स्फूर्त कडकडाटाने प्रचड प्रतिसाद दिला. आणि पहिल्यादाच भाषणामध्ये टाळ्या वाजविण्यास जयप्रकाशानी मनाई केली नाही मुक्तपणे वाजवू दिल्या.

भारतात एक नवी सांस्कृतिक क्राती निर्माण करण्याचा निश्चय उरी बाळगूनच तब्बल तासभर पाण्यात भिजत असलेला पचवीस सहस्राचा प्रचड जनसागर उठला होता–

'जयप्रकाश जिंदाबाद, हमारा नेता जयप्रकाश...'च्या घोषणानी आसमत गाजवीतच.

प्रयागच्या पी. जी टडन पार्कमध्ये ही भव्य आमसभा भरविण्याचे श्रेय होते, 'अखिल भारतीय युवक समेलनाला. जयप्रकाशजी ह्यासाठीच पटन्यावरून तीन दिवसासाठी आले होते प्रयागला.

अखिल भारतीय तरुण शांतिसेना आणि युवामंच ह्या दोन संघटनांच्या सयुक्त प्रयत्नानी या विभिन्न सघटना, सर्व प्रकारचे तरुण एका मचावर-एका व्यासपीठावर जमले होते.

जयप्रकाशाच्या स्वास्थ्यामुळे अवघ्या पधरा दिवस आधी सम्मेलन अहमदाबाद (गुजरात) वरून प्रयागला (उ. प्र.) स्थानातरीत करावे लागले होते. त्यामुळे अडचणीचा प्रचड डोगरच व्यवस्थापकांसमोर उभा ठाकल्यास नवल नाही. त्यातल्या त्यात उ. प्र. सरकारने अवलबिलेले अडवणुकीचे धोरण ! त्यामुळे परिस्थितीची बिकटता आणखीनच वाढली होती. सम्मेलनासाठी कुठेही जागा मिळू नये असे प्रयत्न अगदी खास सरकारी स्तरावरून झाले होते. अनेक ठिकाणी नकार स्वीकारल्यावर अवघ्या दीड दिवस आधी काहीशा प्रेमाच्या बळावर आणि काहीशा 'भटाला दिली ओसरी अन् भट हातपाय पसरी' वृत्तीनुसार प्रयाग महिला विद्यापीठाची जागा बळकवावी लागली होती.

प्रयागमधील २२ ची पहाट, एका आगळचा उत्साहान, आशादायी भविष्य घडविणाऱ्या दुर्दम्य प्रेरणेन, नवीन भारतवर्षाच्या इतिहासाची मुहूर्तमेढ रोवण्याच्या ईर्षेनच उगवली.

सकाळी सव्वानऊ वाजल्यापासूनच, प्रयाग महिला विद्यापीठाच्या भव्य हॉलमध्ये ह्या स्वप्नील तरुणानी आपल्या आगळचा-वेगळचा पोशाखात, युवाशक्तीच्या एकतेची ग्वाही देणाऱ्या युवक समेलनाच्या प्रतिनिधित्वाचे तावडे कार्ड आपल्या छातीवर अभिमानाने लटकावून, गटागटाने जमण्यास सुरुवात केली होती.

किती वेगवेगळचा विचाराचे, आचाराचे तरुण प्रथमतःच एका ठिकाणी एका ध्येयाने प्रेरित होऊन गोळा होत होते. सदा एक दुसऱ्या विरुद्ध असलेली ही तोडे कधी समोरासमोर वळलीच होती तर...भाडण्यासाठी, एक दुसऱ्यास शिव्या देण्यासाठी, मारामारी करण्यासाठी.

पण...आज...? ही लोकनायक जयप्रकाशांच्या नेतृत्वाची जादू होती. म्हणूनच एकीकडे सी पी. एम्. ची यूथविंग असलेल्या स्टूडटस् फेडरेशनचे युवक तर दुसरीकडे समाजवादी योजनासभेचे (दोन्ही लिमये आणि राजनारायण गटाचे) तरुण, विद्यार्थी परिषद, तरुण शाती सेना, युवा मच, युवक क्राती दल, अनेक विद्यापीठाचे विद्यार्थी–पदाधिकारी अशा अनेक सघटनाच्या ५०० युवकाचा अद्वितीय सगम प्रयागच्या त्रिवेणी सगमाच्या साक्षीने होत होता. पण ह्यातच समेलन पार न पडू देण्याचा निश्चय केलेले, प्रतिनिधी कार्डस् छापखान्यातून परस्पर खास शासनप्रिय नबर दोनच्या मार्गाने मिळविलेले काही अनामिक आणि स्वत ची डोकी सत्तारूढ पक्षास गहाण टाकलेले युवकही होते. ही बाब दृष्टिआड करणे युवकांच्या दृष्टीने योग्य होणार नाही.

**'नौजवान आओ रे...**
**लो कदम मिलाओ रे, लो कदम मिलाओ रे...'**

ह्या आव्हानात्मक समूह गीतान सगळचा युवकांच हृदय काबीज केल, फुलविल. अन् लोकनायकाच्या उद्घाटनाच्या भाषणान स्वतत्र भारतातील पहिल्या युवक समेलनास प्रारभ झाला.

जयप्रकाशजी अत्यत धीर गभीर आवाजात तब्बल पावणेदोन तास बोलत होते आणि नेहमी उच्छृंखलपणात दग असणारा युवा वर्ग अधूनमधून टाळ्या वाजवून भाषणात प्रतिसाद न देण्याचं कडक बधन पाळूनसुद्धा, शांत चित्ताने एका तपस्वी कर्मयोग्याचे हृदय पिळवटणारे कळकळीचे शब्द हृदयात साठवीत होता. ते म्हणत होते–'हिंसा वा अहिंसेचा माझा आग्रह नाही. जर भारतामध्ये सर्वव्यापी क्राती हिंसक आदोलनाद्वारा होत असेल तर मी त्यात सहभागी होणार नसलो तरी विरोध मात्र मुळीच करणार नाही. मला हिंसक आदोलनही चालेल. पण ते सर्वव्यापी, सपूर्ण क्राती प्रत्यक्षात आणण्याच्या योग्यतेच हवं. भारतात अशी हिंसक क्राती घडविण्याची ऐपत कोणाही पक्षात वा सघटनेत नाही. म्हणूनच बिहारमधील शाततामय आंदोलन हे भारतीय इतिहासातील एकमेव आशास्थान आहे आणि ते सफल करण्याची जबाबदारी तुम्हा सृजनशील युवकाची आहे. ह्यासाठी तुम्ही युवकानी एक वर्ष शाळा, कॉलेजेस सोडून आदोलनास वाहून घेतल पाहिजे. जसे १९४२ मध्ये गाधीनी आवाहन केल होत तसच आज मी तुम्हास करतो आहे...'

जयप्रकाशानी बिहार आदोलनाची पार्श्वभूमी युवकास समजावून सागितली. विधानसभा बरखास्तीची मागणी पुढे का जोडावी लागली त्याची अपरिहार्यता व योग्यताही स्पष्टपणे विशद केली. पण त्याच वेळी नव्या सुरू होणाऱ्या आदोलनासोबत विधानसभा बरखास्तीची मागणी इतर राज्यात समोर ठेवली तर ते कसे चूक ठरेल हा धोक्याचा इशाराही दिला.

ह्या समेलनाचे अध्यक्षस्थान जयप्रकाशासोबत बिहारच्या आघाडीवर प्रत्यक्ष आदोलनात काम करीत असलेला कुमार प्रशात भूषवीत होता. हा शाततािप्रय युवक उत्तम लेखक आणि कवी म्हणून अनेकाना ज्ञात आहे. जेलची हवा चाखून आलेला अवघ्या बावीस वर्षाचा कुमार प्रशात समेलनाच्या शेवटी बोलायला उभा राहिला आणि जेव्हा आपल्या धारदार, हृदयवेधी शब्दफेकीने आंदोलनाची–क्रातीची परिभाषा, बिहारमधील स्थिती, क्राती सक्रमणकाळातील साधनशुचितेची अपरिहार्यता प्रतिपादन करू लागता त्या वेळी त्याच्या मुद्देसूद प्रतिपादनातील सुसूत्रता, तार्किकता, खोलात शिरून अभ्यासपूर्ण विषय माडण्याची हातोटी पाहून विश्वास बसेना की, आपल्यापुढे अवघ्या २२ वर्षांचा तरुण बोलतो आहे म्हणून. ह्या बिहारच्या तरुण शातिसेनेच्या सघटकाच्या अगी इतकी योग्यता बिहारच्या आदोलनाच्या प्रत्यक्ष भट्टीत तावून सुलाखून निघाल्यामुळे आली होती म्हणायची.

दुपारच्या बैठकीमध्ये वेगवेगळचा सहा विषयावर (ज्यामध्ये लोकतत्र, शिक्षा, भ्रष्टाचार, महागाई हे विषय प्रमुख होते) गटवार चर्चा होणार होती आणि त्या पूर्वीचा विषयप्रवेशाचा कार्यक्रम सुरू होता. त्यात महाराष्ट्राच्या किशोर देशपांडेने 'लोकतत्र' विषयाचा प्रवेश करताना पक्षासाठी विशिष्ट सदर्भात 'दलाल' शब्द वापरला आणि त्यावरच सभेत फार मोठा गदारोळ उसळला. शेवटी हा गोधळ वाढतच गेला. मी पूर्वीच कल्पना दिली आहे की, समेलन न होऊ देण्याचा पण केलेले काही विरोधी गट उपस्थित होते. त्यानतर ओमप्रकाश दीपकच्या मध्यस्थीने पुन्हा सभा आटोक्यात आली. पण त्यानंतर पुन्हा थोड्याच वेळात व्यवस्थेच्या प्रश्नावर सभेत गोधळ माजला. तो तब्बल तास दीड तास चालत

राहिला आणि त्यानंतर मात्र जयप्रकाशजींना स्वत. सभेमध्ये उपस्थित व्हाव लागल. त्यांच्या उपस्थितीनेच गोंधळ शमू शकला.

पुढे गटवार चर्चा न होता बिहार आंदोलन आणि इतर प्रांतातील परिस्थिती आणि आंदोलनाची सभाव्यता ' ह्या विषयावर बोलण्यास प्रत्येकास ५ मिनिटे वेळ देण्यात आला. अशातऱ्हेने रात्री ८ वाजेपर्यंत हा कार्यक्रम सुरू राहिला.

पुढे रात्री प्रत्येक सघटनेतील विद्यार्थी नेत्याची अशी एक वेगळी बैठक बोलाविण्यात येऊन त्यामध्ये संमेलनाच्या कार्यक्रमाची रूपरेषा ठरविण्यात आली. दुसऱ्या दिवशी हा प्रस्ताव समेलनासमोर ठेवण्यात येऊन त्यात सुचविल्या गेलेल्या सुधारणा एकत्रीत करून एक निश्चित व्यापक ठराव समेलनाद्वारा माडण्यात आला. त्यात प्रामुख्याने आजच्या महागाईने गिळकृत केलेल्या, भ्रष्टाचाराने बरबटलेल्या, असहनीय जीवनाचे वर्णन केले असून ही सद्यस्थिती नष्ट करून एक नवा समाज निर्माण करण्यास कटिबद्ध राहाण्याचे आवाहन ह्या युवा समेलनाने अखिल भारतातल्या युवकाना केले आहे. सोबत बिहार आदोलनाचे पूर्णत समर्थन करून आवश्यक त्याप्रमाणात प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षरित्या सपूर्णपणे मदत देण्याचे आश्वासन समेलनाने युवकातर्फे बिहारच्या जनतेस व तरुणास दिले आहे. त्याचप्रमाणे अखिल भारतातील युवकानी एकमुखाने एकमात्र जयप्रकाशजीचे नेतृत्व स्वीकारले. आणि प्रत्येक प्रातात एक बिहार सप्ताह पाळण्याचा आणि त्या सप्ताहाअती एक युवक समेलन प्रातीय स्तरावर आयोजित करून पुढील कार्यक्रम निश्चित करण्याचा निश्चय त्या त्या प्रातातील युवकानी केला आहे.

प्रयागमध्ये समेलनाचा समारोप उ. प्र. मधील आनंद ह्या विद्यार्थी नेत्याने अत्यत ओजपूर्ण, हृदयाला भिडणाऱ्या शब्दात केला. ' आम्ही आपसात भाडतो ह्याचाच अर्थ आमच्या दुष्मनाचे क्राती विरोधी तत्त्वाचे हात सहस्रपटीने बळकट करीत आहोत. म्हणूनच आपसातील मतभेद, हेवेदावे, सत्तेचा हव्यास, स्पर्धा सर्वकाही सोडून आम्ही जयप्रकाशाच्या नेतृत्वाखाली एक होऊ आणि भारतात त्याचे समग्र क्रातीचे स्वप्न प्रत्यक्षात उतरवूनच नि श्वास घेऊ '

अशा प्रकारच्या प्रतिज्ञावजा आवाहनाचे पडसाद प्रत्येक युवकाच्या हृदयातून निघत असतानाच समेलन औपचारिकरित्या सपले.

आणि सर्व युवक पी. जी. टडन पार्कमधील जयप्रकाशांच्या त्या भव्य पचवीस सहस्राच्या, पाण्यात अक्षरश निथळत असलेल्या जनसागरात समाविष्ट झाले.

समेलनास आलेला प्रत्येक युवक एक कार्यक्रम घेऊन वेगळ्या उत्साहाने, आगळ्या जिद्दीने, स्वप्नील महत्वाकाक्षेने परतत होता... कोणी उ. प्रदेशात, कोणी मध्यप्रदेशात, महाराष्ट्रात, केरळमध्ये, बगालात, गुजरायेत, कोणी कुठे...कोणी कुठे.

पण प्रत्येकाचे हृदय बेहोशून पी. जी. टडन पार्कमधील ओळी गुणगुणत होते...

हाथ ले हल कुदाल...  
और ज्ञान की मशाल...  
हिंद के जवानो का एक सुनहरा ख्वाब है !  
**भारतीय सांस्कृतिक क्रांती...**

□ □

---

## भुट्टोंवरील लष्कराचे दडपणाने मुजीबशी बोलणी अयशस्वी : पृष्ठ ८ वरून

म्हणता येणार नाही. पाकमध्ये जाऊ इच्छिणाऱ्या सर्व बिहारीना पाकने परत घेतले पाहिजे ही मुजीब यांची मागणीही न्याय्य आहे हे बिहारी स्वत ला पाकचे नागरिक मानीत आलेले आहेत. युद्धात त्यानी पाकची बाजू घेतली होती. पण त्यापैकी काही थोड्या लोकानाच परत घेण्याची पाकने तयारी दर्शविली आहे. भुट्टोची ही भूमिका मुजीबला मान्य होणे शक्य नव्हते. त्यामुळेच वाटाघाटी फिसकटल्या.

भुट्टोनी बगला देशला मान्यता अनिच्छेने दिली व डाक्क्याला भेटही अनिच्छेनेच दिली. बागला देशाला मान्यता देणे, त्याच्याशी सबध सुधारणे पाकमधील लष्करी नेत्याना पसत नाही. भुट्टो पूर्णपणे या लष्करी नेत्याच्या प्रभावाखाली आहेत असे नाही. पण काही एका मर्यादेपलीकडे ते लष्करी नेत्यांना दुखवू शकत नाहीत. त्याचा प्रभाव व त्याचे परिणाम याचा अदाज घेऊनच त्यांना एकेक पाऊल जपून टाकावे लागत आहे असे दिसते. लष्करी नेत्याना दुखविले तर आपणास पदच्युत करून हे लष्करशहा पाकमध्ये पुन्हा लष्करी राजवट आणतील ही भुट्टोना वाटणारी भीती अनाठाई म्हणता येणार नाही. पाकचे परराष्ट्रमत्री अझीझ अहमद लष्करी नेत्याच्या प्रभावाखाली आहेत. भुट्टो मत्रिमडळातील लष्कराचा माणूस असे त्याच्यावद्दल म्हटले जाते. सर्व निर्णय आपणच घेत आहोत असा आभास अझीझ महमद यानी डाक्का वाटाघाटीचे वेळी निर्माण केला होता. बगला देशला कोणत्याही मोठ्या सवलती देणे लष्करी नेत्याना मान्य नव्हते. बगला देशाची मैत्री सपादण्यासाठी व त्याला भारतापासून अलग काढण्यासाठी अशा काही सवलती देण्याची स्वत: भुट्टोंची व्यक्तिश: तयारी असेलही पण आपले स्थान सुरक्षित राखावयाचे असेल तर लष्करी नेत्याना अमान्य अशी भूमिका घेऊन चालणार नाही हे त्यानी ओळखले. अशा परिस्थितीत डाक्का बोलणी अयशस्वी होणार हे उघड होते. पाकवर लष्करी नेत्यानी पकड अजून किती प्रभावी आहे हे या घटनेने स्पष्टपणे दिसून आले.

□ □

साखरेचे अर्थशास्त्र

# उत्पादनवाढ हवी निर्यात कशासाठी ?

साखर या महिनाभरात पोत्यामागे जवळ जवळ ५० रुपयानी महागली. किरकोळ भाव ४ रुपये किलो होता. तो आज ४-६५ रुपयाचे घरात गेला आहे. हा भाव आणखी कडाडून ५ रुपये किलोचे आसपास जाईल अशी भीती आता सर्वत्र वाटू लागली आहे.

साखरेचा यदाचा हगाम सपला. महाराष्ट्रातील सर्व कारखाने (खासगी व सहकारी) आता वद झाले उत्तर प्रदेश, पजाब व इतर काही राज्यात तुरळक ठिकाणी अद्याप उत्पादन चालू आहे. पण पुढील काही दिवसात हेही कारखाने वद होतील.

यदा भारतात साखरेची पैदास गतवर्षापेक्षा ५-६ लाख टनानी कमी म्हणजे ३८-३९ लाख टनापर्यंतच जाईल. कारण कारखान्याना पुरेसा ऊसच मिळाला नाही. गतवर्षीच्या दुष्काळी परिस्थितीमुळे उसाची लागवड सर्वत्र मोठ्या प्रमाणात होऊ शकली नाही. शिवाय पाणी पुरेसे न मिळाल्याने पिकाची जोपासना झाली नाही त्यामुळे त्याचा उतारा जवळ जवळ एक टक्क्याने खाली आला.

दुष्काळाचा फटका महाराष्ट्रालाही मिळाला. उसाची लागवड कमी झाली. अनेक कारखाने पुरेसा ऊस गाळण्यासाठी न मिळाल्याने नेहमीपेक्षा १-२ महिने आधीच वद झाले वास्तविक देशाच्या एकदर साखर पैदाशीपैकी २५ टक्के म्हणजे जवळजवळ ११ लाख टन साखर एकटा महाराष्ट्र पिकवतो. पण यदा महाराष्ट्राचे उत्पादनही १.५ लाख टनानी घसरून अदाजे ९ लाख टनापर्यंतच झाले असावे.

साखरेचा नवा हगाम दिवाळीपासून चालू होतो. पण पुढील वर्षासाठीदेखील साखरेची पैदास फारशी वाढेल अशी चिन्हे दिसत नाहीत. उसाचा अपुरा पुरवठा व त्याच्या वाढत जाणाऱ्या किंमती हा सध्या साखर कारखान्याना भेडसावणारा मोठा प्रश्न आहे. वास्तविक उसाची किंमत सरकारने ठरवून दिल्याप्रमाणे ८५ ते ९० रुपये टन असली पाहिजे पण अनेक ठिकाणी अनेक वेळा ऊसशेतकऱ्याना त्याच्या मालाला १३०-१४० रुपये टन असे भाव मिळाले आहेत. सहकारी साखर कारखान्यानाही हे चढते भाव अप्रत्यक्षपणे द्यावे लागले आहेत.

कच्चा माल म्हणजे ऊसच जर इतका महागला तर साखर स्वस्त कशी होणार ? त्यातच भर म्हणून खताच्या किंमती यदा दुप्पट झाल्या आहेत. ट्रिपल सुपरफॉस्फेट ११४५ रुपये टन होते ते २२४२ रुपये झाले आहे. सल्फरची किंमत गेल्या दिवाळीत ३८६ रुपये होती. ती कडाडून आज ७६२ रुपये टन झाली आहे साखरेच्या वाहतुकीला लागणारी गोणपाटाची पोती २० टक्क्यानी महागली आहेत.

वीज व इधन तेले जवळ जवळ १०० टक्यांनी वर चढली आहेत बँकाचा कर्जावरील व्याजाचा दर ९ टक्यावरून १५ टक्यावर गेला आहे. याशिवाय कारखान्यात काम करणाऱ्या मजुराच्या रोजगारीत ६ डिसेंबर १९७३ पासून प्रत्येकी दर महिन्यास रु. ३३·२२ एवढी हगामी पगारवाढ झाली. ती पुढीलवर्षी आणखीही वाढेल.

हे सत्र असेच जर चालू राहिले तर साखरेच्या किंमती लवकरच वाढवून द्याव्या लागतील यात सशय नाही. साखरेची वाटप व्यवस्था सध्या सरकारकडे आहे. एकदर पैदाशीपैकी ७० टक्के साखर सरकार कारखानदाराकडून नियत्रित दराने (Levy Sugar Prise) घेते व वाकीची ३० टक्के साखर खुल्या बाजारात विकण्यास कारखानदाराना परवानगी देते. मात्र प्रत्येक महिन्यात कट्रोल दराने किती साखर विकावयाची व खुल्या बाजारात किती साखर विकावयास कारखानदारानी परवानगी द्यावयाची याबद्दलची सरकारी आदेश प्रत्येक महिन्याच्या सुरुवातीसच सर्वांना दिला जातो.

तात्पर्य सध्या साखरेचे दोन बाजार आहेत. एक रेशनिगमध्ये प्रत्येकाला कमीत कमी मिळणारी साखर जिचे भाव बाधलेले असतात व दुसरा खुल्या बाजारात किंमती बाधलेल्या नाहीत व किती साखर प्रत्येकाने घ्यावी यावरही बधने नाहीत या पद्धतीला Dual Control दुहेरी वाटप व्यवस्था असे नाव आहे.

सरकार प्रत्येक महिन्यासाठी साधारणपणे ३ लाख टन साखर विक्रीसाठी बाहेर काढते. त्यातील साधारणपणे २ लाख टन Levy ची असते नि बाकीची Free Market ची असते मधून मधून सणासुदीच्या निमित्ताने हे वाटप २५००० ते ३०००० टनांनी वाढविलेही जाते. गेले दोन महिने मात्र हा मासिक ३ लाख टनाचा कोटा कमी करून २·६० लाख टनाचे घरात आणला जात आहे व दिवाळीपर्यंत हा आणखीही कमी होईल असे वाटते.

पुरवठा व मागणी याची व्यवस्थित सागड घालण्याचा प्रयत्न सरकार करीत आहे. पण यदा पुरवठाच ५ लाख टनानी कमी झाल्याने (कारण पैदासच कमी झाली) दर महिन्याचा कोटा कमी करणे सरकारला भाग आहे. याचे उलट साखरेची मागणी मात्र जोराने वाढत आहे नव्या अदाजाप्रमाणे साखरेचे मासिक वाटप कमीत कमी ३॥ लाख टनापर्यंत जावयास पाहिजे. पण प्रत्यक्षात वाटप २॥। लाख टनापलिकडे जात नाही.

तात्पर्य, साखर महागली आहे व आणखी महागणार अशी चिन्हे स्पष्ट दिसत आहेत, कारण अपुरी वाटप व्यवस्था, वाढती मागणी व अपुरे उत्पादन. जोपर्यंत ऊस, खते, मजुरी दळणवळणाची साधने, बँकाचे दर, नवी यत्रसामुग्री वगैरे वस्तूच्या किंमती खाली येत नाहीत तोपर्यंत ही कोंडी अशीच राहावयाची.

साखर महागली व आणखी महागणार याचा दोष नेहमी कारखानदार नी त्याच्या काळ्या बाजाराला दिला जातो पण या बाबतीत बहुसख्य शेतकरी वर्ग, सरकार व साखर-कामगार हेही तितकेच जबाबदार आहेत हे प्रत्येकाने ध्यानात घ्यावयास पाहिजे. सरकारने साखरेवरील अबकारी कर का कमी करू नये ? मजुरानी आपली मजुरी प्रत्येक ठिकाणी वाढवूनच का घ्यावी ? ऊस

शेतकऱ्यानी आपल्या मालाला जास्तीत जास्त भाव मिळावेत म्हणून एवढी यातायात का करावी ? कारखानदारानी देखील आमच्या भाडवलावर आम्हाला १५ टक्के मिळालेच पाहिजेत असा आग्रह का धरावा ? साखर व्यापाऱ्यानीही जास्तीत जास्त नफा कसा मिळेल याची सारखी चिंता का करावी ?

या देशातील साखर उद्योग शेतकरी, भाडवलदार, मजूर, सरकार व व्यापारी याच्यामुळे फोफावला आहे. यातील प्रत्येक घटकाने जर अधिकात अधिक नफा मिळविण्याचा प्रयत्न केला तर सरतेशेवटी देशातील बहुसख्य जनतेला, ज्या जनतेसाठी हा साखर-उद्योग चालू आहे तिलाही आपणच बनविलेली एकदम १०० टक्के स्वदेशी साखर खूपच महाग पडते. परदेशातून ही साखर आयात केली तर ती खूपच स्वस्त म्हणजे २ रुपये किलो पडते.

दुर्दैवाने आपले राज्यकर्ते पुढील निवडणुकीवर डोळा ठेऊन शेतकऱ्याना त्याच्या उसाला जास्तीत जास्त भाव कसे देता येतील याचीच चिंता करतात याचे ताजे उदाहरण म्हणजे उत्तर प्रदेशात ज्या नव्याने निवडणुकी झाल्या त्यात मुख्यमत्री श्री. बहुगुणा यानी आपल्या अखत्यारी उसाचे भाव शेतकऱ्याना अचानक वाढवून दिले व त्याची मते मिळविण्याचा प्रयत्न केला राजकारणात सर्व काही खपून जाते हे म्हणणे ठीक आहे. पण त्यामुळे साखरेच्या किंमती कडाडतात याला उत्तर काय ? प्रत्येकजण स्वत:चा फायदा बघतो पण त्याचा भुर्दंड जनतेला पडतो. जोपर्यंत ही भाडवलदारी व स्वार्थी वृत्ती कमी होत नाही तोपर्यंत हे असेच चालावयाचे.

यात भरीला भर म्हणून आपल्या सरकारने यदा ५ लाख टन (एकदर उत्पादनाच्या १३%) साखर परदेशी निर्यात करण्याचे ठरविले आहे. त्यातील एक लाख टन आतापावेतो परदेशात गेली सुद्धा. सध्या आतरराष्ट्रीय बाजार पेठेत साखरेला खूप मागणी आहे व भावही खूप कडाडले आहेत. या पाच लाख टन साखरेच्या निर्यातीमुळे सरकारला जवळ जवळ २५० कोटी रुपये निव्वळ नफा व्हावा.

भारतातून साखर निर्यात व्हावी यासारखी अभिमानाची गोष्ट नाही. पण ही निर्यात आमच्या पोटाला चिमटे घेऊन होत आहे याचे वाईट वाटते. या निर्यातीमुळे देशातील लोकाना साखर पुरेशी मिळणार नाही हे उघड आहे. आपली गरज आहे वर्षाकाठी ४२ लाख टन साखरेची. पण आपली पैदास जर फक्त ३९ लाख टन झाली व त्यातील ५ लाख निर्यातीत गेली तर देशाची गरज फक्त राहिलेल्या ३४ लाख टनामधून भागवावी लागेल. मग आला साखरेचा तुटवडा व त्याबरोबर वाढणाऱ्या किंमती.

देशातील उत्पादन भरपूर असले व त्यातून आपली गरज भागून राहिलेली पैदास जर निर्यात करता आली तर फारच उत्तम. पण आधीच साखरेचे दुर्भिक्ष व त्यात ५ लाख टनाची निर्यात अशी परिस्थिती निर्माण झाल्यावर जर भाव कडाडले तर जनतेने याचे खापर सरकारवर का फोडू नये ? हे असले अव्यापारेषु व्यापार करून सरकार खरोखरच जनतेचे हित साधीत आहे काय ?

या निर्यातीचे दृष्य परिणाम म्हणून सरकारने साखरेचा देशातील मासिक कोटा ४५००० टनांनी कमी करून २·६० लाख टनापर्यंत खाली आणला आहे हा कोटा पुढील २–३ महिन्यात आणखीही कमी होईल असे वाटते. हा आमच्याच पोटाला आम्ही चिमटा का घ्यावा ? किती दिवस आम्ही हे सहन करावयाचे ? गेली २५ वष हेच चालले आहे. १९४९ सालापासून ते आज १९७४ पर्यंत साखरेचा तुटवडा नाही असे एकही वर्ष नाही. आम्हाला याचा आता वीट आला आहे.

भारताची लोकसख्या दरवर्षी अर्धा पाऊण कोटीने वाढते आहे त्यामुळे कितीही उत्पादन वाढविण्याचा प्रयत्न केला तरी या वाढत्या लोकसख्येमुळे सर्व गणिते सर्व अडाखे, सर्व अदाज चुकतात. वाढत्या लोकसख्येवर वाढते उत्पादन हाच एक सर्वमान्य तोडगा आहे व त्याचीच अमलबजावणी त्वरित व सुलभ रीतीने झाली पाहिजे.

पुढील पाच वर्षांत आणखी १०० सहकारी साखर कारखाने काढण्याचा प्रयत्न केंद्र व राज्य सरकारे करीत आहेत. पण मग खासगी क्षेत्रातही नवे कारखाने निघाले व त्यानी उत्पादन वाढीला मदत केली तर सरकारला त्याचे एवढे वावडे का ? खासगी कारखान्याना यापुढे फारसा वाव दिला जाणार नाही असे सरकारने जाहीर केले आहे, असे का ? उत्पादनवाढ हाच एक सुखाचा व समृद्धीचा मूलमत्र आहे, हे निश्चित झाल्यानतर ही वाढ सहकारी कारखान्यानी केली की खासगी कारखान्यानी केली हा वाद यापुढे दुय्यम आहे.

—राम बोडस


महाराष्ट्र राज्य ग्रंथ-पारितोषिक मिळवणारे
आमचे एक विशेष प्रकाशन

डॉ. सुधीर फडके

**कोठे आणि कधीतरी**

किंमत : दहा रुपये

राजहंस प्रकाशन

महंमद करीम छगला
यांच्या आत्मचरित्राचा
धावता परिचय

अनुवाद : विनय धुमाळे
लेखांक : पाच

# ROSES IN DECEMBER
# रोझेस इन डिसेंबर

## एम्. सी. छगला



ब्रिटनला जायच्या आधीच मी नेहरूंना सांगितले होते की, फार काळ काही तेथे रहाणार नाही. त्या वेळी नेहरू मला म्हणाले होते की, खरं तर मला त्याच वेळी केंद्रीय मंत्रिमंडळातच घ्यायचं होतं. पण फक्त मुसलमान प्रतिनिधित्वाच्या प्रश्नाचा त्यांना विचार करावा लागणार होता. मी त्यांना लगेच सांगितले की, केवळ मुसलमानांना प्रतिनिधित्व या तत्वातून माझी मंत्री म्हणून नियुक्ती होणार असेल तर माझ्या आजवरच्या साऱ्या तात्त्विक भूमिकेला त्याने काळिमा फासला जाईल. कारण आजवर मी ज्या ज्या काही विविध जागांवर काम केलं त्यावर माझी नियुक्ती मसलमान म्हणून नव्हे, तर त्या जागेकरता मी लायक होतो म्हणून झाली आहे. त्यामुळे मी नेहरूंना म्हणालो की, मला केंद्रीय मंत्रिमंडळात तुम्हाला घ्यायचंच असेल तर माझ्या स्वतःच्या कर्तबगारीवरच, लायक असलो तरच घ्या. जातीच्या प्रश्नावरून काही माझी नियुक्ती नको. नेहरू त्या वेळी फक्त आश्वस्त हसले. त्यांना माझं बोलणं पटल्यासारखं दिसलं.

मी ब्रिटनहून आल्यानंतर तावडतोब मला दिल्लीला बोलवून घेण्यात आलं. मी नेहरूंकडेच रहायला होतो. चार-पाच दिवस तसं विशेष काहीच घडलं नाही. एके दिवशी सकाळी अचानक नेहरूंनी

मला विचारलं. 'तुम्हाला कुठलं खातं, मंत्री म्हणून सांभाळायला आवडेल' मी त्यांना तत्परतेने उत्तर दिलं. 'कायदा सोडून बाकी कुठलही.' त्यांना आश्चर्य वाटलं की, सारं आयुष्य मी विधिक्षेत्रात घालवल असताना कायदा खात्याचाच मी अव्हेर का करीत आहे. त्यावर मी त्याना म्हणालो की, विधिक्षेत्रात मत्री म्हणून, फारस काही करता येत यावर माझा विश्वास नाही. त्यानतर माझी आवड मी औद्योगिक मंत्रालयाविषयी दाखवली. कारण लायसेन्सिगच्या प्रश्नाबाबत मला पुष्कळ काही करून दाखवायचं होत. मी जर औद्योगिक खात्याचा मत्री झालो असतो, तर मी जाहीर तबीच देणार होतो की, लायसेन्सकरता जर कुणीही वशिला लावायला आला, तर त्याचा अर्ज आपोआपच रद्द समजला जाईल. पण तस काही घडल नाही.

होता होता माझ्याकडे शिक्षण खातं द्यायचं ठरलं. पण मी नेहरूंना सागितल, की, अबुल कलम आझाद याच्या वेळी जसं शिक्षण खात्यात वैज्ञानिक सशोधन व सास्कृतिक क्षेत्रसुद्धा शिक्षणखात्यात सामावल होत, त्याचप्रमाणे माझ्या शिक्षण खात्यातदेखील वरील दोन गोष्टीचा अतर्भाव मला व्हावयाला हवा होता. कारण या दोन गोष्टीवाचून शिक्षण खात म्हणजे शिक्षण खात्याला काही अर्थच उरणार नव्हता. नेहरूनी ही माझी अट मान्य केली. पुष्कळ दिवसानी मला कळलं की, माझ्या इच्छेखातर नेहरूना आपल्या इतर सहकाऱ्याशी पुष्कळच झगडावं लागल होतं.

मी मत्री झाल्यावर दोन-तीन दिवसानीच महावीर त्यागी मला भेटायला आले. त्यांनी मला सांगितलं की, प्रथम प्रथम मत्री म्हणून, माझी नेमणूक करण्यास त्यानी फारच विरोध दर्शविला होता. पण पार्लमेंटमध्ये मला बघून व माझी एकदर खात्याची हाताळणी बघून त्याच मत साफ पालटलं होत. त्या अर्थाच त्यानी नेहरूना पत्रदेखील लिहिल होत. नेहरूनीही त्याना एक उलट पत्र लिहिल होत्र व ते पत्रच मला द्यायला महावीर त्यागी आले होते. मी ते पत्र वाचल व गहिवरलो. कारण आजपर्यंत नेहरूनी त्याना स्वत.ला माझ्याविषयी काय वाटत हे बोलूनच दाखवल नव्हतं. पण मी ते पत्र वाचल व नतर मला कळल की, नेहरूच्या मनात माझ्याविषयी किती गाढ आदर होता, किती निर्व्याज प्रेम होत ते. ते पत्र अजून मी जपून ठेवल आहे. ते पत्र मला दिल्याबद्दल मी महावीर त्यागीचे मनोमन आभार मानले.'

त्यानतर एकदा नेहरूनी मला कॉंग्रेसचे अध्यक्ष श्री. संजीव रेड्डी याना सहज भेटून यायला सांगितल. त्याप्रमाणे मी कॉंग्रेस सदनात गेलो. मी जेव्हा त्यांच्या खोलीत गेलो तेव्हा ते टेबलावर पाय टाकून स्वस्थपणे 'द न्यू स्टेटस्मन' वाचीत होते. त्यामुळे त्यांच्याविषयी माझ्या मनातला आदर एकदम वाढला. कारण जो मनुष्य न्यू स्टेटस्मन वाचतो त्याला राजकीय घडामोडीच चागलंच ज्ञान असलं पाहिजे व तो मनुष्य हुशारच असला पाहिजे असं माझ्या मनाने जणू समीकरणच केल आहे.

त्या नतर मी नेहरूच्या आग्रहावरून खादी विकत घ्यायला गेलो. त्यांच्या शिप्याकडून अचकन व चुडीदार शिवून घेतले. नतर मला कळल, की साधी खादी किती महाग असू शकते ती.

तसं मला शिक्षणाच क्षेत्र काही नवीन नव्हत. मी पूर्वी गव्हर्मेंट लॉ कॉलेजमध्ये शिकवीत होतोच. त्या नंतर मी मुंबई विद्यापिठाचा उपकुलगुरु होतो. त्यामुळे या क्षेत्राला मी काही संपूर्णतया नवीन नव्हतो.

मी जेव्हा शिक्षणमंत्री झालो तेव्हा खात्यासमोर अनत अडचणी होत्या. एकतर शिक्षण हा विषय राज्यसरकाराच्या अखत्यारीतला होता. त्यामुळे दिल्लीला बसून या बाबतीत फारच थोडे करता येण्यासारखे होते. बरं मी हा विषय केंद्र व राज्ये या दोघाच्या अखत्यारीत करू या म्हणून सर्व राज्याना सुचवले. पण असलेल्या सत्तेचा कुठलीच राज्ये त्याग करू इच्छित नव्हती. फक्त पजाबचा अपवाद सोडून.

मला अस वाटायचं की देशातलं शिक्षण हे नेहमी चालू घटकेला अनुलक्षून असले पाहिजे. आजकालच युग हे विज्ञान युग आहे. बरं मला असे ठामपणे वाटायच की शिक्षणाने काही विशिष्ट उद्दिष्टे साधली जाणार नसतील तर ते शिक्षण खोटं शिक्षण आहे. शिक्षणाच्या माध्यमाविषयी माझं अस मत होत की शिक्षण हे बालकाला नेहमी त्याच्या मातृभाषेतूनच दिले पाहिजे. पण त्याचवेळी आपल्याकडे त्या प्रश्नाचा विचार करताना त्यातली गुतागुत लक्षात येते. आपल्याकडे सर्वमान्य अशी राष्ट्रीय भाषा नाही. अनेक भाषा अनेक उपभाषा, बोलीभाषा यानी नुसता प्रचड गोंधळ उडाला आहे. शिक्षण हे मातृभाषेत असल पाहिजे हे ठीक आहे पण ती मातृभाषा सर्व देशभर ओळखली गेली पाहिजे. सर्व राष्ट्राच्या व्यवहाराकरता एक समान भाषा ही असलीच पाहिजे. त्या भाषेतून वैज्ञानिक सशोधन आणि तात्त्विक चर्चा शक्य झाल्याच पाहिजेत. एका भारतीयाच्या भाषणाचा आस्वाद दुसऱ्याला घ्यायच्या असल्यास त्याला अनुवादक लागेल, अशी स्थिती जर एक राष्ट्रीय भाषा नसेल तर होईल.

## एका लिपीचा निष्फळ प्रयत्न

घटनेप्रमाणे हिंदी ही सर्वसामान्य राष्ट्रीय भाषा आहे. पण त्या हिंदीलासुद्धा देशाच्या काही भागात तीव्र विरोध आहे. त्यामुळे ह्या हिंदीचा उपयोग करून घेताना बगाली वा दाक्षिणात्याना अस वाटू नये की ही भाषा आपल्यावर लादली जात आहे. हिंदी वापरताना प्रत्येक पायरी पायरीवर थाबल पाहिजे. विरोधकाना समजावून सागितले पाहिजे व नतरच हिंदी राष्ट्रीय भाषा म्हणून उपयोगात आणली पाहिजे. कारण मी शिक्षण मत्री असताना हिंदीकडे एक भाषा म्हणून कोणी बघत नव्हत. एक भावनिक दृष्टिकोणातून, लढ्याचा मुद्दा म्हणून लोक हिंदीकडे बघत होते. अशा वेळी हिंदी हीच राष्ट्रीय शिक्षणाची भाषा ठरवणे हे फारच धोक्याच ठरल असत. या हिंदी प्रश्नावरून लोक राष्ट्रीय भावना, आपल राज्य हा एक हिंदुस्थानचाच भाग आहे, हे सपूर्णपणे विसरून गेले होते.

मी त्यावेळी जादवपूर विद्यापीठाच्या पदवीदान समारंभाच्या वेळी म्हणालो, की प्रादेशिक भाषातून विद्यार्थ्यांना शिक्षण मिळाव हे मलासुद्धा पटत. पण जर योग्य तयारी न करता आपण इग्रजीवरून प्रादेशिक भाषावर उडी मारली तर शैक्षणिक दर्जावर त्याचा नक्कीच परिणाम होईल.

त्यामुळे इग्रजीच्या ऐवजी प्रादेशिक भाषेतून शिक्षण हा बदल अत्यत विचारपूर्वक व धीमेपणाने केला पाहिजे. घिसाड-

घाईने काही निर्णय घेतल्यास देशाच्या शैक्षणिक क्षेत्रावर अनिष्ट परिणाम झाल्यावाचून काही राहाणार नाही. कारण प्रादेशिक भाषात साधी क्रमिक पुस्तकेसुद्धा तयार नव्हती. शास्त्रीय विषय प्रादेशिक भाषातून शिकवायला तर आपल्याला जबरदस्तच तयारी करावी लागणार होती. झटपट बदलाने एकतर शैक्षणिक दर्जा खालावेल व राष्ट्रीय एकात्मता सुद्धा धोक्यात येईल

कोणीतरी म्हणाल की याचा एक 'क्रॅश प्रोग्रॅम' करून टाका. करोडो रुपये खर्च करून चागले अनुवादक काही निर्माण करता येत नाहीत. त्यामुळे प्रादेशिक भाषातून उच्च शिक्षण द्यायला आपल्याला पुष्कळच तयारी करावी लागणार होती. परतु या प्रादेशिक भाषेमधून शिक्षण देण्यामुळे नक्की किती लिप्या विद्यार्थ्याने शिकायच्या यावरही गोधळ झाला असता. उत्तर हिंदुस्थानी विद्यार्थ्याला देवनागरी व रोमन अशा दोन, तर दक्षिण हिंदुस्थानातल्या विद्यार्थ्याला देवनागरी, रोमन व त्याच्या प्रादेशिक भाषेची एक अशा तीन लिप्या शिकाव्या लागणार होत्या.

त्यावेळी एक लिपी या विचाराला मी फार अनुकूल होतो. यादृष्टीने मी अनेक मुख्यमत्र्याशी चर्चा केली पण त्याचा काहीच उपयोग झाला नाही. माझ्या काही उर्दू मित्रानाही मी उर्दूचे लिखाण देवनागरीतूनही करावे याबद्दल विचारले. त्यायोगे उर्दू पुष्कळच लोकप्रिय करता आली असती. पण नाही, त्यालाही त्यानी मान्यता दिली नाही. मी बघितले आहे की जेथे भावना खोलवर दडलेल्या असतात अशा प्रश्नावरती विचाराचा काहीच परिणाम होत नाही. सारे प्रयत्न निष्फळ ठरतात.

## अर्थखात्याचा सासुरवास

मी आपल्या मत्रालयात सकाळी ठीक १० वाजता येत असे. मत्र्याने स्वत वक्तशीर राहिल्याखेरीज त्याचा अधिकारी वर्ग एकनिष्ठ राहू शकत नाही. मी तेथे रात्री ८ वाजेपर्यंत बसत असे. त्यावेळी माझा वैयक्तिक अधिकारी वर्ग सोडून इतर सर्वजण गेलेले असायचे.

साधी एखादी फाईल मत्र्याकडे यायची असल्यास कनिष्ठ अधिकाऱ्याकडून अडर सेक्रेटरी, मग जॉइंट सेक्रेटरी, मग सेक्रेटरी मग माझ्याकडे, अशी यायची, त्यात मी पुष्कळच बदल केला. अनेक वेळेला मी त्या सबधीत अधिकाऱ्याला बोलवून घ्यायचो व तेथल्या तेथे निर्णय घ्यायचो. आमची दुसरी एक डोकेदुखी म्हणजे अर्थखाते. अनेक निर्णयात अडथळे आणण्यात अर्थखात्याएवढे कार्यक्षम खाते दुसरे कुठलेच नाही. प्रत्येक खात्याचे बजेट पास झाल्यानतरही अर्थ खात्याचा एक मनुष्य आमच्या सगळ्या खर्चावर डोळ्यात अक्षरश: तेल घालून छाननी करायचा. मला वाटले होते की आपल्या खात्याचे बजेट पास झाल्यावर तरी आपल्याला स्वत च्या जबाबदारीवर पैसे खर्च करायला मिळतील. पण नाही. आमच्या कुठल्याही खर्चाला अर्थखात्याची मजूरी लागायची व त्याच्या मते आमचा प्रत्येक खर्च हा निव्वळ वृथा खर्च असायचा.

पार्लमेंटने जवाहरलाल नेहरू विद्यापीठाकरता रक्कम मजूर केल्यानंतरही आम्हाला अर्थखात्याने विचारले होते, की दिल्लीला एक विद्यापीठ असताना परत दुसऱ्या विद्यापीठाची गरज काय ? त्यावर मी भडकलो. व फायलीवर लिहून पाठवल की याच्याशी अर्थखात्याचा मुळीच सबध नाही. तेव्हा नसत्या चौकशा त्यानी करू नयेत. ही शिक्षणमंत्र्याची व पार्लमेंटची जबाबदारी आहे. सांगायला नकोच, की रक्कम तावडतोब मजूर झाली. अर्थखात्यातल्या अधिकाऱ्यांना दुसऱ्याची अडवणूक करण्यात अतिशय क्रूर आनद होत असतो की काय कोण जाणे ?

मला नेहमीच अस वाटत की प्रत्येक खात्याची जबाबदारी ही शेवटी त्या खात्याच्या मत्र्यावर असते. त्यामुळे लोकसभेत मी नेहमी म्हणायचो, की काय हल्ला करायचा असेल तो माझ्यावर करा. माझ्या अधिकाऱ्यावर नको. मी शिक्षणमत्री असताना तीन महत्त्वाची बिले लोकसभेत आली. एक म्हणजे नावातला बदल. बनारस हिंदु युनिव्हर्सिटीमधला हिंदू शब्द काही योग्य नव्हता. कारण ते काही एका विशिष्ट जातीचे विद्यापीठ नव्हते. मी लोकसभेत सागितल, की जर बनारस हिंदू युनि. मधला हिंदू शब्द गाळण्यात आला तर तशीच दुरुस्ती मी अलिगड मुस्लिम विद्यापीठाबाबत करून घेईन. पण नाही. परत तेथे भावनेचा प्रश्न आला. त्यामुळे या प्रयत्नाला काही यश आले नाही. दुसरे बिल म्हणजे जवाहरलाल नेहरू विद्यापीठाचे बिल व तिसरे म्हणजे दिल्ली स्कूल्स बिल हे त्या मानाने तितकेसे महत्त्वाचे नव्हते.

सप्टेंबर-ऑक्टोबर १९६६ च्या सुमारास विद्यार्थ्यांचे तीव्र दगे अनेक ठिकाणी चालू झाले होते. शैक्षणिक क्षेत्रातली सारी शिस्तच जणू कोलमडल्यागत झाली होती. त्यावेळी दुर्दैवाने मी मुबईत हॉस्पिटलमध्ये चागलाच आजारी होतो. मी दिल्लीला आल्यावर माझ मत व्यक्त केल की हा काही केवळ शिस्तीचाच वा केवळ शातता व सुरक्षिततेचाच प्रश्न नाही. विद्यार्थ्यात ध्येयवाद होता, धडाडी होती, उत्साह होता व नेतृत्वाचे गुणही होते. पण दुर्दैवाने त्या गुणाचा कधी उपयोगच करून घेण्यात आला नव्हता. शिक्षणाचा दर्जा खालावत होता. विद्यार्थी व शिक्षक यामधल सतुलन पार खलास झाल होत विद्यार्थ्याला साधं आपल्या शिक्षकाला मनमोकळेपणाने भेटता देखील येत नसे. उपकुलगुरूची निवड अनेक वेळेला राजकीय असे. विद्यार्थी स्वत च्या डोळ्यानी पहात होते, की फर्स्ट क्लास आलेल्या माणसाला डावलून थर्ड क्लासमध्ये आलेल्या लोकाना प्राध्यापकाची जागा मिळत होती. असुरक्षिततेची भावना युवकामध्ये पसरत चालली होती. उपकुलगुरूना भेटायला विद्यार्थ्याला सहा सहा महिने थाबाव लागत होतं. सगळीकडेच अनिष्ट प्रकार होत होते. ह्याची कारण वरवरची नव्हती तर मुळं फार खोलवर पोहचली होती. प्रत्येक युवकाला ठाऊक होत, की त्याच्या आजूबाजूच्या समाजात भ्रष्टाचार, लाचलुचपत बोकाळली आहे. त्यामुळे युवकाच्या मूलभूत श्रद्धेलाच जणू तडा गेला होता.

त्यातच त्यावेळी एक घटना घडली, तिचे पडसाद देशभर उमटले. त्यावेळी अलीगड मुस्लिम विद्यापीठाच्या उपकुलगुरूपदी श्री. बद्रुद्दिन तय्यबजी होते. ते आय. सी. एस. होते. अत्यत कर्तबगार होते यात काहीच शका नाही. पण विद्यार्थ्यांमध्ये ते खास मिसळत नसत व दुसरे म्हणजे ते तसे फारच रिजीड होते. विद्यापीठाचा कारभार म्हणजे केवळ एखाद ऑफीस चालवणे नव्हे. त्याला इतरही अनेक गोष्टी आवश्यक असतात. सहानुभूतीची जरूर असते. अलिगड विद्यापीठात एक ग्रुप अत्यत जात्यध होता व दुसरा त्यांना विरोध करणारा होता. त्यामुळे या दोन गटात तेथे नेहमीच सघर्ष रहायचे.

ही परिस्थिती बदलावी म्हणून मी तेथल्या उपकुलगुरूंची बदली करायचे ठरविले श्री. तय्यबजींच्या जागी मी श्री. अलियावरजग याना नेमले. तर एका युवकाच्या गटाने (जो जग याच्या नेमणुणुकीच्या विरूद्ध होता) जग याच्यावर अक्षरश: प्राणघातक हल्ला केला व त्याना जखमी केले तेथे हजर असलेल्या विद्यापीठ पदाधिकाऱ्यानीही जग यांना मदत करायची सोडून तेही नुमते पहातच राहिले. इतर बाबीतही जग याना सारखे अडथळे आणण्यास सुरुवात झाली. यामुळे मी ताबडतोब मत्रिमडळाची बैठक घेऊन त्यात अलिगड विद्यापीठाचे सिनेट व कोर्ट बरखास्त करून सरकार नियुक्त सभासदाचे सिनेट व कोर्ट स्थापन करायची मजूरी घेतली. त्यामुळे माझ्यावरती विद्यापीठाच्या कारभारात व स्वायत्ततेत ढवळाढवळ करणारा हुकूमशहा म्हणून आरोप व्हायला लागले. त्यावेळी तथाकथित राष्ट्रीय मुसलमानाच वर्तन बघूनही मला खेद झाला. पण माझ्या या कृतीने अलिगड विद्यापीठ परत शाततेने नादायला लागल. व विद्याभ्यास परत व्यवस्थित चालू झाला. ते पाहून माझ्यावर केलेल्या आरोपाच मला काही विशेष वाटल नाही. विशेषत: अलिगढमधला मुसलमान विद्यार्थी वर्ग त्यावेळी माझ्यावर फारच खवळला होता. त्या विद्यार्थ्यांच एक शिष्टमडळ मला भेटायला आल होत. त्यावेळी इतर सर्व प्रश्नावरती चर्चा झाल्यानतर त्यानी मला विचारले, की अलिगढच्या विद्यार्थ्यासमोर भाषण करायला मला आवडेल का ? त्यावर मी त्याना सांगितले, की जरी माझ्या जीवनाविषयी मी फारसा आसक्त नसलो, तरी मला नैसर्गिक मरण आल्यास हवं आहे ! त्यामुळे मी त्याच आमत्रण सहाजीकच नाकारल.

मी शिक्षणमत्री म्हणून युनोस्कोच्या सभेसाठी गेलो. तेथेच माझी फ्रान्सचे प्रख्यात विचारवत लेखक श्री. आद्रे मॉलरा याच्याशी भेट झाली. अत्यत विद्वान व विलोभनीय गृहस्थ यात काहीच शका नाही. कलाक्षेत्राबाबतचं त्याच ज्ञान खरोखरच वाखाणण्यासारख होत. त्यानी लिहिलेल्या, म्युझिअम विदाउट वॉल्स या पुस्तकाने मी विलक्षण प्रभावित झालो होतो.

मॉलरा नेपोलियनचे फारच चहाते होते. तेथे असताना फ्रान्समधले आपले राजदूत श्री. अलीयावर जग यानी त्याना व मला खाण्यासाठी एका खास हॉटेलमध्ये बोलावले. मला कळेना की, एवढ लहानस हॉटेल श्री. जग यानी का निवडल होत. तर जग यानी मला सांगितल की, ते नेपोलियनचेसुद्धा आवडीचे हॉटेल होते व मॉलरा त्याच्या तरुणपणात याच हॉटेलमध्ये जायचे. त्याच वेळी मॉलराच्या दोन्ही मुलाच मोटार अपघातात निधन झाल होत. पण ज्या धैर्याने ते अफाट दु:ख पेलीत होते ते बघून मी स्तिमित झालो. मॉलरा याच्याबरोबर बोलण म्हणजे एक निखळ आनद होता. ते बोलत असतानाच तुम्हाला पुष्कळ काहीस मिळत असत. तुम्ही शिकत असता.

त्याच वेळी मी रशियालासुद्धा भेट दिली. ती भेटसुद्धा अविस्मरणीय आहे. एका मुक्त म्हणून मानल्या गेलेल्या समाजातून मी एका बदिस्त अशा मानल्या जाणाऱ्या समाजाकडे जात होतो. हा वातावरणाचा बदलसुद्धा लगेच जाणवतो. पण रशियाने शास्त्र व विज्ञान याच्यात प्रचड प्रगती केली आहे. साऱ्या जगात आज तो या क्षेत्रात आघाडीवर आहे. आजच्या काळाची आव्हाने स्वीकारण्यास रशिया त्यामुळेच सपूर्णतया समर्थ आहे मला मास्को शहर तसं काही विशेष आवडल नाही. अत्यत कटाळवाणं शहर. क्रेमलिन तर भेडसावणार वाटत. पण त्या मानाने लेनिनग्राड शहर मला फार आवडल. तेथेच मला डॉक्टर ऑफ लॉज ही पदवी देण्यात आली. लेनिनही याच विद्यापीठात शिकला होता. त्यामुळे निदान दूरान्वये तरी त्याची सगत आपल्याला लाभली या विचाराने मी फारच खूश झालो होतो

केंद्रीय शिक्षणमत्री म्हणून तशी जबाबदारी पुष्कळ असते. पण ती पार पाडण्याकरता अधिकार मात्र काही खास नसतात. शिक्षण हा भारतातला एक अत्यत मोठा प्रश्न आहे. सख्येच्या दृष्टिकोनातून त्या प्रश्नाकडे बघा की सस्थेच्या दृष्टिकोनातून त्या प्रश्नाकडे बघा तो प्रश्न अति प्रचडच आहे. आपल्याला प्रश्न काय आहेत ते माहीत आहेत त्याची बरीचशी उत्तरेदेखील माहीत आहेत. पण त्या प्रश्नाना उत्तरे देण्याकरता कार्यरत होण्याच जे धाडस वा धैर्य लागत तेच कमी पडत आहे. पैशावाचून देखील या क्षेत्रात पुष्कळच करता येण्यासारख आहे. मत्र्याचा अधिकार या बाबतीत खरच फार मर्यादित आहे पुष्कळ काही करता येण्यासारख आहे. पण जरूर आहे ती निष्ठेची, निष्ठावत कार्यकर्त्यांची.

[ क्रमश: ]

शनवारवाड्यातील शमादान

ब. मो. पुरंदरे

किमत साडेतीन रुपये

राजहंस प्रकाशन पुणे ३०

**● म. अ. दळवी ●**

# पेटीवरची चकती



ते जेव्हा त्याच्या घरी पोचले तेव्हा तो वर्तमानपत्र वाचीत आराम खुर्चीवर पडला होता. त्यांना पाहून तो दचकला होता असं म्हणता येणार नाही. किंबहुना तसं घडणं त्याला अपेक्षित वाटत असावं.

ते आत आले. त्यांनी सरळ सरळ आपल्या चौकशीस आरंभ केला. प्रश्न विचारले जात होते. उत्तरं येत होती. पण त्यांना अपेक्षित असं त्या संभाषणातून काही बाहेर पडत नव्हतं. पण अश्रू ढाळून, अती दुःख दर्शवून, आवंढे गिळीत, तुटक तुटक उत्तरं देऊन आपण अतिशय दुःखात पडलो आहोत असं त्यानं यशस्वीरीत्या दाखवून दिलं होतं. शेवटी ते तेथून निघून गेले. त्यालाही मोठं हायसं वाटलं असावं.

ते संभाषण चालू असताना त्यांची नजर त्याच्या खोलीत काहीतरी शोध घेत होती. पण त्यांना हवं ते आणि विशेष असं काही सापडलं होतं असं म्हणता येणार नाही. नाही म्हणावयाला त्याच्या चार दोन पेटचांपैकी एका पेटीवर मात्र त्यांची नजर क्षणभर खिळली. त्या पेटीला एक चकती होती. त्या चकतीवर निराळंच नाव होतं. तिच्यावर नावाखाली पत्ता होता. तो त्यांनी नीट स्मरून घेतला.

त्याला जे दुःख झालं होतं ते त्याच्या नूतन प्रेयसीच्या आकस्मिक खुनामुळं. तीच वार्ता तो वर्तमान पत्रात वाचीत होता जेव्हा ते त्याच्या घरी पोचले होते. ती त्या शहराच्या एका प्रासादात मोलकरीण म्हणून काम करीत होती. थोरामोठ्यांच्या शिफारशीवरून तिला नेमण्यात आलं होतं. तो प्रसाद एका राजेसाहेबांचा होता. त्याचं नुकतंच नूतनीकरण करण्यात आलं होतं. त्या दिवशी राजेसाहेब प्रासाद आता कसा काय दिसतो आहे व तेथे अधिकउणं काही आहे का हे पहावयास आले होते. ती तेथे नव्हती म्हणून आश्चर्य आणि उद्वेगही वाटला. पण कामाच्या इतर गडबडीमुळं धावतं सामालोचन करून ते थोडचाच अवधीत तेथून निघून गेले. आपल्या अधिकाऱ्यास तिची चौकशी करण्यासंबंधी सूचना त्यांनी साहाजिकच दिल्या होत्या. अधिकाऱ्यांनी आता कसून तपासणी केली. त्यांना दोन-तीन खोल्या बंद आढळल्या. त्यापैकी जी पहिली त्यांनी दार मोडून उघडली तेव्हा ते आतील दृश्य पाहून अवाकच राहिले! त्यांना वाकलेल्या स्थितीत एका खुर्चीवर तिचा देह आढळला. पाठीमागून पिस्तुलाच्या गोळचा घालून तिचा खून करण्यात आला होता. अर्थात पोलिसांना त्वरित कळविण्यात आलं. ते तेथे उपस्थित झाले. तेथील तपासात त्यांना गोळीचं एक वेष्टन सापडलं. ते तिच्या खुर्चीजवळ पडलं होतं आणि समोरच्या भिंतीत रुतलेली गोळीही त्यांना आढळली. त्या शिवाय तिच्या नावे लिहिलेलं पण न उघडलेलं असं एक पत्रही त्यांना आढळलं. त्यावरून त्यांना कळलं होतं की ती त्या गृहस्थाच्या प्रेमात पडलेली होती. दूरध्वनीवरून कित्येक वेळा आपण बोलण्याचा प्रयत्न केला. पण काहीच प्रतिसाद मिळाला नाही म्हणून ते पत्र होतं

अधिक चौकशीअंती तिच्या बहिणीकडून त्याचा पत्ता त्यांना मिळाला होता. तिचा त्याच्याबरोबर साखरपुडाही नुकताच झालेला होता असंही त्यांना कळलं होतं.

त्याच्या त्या भेटीमध्ये त्यानं आपण अनेक वेळा तिच्याशी संपर्क साधण्याचे प्रयत्न केले हे सांगितलं होतं. आपलं मत म्हणून त्यानं विव्हळून सांगितलं, "महाराज, त्या

प्रासादात अनेक रंगाढंगाच्या व्यक्ती येतात राजेसाहेब तेथे असताना. त्यापैकीच कुणा तरी मारेकऱ्याच हे काम असल पाहिजे!" अर्थात त्याचं समाधान मुळीच झालेल नव्हत.

अधिक चौकशीनतर त्याना त्याचा व्यवसाय गोदीत रंगाऱ्याचा होता असे समजले.तो जेथे काम करीत असे त्या गोदीत ते गेले.तेथे इतरही काही रगारी होते. त्यांच्याशी चौकस पणे सभाषण करून त्याना अस कळल की, त्यापैकी एका रगाऱ्यान त्याला एक पिस्तूल खिशातून काढून दाखविल होत. ते भरलेलं आहे असही त्यान म्हटल होत. त्यावर त्या रगाऱ्यान त्याला त्याच्याशी खेळू नकोस असाही इशारा दिला होता. ही माहिती त्याना मिळताच त्याच्या चौकशीच रगरूप पार पालटून गेल. त्यानी त्या पिस्तुलाबद्दल सखोल चौकशी सुरू केली.

पण तत्पूर्वी त्याना अस आढळू आल की, त्याच लग्न झालेल होत. त्याला खोटे चेक वटविण्यासबधी सशयित मानण्यात आलेल होत. त्यापैकी एक राजेसाहेबाच्या दिवाणजीच्या नावाचा होता. तो आपल्या रगारी म्हणून लाभणाऱ्या वेतनात आपल्या प्रेयसीला उची वस्तू कशा काय आणून देत होता हे त्याच त्यालाच टाऊक. पण तिच्या मृत्यूपूर्वी आता विवाहाच्या निमित्तान त्यान त्या प्रासादातूनच राजेसाहेबाचा सदर्भ देऊन एका मोठ्या जवाहिऱ्याला काही किंमती आगठ्या आणावयास सागितल होत. जवाहिऱ्याचा विक्रेता राजेसाहेबाच नाव ऐकून तेथे आला. त्यान त्या विक्रेत्याच स्वागत केल. तिच्यासाठी एक उची आगठी निवडली नि तिच्या किंमतीचा एक चेक लिहून दिला. पण त्या विक्रेत्यान तो चेक लिहीत असताना अडखळलेला पाहिला होता. पण त्यान मोठ्या नम्रतेन त्याला सागितल, "महाराज, आमची अशी प्रथा आहे की, चेक वटविल्यानतर आम्ही वस्तु ज्याची त्याला देत असतो. आजच्या आज मी चेक पेढीत देईन. एकदोन दिवसात तो वटेल. अन् अगठी आपणाकड त्वरित पोचवली जाईल!" तो चेक दोनदा पेढीन परत पाठविला. त्यासबधी जवाहिऱ्याच्या त्या विक्रेत्यान चौकशी केली. तेव्हा दूरध्वनीवर तो नव्हता. ती दूरध्वनीवर होती. तिला या प्रकाराच आश्चर्य वाटलं! पण त्या सदेशानं तिचा भ्रम उडालेला असावा. त्या सदेशानंतर ती तिच्या मृत्यूच्या दिवशी घराबाहेर लगबगीनं पडली. शेजारातील काही स्त्रियानी तिला तस जाताना पाहिल होत. नतर काही क्षणात तोही तेथे येऊन गेलेला होता. त्याला कळल असाव की, चेक न वटल्याच तिला समजल असाव. तो त्यानतर ते पिस्तूल घेऊन आला असावा. तिच्या खुर्चीजवळ दूरध्वनी यत्र अर्धवट उचललेल होतं. ती कदाचित पोलिसांना बोलावीत असावी. तेवढ्यात त्यान मागाहून गोळी झाडली असावी.त्याला पिस्तुलाबद्दल विचारल असताना आपण ते तिला विचित्र इसम तेथे येत असत त्याचा उपद्रव झाल्यास उपयोगी पडाव म्हणून दिल होत असं सागितल. त्याचा बचावही याच धारणेवर करण्यात आला होता. पण तो अपेक्षेप्रमाण फोल ठरला! व तो दोषी ठरला होता.

आपला पुरावा सबळ होण्यासाठी त्याना विशेष माहिती हवी होती. जी गोळी भिंतीत सापडली होती तिची सर्वतोपरी छाननी करण्यात आली होती. ज्या पिस्तुलातून ती उडविण्यात आली होती तिच्या एका भागावर विशिष्ट व्रण उमटलेला होता. पिस्तूल मिळाल नव्हत. ते मिळेलच अशी खात्री नव्हती.

पण आशेचा एक किरण त्यांच्या मनात चमकून गेला. त्याना त्या पेटीवरील चकतीवर लिहिलेल नाव आणि पत्ता आठवला. ते त्या पत्त्यावर पोचले. त्या घराच्या मालकीणबाई सहकार्यपूर्ण दिसल्या. त्यानी त्याना त्या ग्रहस्थाची माहिती दिली. तो त्याच्याकड रहात असे. आता तो सैन्यात दाखल झाला आहे. पण या बातमीन त्यांच्या चौकशीचा विस्तार फारच व्यापक झाला. एवढ्या मोठ्या सैन्यात आपणास हवा असलेला तेवढा माणूस त्याना आता टिपावयाचा होता. पण त्यानी या गोष्टीचा विरस मानून घेतला नाही. वर एवढ करून त्या व्यक्तीकडून विशेष काही निष्पन्न झाल नाही म्हणजे शून्य!

सैन्याच्या भरती केंद्रातून त्याना लवकरच माहिती मिळाली. त्याप्रमाण ते त्याला भेटावयास गेले. त्याच्या बोलण्यातून अस निष्पन्न झालं की ते पिस्तूल त्याचच होतं. तो ते मागत होता पण आपण ते द्यावयाचे नाकारलं. पुढं त्यानं ते चोरलं. दुसरं कोणी चोरणं शक्य नव्हत. त्यास पत्र लिहूनही त्यानं काही उत्तर दिल नाही. पिस्तुल गमावून बसल्यामुळ त्यास विशेष खेद होत होता. त्याच्या दडेली स्वभावामुळ पोलीस सहाय्य घेणही शक्य झाल नव्हत. अशी ही उपयुक्त माहिती त्यास मिळाली. पण त्याच्याजवळ त्या पिस्तुलाच्या गोळ्या उपलब्ध नव्हत्या आपण जेव्हा ते घेतल तेव्हा एकदाच नदीकाठी ते कस चालत हे पाहाण्यासाठी वापरलं होत अशीही पुस्ती माहिती मिळाली होती. सभाषणाच्या एकदोन बैठकीनतर त्याना अस समजल की ती गोळी आणि तिच वेष्टण त्यान गोळा करून घरी आणल होत.

'आपल्याजवळ ते वेष्टण असेल का?' त्यानी काहीशा उत्सुकतेन विचारलं.

'त्या वेष्टनाचा मी चिकटफीत गुडाळण्यासाठी उपयोग केला होता' स्मरण शक्तीवर ताण देत त्यान उत्तर दिल, 'अन् मला आठवत की मी तो फितीचा गोळा माझ्या मेजाच्या खणात ठेवला होता!'

ती गोळी कुठतरी गहाळ झाली असावी त्यान खुलासा केला. पण वेष्टण जरी मिळाल तरी त्याच भागण्यासारखं होतं. पण चिकटपट्टी गुडाळली गेल्यामुळं वेष्टणात काय बदल घडला असेल हे मात्र आता त्याना सागता येण्यासारख नव्हत. पण आशावाद मोठा होता. तेवढी माहिती मिळाल्यावर ते परत तो जेथे राहात होता तेथे आले.

घरमालकीणबाईंनी त्याना त्याची खोली दाखविली. पण त्या बाईन काही दिवसापूर्वीच ती स्वच्छ केली होती. कारण तिला नवा भाडेकरू घ्यावयाचा होता. पण तिन त्याच उरलेल सामान आणि फुटकळ वस्तू त्यान माग ठेवलेल्या एका पेटीत भरून ठेवल्याच सागितल. अजूनही ते वेष्टण सापडण्याची आशा होती. त्यानी प्रथम ती सर्व खोली छानून काढली. नतर ते त्या पेटीकड वळले त्याचे काही कपडे होते ते एक एक वेगळे करून प्रत्येक खिसा चाचपून ते शोध घेऊ लागले. तळाला त्याचा किना खाकी घरी घालावयाचा बाह्य डगला होता. तो त्यांनी बाहेर काढला अन् त्याच्य-

खणात काहीसं आढळलं. त्यांना खचितच वाटलं हेच ते वेष्टण असावं. अन् ते सत्यही होतं. अजूनही त्याला काही फेरे चिकटपट्टीचे लपेटलेले होते. त्यांनी ते ताब्यात घेतलं. त्याचे कपडे जसेच्या तसे नीट घडचा करून परत ठेवले. पेटी बंद केली नि मालकीणबाईच्या ताब्यात परत दिली.

त्यानं खरी माहिती सांगितली होती तर! नंतर ते पुन्हा त्याच्या खोलीत आले. ती गोळी कुठं असेल का? मालकीणबाईच्या स्वच्छता मोहिमेत ती कुठंतरी खणात अडकून बसली असली तर लक्षात येण्याजोगं नव्हतं. प्रयत्न तरी करावा म्हणून त्या खोलीत तो जे मेज वापरीत होता त्याचा एक एक खण काढून त्यास हलवून त्याच्या खाचाखोचा न्याहाळून आणि हातानं ठाकठोक करून पाहू लागले अन् आता मात्र त्यांना खचित समाधान झालं. त्यातील एका खणातून एक गोळी घळकन् खाली आली. ती त्यांनी उचलून घेतली. पण ही गोळी आपणास हवी तीच असेल का?

आपणास सापडलेले ते दोन पुरावे घेऊन ते आपल्या कार्यालयात आले. ते पुरावे प्रयोग शाळेकडं पाठविले. पूर्वीच्या खुनाच्या जागेवर सापडलेले दोन पुरावे तारतम्यात्मक अभ्यासासाठी पाठविले. प्रयोग शाळेकडून अहवाल येण्यावर आता सारं अवलंबून होतं.

मध्यंतरीच्या काळात त्याला पकडण्यात आलं होतं. कसून चौकशी करता त्यानं आपण 'पिस्तूल समुद्रात टाकून दिलं!' अशी माहिती दिली. ते जरी सर्वथा सत्य नसलं तरी शक्य होतं. कारण तो गोदीत काम करीत असे तेथे त्याला तसं करणं शक्य होतं.

त्याच सुमारास त्याचा खटलाही उभा केला गेला होता. त्याच्या वकिलांनी कुणीतरी मारेकऱ्यानं तो खून केला असावा अशा आशयाचा जोरदार बचावाचा पुरस्कार केला. पण आधी दर्शविल्या प्रमाणं तो निष्फल ठरविला गेला. त्यांनी जमविलेला पुरावा निष्कलंक होता पंचांनी काही क्षणातच त्याला खुनाबद्दल दोषी ठरविलं.

आणि हे सारं घडलं ते त्यांच्या चातुर्यामुळं आणि सातत्यानं केलेल्या प्रयत्नामुळं. प्रयोग शाळेच्या अहवालात ते दोनही पुरावे प्रकर्षानं एकच एक गोष्ट दर्शवीत होते. त्या दोन्ही गोळ्या नी ती दोन्ही वेष्टणे एकाच पिस्तुलातून झाडलेली होती. एकाच प्रकारचा तो व्रण त्याच्यावर होता. त्याची छायाचित्रं घेण्यात आली होती. त्यांच्या श्रमाचं सार्थक झालं होतं. ते केवळ एका क्षुल्लक अवलोकनानं पेटीवरची ती चकती त्यांनी न्याहाळली होती म्हणून!! समजा, त्यांच्या दृष्टीतून ती सुटली असली असती तर? कदाचित पुराव्याअभावी खुनी इसम न्यायदंडातून सुटलाही असता—

(आधारित)




## मध्यंतर

# कळी एकदा फुलली होती

पुष्पा भावे

दत्ता भट्टांच्या दिग्दर्शनाने शिरीष पै यांचे 'कळी एकदा फुलली होती' हे नवे नाटक गेल्या आठवड्यात रंगमंचावर आले. आणि या नव्या नाटकाच्या नायिकेच्या भूमिकेत प्रिया तेंडूलकर ही नवी अभिनेत्री मराठी व्यावसायिक रंगमंचावर आली. प्रिया तेंडूलकरने यापूर्वी 'हयवदन'मध्ये आणि 'अशी पाखरे येती' या नाटकात व 'अंकुर' नामे चित्रपटातही भूमिका केल्या आहेत. परंतु सर्वसामान्य प्रेक्षकांच्या दृष्टिकोनातून तिची ही पहिली भूमिका आहे. शीर्षक सुचविते त्याप्रमाणे नाटकाचे केंद्रस्थानी ही नायिकाच आहे. व्यावसायिक रंगमंचावर प्रवेशच प्रमुख भूमिकेने करणे ही सहसा प्राप्त न होणारी संधी या तरुण अभिनेत्रीला मिळाली आहे.

शिरीष पै यांनी यापूर्वी नाटके लिहिलेली असली तरी त्यांचे हे पहिलेच स्वतंत्र नाटक आहे. यापूर्वीच्या त्यांच्या नाटयलेखनातील 'हा खेळ सावल्यांचा' हे अनेक कारणासाठी लक्षात राहिलेले नाटक ! 'काळोखाचे अंग' या ए. वि. जोशींच्या कादंबरीचे नाटयीकरण करून ते सादर करण्याची कल्पना सुचल्याबद्दलच मी शिरीष पैंना मनोमन मानले होते. या नाटकातील अरुण सरनाईक आणि सतीश दुभाषी यांच्या भूमिका तर मराठी प्रेक्षकांच्या चिरकाल स्मरणात राहातील. विशेष असा की या नाटकात कुमार दिघे आणि लीला मेहता यांना चुकीच्या भूमिकासाठी घेतल्यामुळे या नाटकाचा प्रयोग विस्कळीत झाला होता. पण त्यावेळी महत्त्वाची वाटली होती नाटयकर्तीची मानवी प्रतिक्रियांचे लळीत उभी करू पाहाणारी नाटयाभिरुची ! या पार्श्वभूमीवर 'कळी एकदा फुलली होती' असे काव्यात्म नाव घेऊन येणाऱ्या नव्या नाटकाने संपूर्ण निराशा केली.

नाटयसंहितेमध्ये आहे या स्वरुपात नाटयस्वरुपापेक्षा कथाकथनाकडे जास्त लक्ष पुरविले आहे. वस्तुतः कथावस्तू कथनापेक्षाही मानवी संबंधांच्या मुळाशी जाणारी होती पण ती त्या स्वरुपात उभीच राहू शकली नाही. याचे मूळ कारण नाटयकर्तीला कथावस्तूचा आवाका जाणवलेलाच नाही. आईवडिलांच्या भांडणात–द्वेषाच्या विकृत प्रदर्शनातच जिचे बालपण गेले, त्या मुलीने जीवनाविषयी–काव्याविषयी भावडया, गोड गोड कल्पना व्यक्त करणे केवळ अशक्य वाटते. या नाटकात योजलेले काव्यही नायिकेच्या मनाची भयग्रस्त अवस्था घेऊन यायला हवे होते. परंतु या नाटकात रंगवलेली नायिका उदास, कवीवृत्तीची, करुणामय, मृत्यूला सामोरी जाणारी अशी आहे. म्हणजेच कवीवृत्तीविषयीच्या कृतक, रोमँटिक कल्पनांशी जुळतीमिळती आहे. शिवाय तिला झोपडपट्टीतल्या मुलाविषयी अपार दया वाटते–प्रेक्षकांची सहानुभूती जिंकायला जे जे काही हवे ते या नायिकेच्या व्यक्तिरेखेत आहे. अशी व्यक्तिरेखा मराठी माणसाला नवीन नाही. बाकीचे सारे नाटक तर मराठी साच्यात फिट्ट बसणारे–वेळीअवेळी घरी येणारे कुटुंबमित्र डॉक्टर, कुटुंबाविषयी जिव्हाळा बाळगणारा नोकर, हास्य आणि करुण रसांना आवाहन करणारी प्रियकराची भूमिका असे सर्व काही !

या नाटकाचा प्रयोग सुसह्य झाला तो माधवीच्या भूमिकेतील प्रिया तेंडूलकर यांच्या संवेदनाक्षम अभिनयाने. या तरुण अभिनेत्रीचे पातळ ओठ, मंद बोलकी नजर, लवचिक शरीरयष्टी या भूमिकेला संपूर्णतः योग्य होती. विशेषतः ज्या समजुतीने या मुलीने ही नैसर्गिक देणगी वापरली ती समजूत नवशिक्या नटीत दुर्मिळ असते. व्यावसायिक रंगमंचावर प्रमुख भूमिकेत असणारा प्रेक्षकांशी नजरेने बोलण्याचा मोहही या नटीने टाळला.

कविता स्फुरणे वा कवीच्या संवेदनाक्षमतेने वास्तवातील एखाद्या घटनेची प्रतिक्रिया व्यक्त करणे हे रंगमंचावर अतिशयोक्त न होता, हास्यास्पद न होता व्यक्त करणे फार अवघड असते. तेही प्रिया तेंडूलकरने संयमाने व्यक्त केले. तिच्या अभिनयातला नवशिकेपणा जाणवत होता तिच्या हातांच्या वापरात. दोन्ही हात विनाकारण हेलकावत ठेवण्याची तिची लकब विशोभनीय होती. परंतु अत्यंत सामान्य नाटकात स्वतःच्या भूमिकेची अदब राखण्यात तिला आलेले यश पाहाता रंगमंचावरील तिच्या कारकिर्दीविषयी खूप आशा वाटते आहे. या नाटकातील दुसऱ्या दोन महत्त्वाच्या भूमिकासाठी कलावंतांची निवड चुकीची होती. या नाटकातील रागिणीचे पात्र कथावस्तुच्या दृष्टिकोनातून महत्त्वाचे

आहे. विमल राऊत या अभिनेत्रीचा व्यक्ति-रेखा उभी करणाऱ्या अभिनयाविषयी फारसा लौकिक कधीच नव्हता. या नाटकात तर रागिणीच्या व्यक्तिरेखेतील मानसशास्त्रीय गुत्याचा आणि माधवीच्या मनस्थितीचा अत्यत निकटचा सवध होता. मुळात नाटच-लेखनात रागिणीच्या पूर्वजीवनाची व्यथा लाबलचक भापणाच्या स्वरुपात आहे आणि त्यात ती भाषणे राऊतबाईंनी आपल्या कलाहीन आवाजात सादर केल्यामुळे परि-णामशून्य ठरली. (राऊतवाईंची वेशभूषा त्यानी स्वत. वा दिग्दर्शकाने योजताना सातत्याने फिक्कट छटाचा वापर केला होता. फिक्कट रगाच्या वेशात स्थूलत्वाचा अधिक आभास होतो हे प्राथमिक तत्त्व ध्यानी घ्यायला हरकत नसावी.)

परतु नाटचपरिणामाच्या दृष्टिकोनातून पाहता, रागिणीच्या भूमिकेसाठी झालेल्या निवडीचा झाला नाही इतका अनिष्ट परि-णाम कुमारच्या भूमिकेसाठी राजेद्र पै याची जी निवड झाली त्याचा झाला झाला आहे. राजेंद्र पै हे माधवीच्या काव्याच्या रसिकाची, स्वत. कवी असणाऱ्या कुमारची, तिच्या प्रियकराची भूमिका करतात. एक तर पैना या नाटकाची प्रकृति उमजलेली नाही गभीर प्रवृत्तीच्या नाटकात फार्सिकल अभिनय करुन ते स्वत कडे प्रेक्षकाचे लक्ष वेधून घेऊ पाहतात. आणि त्यामुळे तिसऱ्या अकातल्या करूण प्रसगी त्याच्या प्रवेशाला प्रेक्षकात खसखस पिकली तर तो दोष प्रेक्षकाच्या समज-शक्तीचा नसून पैंच्या असमजस, आक्रस्ताळी अभिनयाचा आहे. दत्ता भटासारख्या जाणत्या दिग्दर्शकाने पैंच्या अभिनयावर, वाणीवर काही सस्कार करणे अत्यावश्यक होते. सस्थेचे, ठरीव कलावत असण्यामधला गैर-फायदा 'अत्रे नाटचमदिर'च्या या निर्मिती-मध्ये ठसठशीतपणे लक्षात येतो. स्वत दत्ता भटांनी नट म्हणून त्याची प्रतिमा जन-मानसात आहे याची जाणीवही न ठेवता, आपले नटस्वरूप इतर पात्रावर दडपण टाकण्यासाठी न वापरता श्यामकाताची भूमिका अगदी खालच्या पट्टीत केली आहे.


दिग्दर्शक म्हणून मात्र दत्ता भट या नाटचकृतीच्या सदर्भात समाधान देत नाहीत. आचार्य अत्र्याच्या 'डॉ लागू' या नाटकाचे दिग्दर्शन करणारा कल्पक, मेहनती, सवत नजर ठेवणारा दिग्दर्शक इथे दिसत नाही. विशेषत पात्राच्या हालचाली अतिशय दोपास्पद आहेत जुन्या नाटकातील पात्रा-प्रमाणे या प्रयोगातील पात्रे मध्येच विना-कारण प्रेक्षकांशी बोलतात, विशोभनीय हालचाली करतात विशेषत· राजेद्र पै याचे footwork अतिशय वाईट होते

दिग्दर्शक व नेपथ्यकार यानी सकल्पिलेला बगल्याच्या मधला चौरस नाटचोपयोगी होता आणि देखणाही. भटानी खूप वेग-वेगळी अभिनयक्षेत्रे निर्माण केली होती विशेषतः माधवी या मोठ्या घरात एकाकी आहे, आसपासच्या माणसापेक्षा वेगळी आहे हे झाडाच्या खोडात खोदलेल्या खुर्चीच्या सहाय्याने आणि रगमचाचा एक वेगळा कोपरा तिच्यासाठी वापरून सुचविण्याची कल्पना परिणामकारक ठरली. रघुवीर तळाशीलकरानी उभे केलेले नेपथ्य व सजावट दोन्ही डोळचात भरण्याचा प्रयत्न न करता खऱ्या अर्थाने सुदर व नाटचानुकुल होते.

श्रीनिवास खळ्याचे पार्श्वसगीत मात्र मला फार भावडे वाटले – म्हणजे जपानच उल्लेख आला की जपानी सगीत असा बाळ-बोध तर्कक्रम असणारे !

अनेक दोष, अनेक मर्यादा, अभिनयाविषयी अनेक चुकीच्या कल्पना घऊन येणारी 'अत्रे नाटचमदीर'ची ही निर्मिती प्रिया तेंडुलकर-सारखी एक सवेदनाक्षम अभिनेत्री घेऊन येते आहे. तिचा अभिनय या इतर सगळ्या गलबल्यात गुदमरून जाऊ नये अथवा पूर्वी एकदा याच संस्थेच्या नाटकातील अरूण सरनाईक व सतीश दुभाषी याच्या अभिनया-सारखा इतराच्या अपयशाबरोबर वाहून जाऊ नये एवढीच इच्छा.

□ □



। ॥ नजर ॥ ह. शि. खरात ॥ ।

## विजया मेहतांचे श्रवणीय कथावाचन

मराठीत कथाकथन हा प्रकार नवीन नाही. कथाकथनाचे मूळ आईच्या गोष्टीत किंवा कीर्तनकाराच्या प्रवचनातही सापडेल. तसे पाहिले तर माणूस हा जात्याच गोष्टी-वेल्हाळ असतो. चारचौघात शिळोप्याच्या गप्पा मारण्यात त्याला अवीट गोडी वाटत असते. म्हणूनच कथा एकातात मनातल्या मनात वाचण्यापेक्षा जर ती अधिक दृश्य स्वरुपात म्हणजे अधिक बोलक्या स्वरूपात वाचली गेली तर माणूस त्यात अधिक रगतो. आपल्याकडे अभिनयासह कथा-कथनाचे अनेक प्रयोग झाले असून ते चागलेच यशस्वी झाले आहेत. अर्थात कथा-कथन आणि कथावाचन ह्यामध्ये फरक आहे. कथाकथनात कथा सागणारा हा गुज-गोष्टी कराव्यात अशा पद्धतीने ती सागतो. हे करीत असताना बहुरूप्याप्रमाणे तो त्या कथेतील अनेक प्रसग व माणसे जिवत करीत असतो. तो त्या कथेशीच एकरूप होतो. थोडक्यात ती कथा तो एकप्रकारे जगत असतो. कथावाचनात आपण ही कथा वाचतो आहोत हे भान त्या कथावाचकाचे सुटत नाही. वाचताना प्रसगानुरूप तो आवाजाची चढउतार अभिनयासह करीत असतो. परतु तो कथेशी एकरूप न होता थोडासा त्रयस्थाप्रमाणे सारी कथा सागत असतो. त्यामुळे कथाकथनाला जे बोली-स्वरूप असते ते कथावाचनात नसते. ते पुस्तकी झालेले असते. आणि म्हणून 'बरं का श्रोत्यानो' म्हणण्याऐवजी कथावाचक हा 'वाचकानो' ही वाचण्याची भूमिका सोडीत नाही.

हे सार सागण्याचं कारण मराठी

रंगभूमीवरील प्रसिद्ध अभिनेत्री व दिग्दर्शिका श्रीमती विजया मेहता ह्यांचे कथावाचन ऐकण्याचा योग ३ जुलैस म्हणजे अमेरिकेच्या स्वातंत्र्यदिनी आला हे होय. कार्यक्रम तसा चुटचुटीत आणि छान झाला. अमेरिकन सांस्कृतिक केंद्राचे आटोपशीर सभागृह. चार निवडक रसिक जमण्याची छान जागा. आता अमेरिकन स्वातंत्र्यदिन म्हणजे आपल्या १५ ऑगस्टला जो प्रकार होतो तो नव्हता. म्हणजे लाऊडस्पीकरचा गोंगाट, एखादा मंत्री, त्याचे नेहमीचे चालू भाषण, देशाभिमान, वगैरे वगैरे. अर्थात अमेरिकेत तसा जल्लोश असेलही, परंतु शितावरून भाताची परीक्षा होते. असो.

फिकट निळ्या–पोपटी पडद्याची पार्श्वभूमी. स्टेजच्या एका कोपऱ्यात खुर्ची आणि छोटासा टीपॉय. उजव्या बाजूने शुभ्र प्रकाशाचा फोकस तर डाव्या बाजूने मंद धूसर प्रकाशाचे अधूकसे सावट. त्यामुळे विजयाबाईंच्या आकर्षक व्यक्तीमत्त्वाला एखाद्या पेटींगची लज्जत आली होती. कार्यक्रमाला शोभेशी जांभूस गुलाबी पदराची छापील साडी आणि हातात चंदेरी झाक मारणाऱ्या गुलाबी बांगड्या ह्या रंग संगतीत मोतिया रंगाच्या चष्म्याची फ्रेम आणि फिकट गुलाबी शेड असलेली लिपस्टीक अधिकच प्रसन्नता आणीत होती. थोडीशी अमेरिकन रंगाची याद यावी असेच सारे काही होते. श्रोतेही तसे निवडकच. बरेचसे कला प्रांतातले. काहीसे हौशी तर बरेचसे जाणकार रसिक व 'स्नॉक्सही' अशी एकंदर जमलेली मैफील पान जमावे तशी जमून गेली आणि दीड दोन तास आनंद देऊन गेली याचं कारण विजयाबाईंचं श्रवणीय व सुंदर कथावाचन होय.

कथा दोनच वाचल्या गेल्या. सुरुवातीस गोऱ्या साहेबाने ह्या मैफलीचं प्रयोजन सांगून अमेरिकन स्वातंत्र्य सोहळ्याचा एक छोटासा भाग म्हणून हे कथावाचन मराठीत ठेवल्याचे सांगितले. सुरुवात पियानो वादनाच्या 'कांपोझिशन'ने झाली. नंतर विजयाबाई हातात पुस्तक घेऊन स्थानापन्न झाल्या. कथेची निवड प्रसंगानुरूप व चोखंदळपणे केली होती. दोन्ही कथा अमेरिकन कथाकाराच्या होत्या. त्यांचे सुरस भाषांतर प्रसिद्ध कथाकार अरविंद गोखले ह्यांनी केले होते. विजयाबाईंनी पहिली कथा 'टायगर अँड ब्राईड' ह्यां नावाची म्हणजे 'वाघ की वधू' कथा वाचली. त्यांचा आवाज आधीच मुलायम असा. तशात प्रसंगानुरुप आवाजातील चढ उताराने त्यांनी थोड्याच अवधीत श्रोत्यांना विश्वासात घेतले. 'वाघ की वधू' ह्या कथेतील राजा न्याय देण्याच्या बाबतीत एक अफलातून तंत्र वापरीत असे. गुन्हा करणाऱ्याची पुराव्याने शहानिशा करण्याऐवजी तो राजा आपल्या राजधानीतील प्रचंड आखाड्यात गुन्हेगारास उतरवीत असे. आखाड्याच्या एका टोकाला दोन दरवाजे असत. गुन्हेगाराने जाऊन एक दरवाजा उघडायचा. एका दरवाजाआड भयंकर वाघ तर दुसऱ्या दरवाजाआड सुंदर तरुणी. गुन्हेगाराच्या नशिबात असेल ते त्याला मिळे. व तत्काळ शिक्षाही भोगावी लागत असे. एक दिवस राजकन्येवर प्रेम करण्याचा गुन्हा केलेल्या गुन्हेगारास आखाड्यात सोडण्यात येते. पण कन्येने वाघ कुठे आहे आणि सुंदरी कुठे आहे हे गुपित हस्तगत केलेले असते. तिच्या गुन्हेगार प्रियकराला ती खुणेने ते रहस्य सांगते. परंतु त्या गुन्हेगाराने उजवे दार उघडताच काय घडते ? वाघ त्याचा गळा घोटतो की सुंदरी गळ्यात पडते ? अखेर त्या राजकन्येने मानवी स्वभानुसार काय निर्णय घेतला असेल ? ह्याचा निर्णय वाचकावर टाकून लेखकाने इथे वाचकांना थोडासा अद्‌भुतरम्य धक्का दिला आहे. विजयाबाईंनी हे गुपीत श्रोत्यांची उत्कंठा वाढवीत वाढवीत शेवटपर्यंत न सांगता श्रोत्यांना कोड्यात टाकावे तसे सांगितले. दुसरी कथा त्यांनी स्टीव्हन व्हिन्सेण्ट बेने ह्या अमेरिकन लेखकाने लिहिलेली 'द डेव्हिल अँड डॅनिअल वेन्सटर, ही अदभुतरम्य नवल कथा वाचली. 'सैतानाशी सामना' ह्या नावाने तिचे मराठीतील भाषांतर वाचण्यात आले. डॅनियल वेबस्टर ह्या प्रचंड काय भीम पुरुषाने एका सैतानाच्या जाळ्यात सापडलेल्या सामान्य पण दुर्दैवी माणसाची कशी सुटका केली हे ह्या कथेत थोड्याशा उपहासात्मक पद्धतीने व खेळकर नर्म विनोदी शैलीने सांगण्यात आले आहे. ही कथा विजयाबाईंनी फारच छानपणे वाचली. ह्या कथेतील सारी प्रमुख पात्रे त्यांनी आपल्या अभिनयाने श्रोत्यांच्या डोळ्यापुढे साकार केली. कथेतील सैतानाचा कावेबाजपणा त्याच्या बोलण्यातून व्यक्त केला तर प्रचंडकाय डॅनियलचा धाडसी आणि बिनधास्त स्वभाव त्यांनी त्याच्या दिलखुलास बोलण्याने व्यक्त केला. ह्या कथेत जिथे जिथे म्हणून अमेरिकेचा उपहास आहे किंवा अमेरिकन माणसाला कोपरखळ्या आहेत त्या त्या ठिकाणी विजयाबाईंनी शब्दांची खवचट फेक करून कथा वाचनात अधिकच रंग भरला. दोन्ही कथांचे विषय वरकरणी अदभुतरम्य रहस्यमय-नवलकथासारखे असले तरी मूलभूत मानवीवृत्तींना स्पर्श करण्याचे जबरदस्त सामर्थ्य दोन्हीही कथांत विलक्षण होते. कोणाही वाचकाला त्या अंतर्मुख होऊन विचार करावयास लावणाऱ्या होत्या. परंतु विजयाबाईंनी कथाकथनातील गुजगोष्टीचे स्वरूप कथा वाचनाला दिल्याने किंवा कथेशी एकरूप न झाल्याने श्रोत्यांना कथा ऐकताना जी गंमत येते ती मजा ह्या कथावाचनात आली नाही. कारण आपण ही कथा वाचीत आहोत, सांगत नाही हे भान विजयाबाईंनी सतत ठेवल्याने आजीच्या गोष्टीची अवीट गोडी ह्या कथावाचनास आली नाही. त्यामुळेच की काय श्रोते समोर बसले असतानासुद्धा विजयाबाई त्यांना 'वाचकांनो' असेच संबोधीत होत्या.

तरीही अशा समर्थकथा मराठीतील एका समर्थ अभिनेत्रीने व दिग्दर्शिकेने श्रवणीय रीत्या वाचल्याने, एक दर्जेदार मराठी कार्यक्रम सादर करण्याचे श्रेय युसिसच्या संचालकाकडे जाते. अमेरिकन सांस्कृतिक केंद्रातील हा पहिलाच मराठी कार्यक्रम स्तुत्य होता. त्याबद्दल धन्यवाद. ¤

# स्त्रीरपत्र

## हृदयस्पर्शी बंगाली चित्रपट

'स्त्रीरपत्र' ही रवींद्रनाथ टागोरांची कथा. हजारो वर्षांच्या सामाजिक रूढीतून आणि पुरुषी गुलामगिरीतून मुक्त होणाऱ्या एका अत्यंत कोमल मनाच्या स्त्रीची ही मुक्ती कथा. ह्या कथेला स्त्रीच्या दुःखाची, तिच्या मूक वेदनाची, तिच्या विशाल हृदयाची पण खंबीर मनस्वीपणाची,

तसेच पुरुषी हुकूमशाहीतून मुक्त होत असतानाच बंधनांच्या पलीकडे जाण्याची गहनगूढतेच्या ओढीबरोबर जीवन विश्व-समर्पित झाल्याची—अशा विविध पातळ्या असल्याने ह्या कथेतील एका कारुण्यमय स्त्रीचा भावनिक आदोलनाचा प्रवास हृदयाला भिडल्याशिवाय राहात नाही. ह्या कथेतील मृणाल ही नायिका जणू साऱ्या स्त्रियाच्या रूपाने प्रथमच स्त्री-मुक्तीचा पदन्यास करीत आहे असे वाटते. तर तिच्या कडे आधारास आलेल्या बिंदू नावाच्या निराधार, निष्पाप बालिकेची भयानक शोकातिका हृदयाला चटका लावून जाणारी आहे.

कथा तशी जुन्या काळातील. १९१३ सालच्या आसपासची. ह्या काळात बंगाल-मधील एका प्रचड हवेलीत ही कथा घडते. सरंजामशाहीचा आणि पिढीजात खानदान-पणाचा तथाकथित मोठेपणा अगावर माळलेली ही प्रचड वास्तू म्हणजे स्त्रीसाठी तयार केलेला एक सुदर पिंजराच. ह्या हवेलीतला कर्ता पुरुष चद्रनाथ. जहागिर-दाराच्या रुबाबात आपली पिढीजात हुकमत सर्वांवर गाजविणारा. ह्या हवेलीत आलेल्या स्त्रीने आपली माहेरची नाती विसरायची असतात. खाली मान घालून नाहीतर पदरा-आडून बोलायच असत. अर्थात प्रत्युत्तर करणे भयकर गुन्हा. स्त्रीनेच काय पण इतर नोकरचाकरांनीही पापणी पाडूनच बोलायच. कसल्या तरी पारपारिक प्रचड भाराखाली इथल्या स्त्रीमनाचा चुराडा होत असतो. केवळ मूकपणे दु:ख गिळण्याशिवाय आणि अश्रू ढाळण्याशिवाय काहीच करता येत नाही. इतकी अगतिकता. गुदमरणे हेच जगणे.

अशा ह्या भव्य हवेलीत मृणाल नावाची अत्यत सवेदनाक्षम अशी कवीमनाची स्त्री वधू म्हणून प्रवेश करते. चद्रनाथ तिचा थोरला दीर. थोडासा इग्रजाळलेला पण अतिशय सनातनी. मृणालचा पती थोडासा उदारवृत्तीचा पण त्याच्यावरही पिढिजाद सस्काराच ओझं.

मृणाल हळव्या मनाची. गाई-वासरं हवरली तरी तिचा जीव वरखाली होई. त्यांना चारापाणी घालण्यासाठी ती कासा-वीस व्हायची. मृणालची थोरली जाऊ—बिचारीला आपल्या साऱ्या आशा-आकांक्षा डोळ्यात पाणी आणून माळलेल्या वेणी-सारख्या चुरगाळून टाकाव्या लागत. माहेरचं कोणी आल तरी भेटायची भीती. कारण हवेलीच्या खानदानीपणात आणि मोठेपणात ते बसत नाही. पण मृणाल तिचा भाऊ येतो तेव्हा त्याला पाहुणचार करते. अशीच एके दिवशी थोरल्या जाऊच्या नात्यातील बिंदू नावाची एक निराधार पोर त्या हवेलीत आसऱ्याला येते. बिंदू म्हणजे दर्दभरी कळीच. हरणाच्या पाडसासारखी बावरलेली ती सशाच्या थरथरत्या काळजाने हवेलीत येते. थोरली जाऊ विचल होते पण मृणाल मात्र बिंदूला जवळ करते. त्या परकऱ्या पोरीला हृदयाशी धरते. दोघीजणी तिला न्हाऊमाखू घालतात. हाताने घास भरवतात. तिला जपतात. बिंदू तशी कामसू. भांडी घाशी, धुणं धुवी, शेण्या लावी अन् हरवल्यासारखी कुठेतरी दूरात बघत बसे. घरातल्या पुरुष मडळीना बिंदूचं येणं आवडत नाही. ते त्याना कमीपणाचं वाटत. कोण कुठली दरिद्री पोर. ती त्यांच्या खानदाणीपणात बसत नाही.

एकदा मृणालचा क्रातिकारक भाऊ पिस्तुल खरीदण्यासाठी मृणालची सोन्याची वाकी चोरतो. चोरीचा आळ मात्र बिंदूवर. थरथर कापणाऱ्या शेळीसारखी बिंदू घेरी येऊन पडते. तिला जवळ करते मृणाल. चद्रनाथ शिकार करीत असताना बंदुकीचा बार ऐकून बिंदूच्या हातातील काचपात्रे फुटतात. त्या धक्याने ती आजारी पडते. मृणाल रात्रदिवस तिच्याशेजारी बसून तिची काळजी घेते. अशा ह्या दुर्दैवी बिंदूच लग्न ठरतं. मृणालला हायस वाटतं. दुर्दैवाच्या फेऱ्यातून सुटली म्हणून. बिंदू सासरी जाते आणि पुन्हा तिचं नशीब आडवं येते. तिचा नवरा वेडा असतो. तिच्या दुर्दैवानेच तिला फसविलेलं असतं. बिंदू पुन्हा हवेलीत सासर-हून पळून येते. मृणालला हे कळते तेव्हा तिला धक्काच बसतो. बिंदूला परत पाठवा-यची नाही असं ती ठरवते. पण पुरुषी हुकूम-शाहीपुढे तिचा नाइलाज होतो आणि इथूनच तिच मन वड करून उठते.

खरं म्हणजे बिंदू आल्यापासून मृणालला स्त्री म्हणून आपल्याला अस्तित्त्वच नाही ह्याची जाणीव होते. आपल्याला मन आहे, हे जगाच्या गावीच नाही असे तिला वाटते. डोळ्यात पाणी आणून ही व्यथा ती मीराच्या भजनातून व्यक्त करते. बिंदूच्या वाटेला असे भयकर असह्य जीवन यावे ह्याचा ती अतर्मुख होऊन जसजसा विचार करते तसतशी ती पतिपासून—ससारापासून दूर दूर जात असते. दूर गूढात कुठेतरी जाण्याची ओढ तिला लागते. बिंदूची शोकां-तिका बघून ती आपल्या मावशीबरोबर पुरीला तीर्थयात्रेला जाण्याचे ठरविते. परतु पुरुषी अहकार तिला मज्जाव करतो. तेवढ्यात बिंदू पुन्हा सासरहून पळून कुठेतरी बेपत्ता होते. हे असह्य होऊन मृणाल घरातील साऱ्या विरोधाला न जुमानता पुरीला जाण्या-साठी त्या प्रचड हवेलीच्या बाहेर पडते. भावाला बिंदूचा शोध करायला सागते. पण भाऊ बिंदूच्या मृत्यूची भयकर बातमी घेऊन येतो. आणि कोमल मनाची मृणाल शेवटी खबीर निर्णय घेते. ती घरी परतत नाही. आपल्या पतीला शेवटचे निर्वाणीचे पत्र लिहिते. आणि हे स्त्रीरपत्र म्हणजेच स्त्री मुक्तीचा पहिला पदन्यास असतो. केवळ ह्या प्रयेमुळे बंगालमध्ये त्याकाळी भयकर खळ-बळ माजली होती.

बगाली दिग्दर्शक पुरन्दु पत्री ह्यांनी ह्या कथेला इतकी सुदर ट्रीटमेंट दिली आहे की त्यामुळे ही कथा पडद्यावर उतरताना उच्च स्तरावरून एका विलोभनीय व्यक्तीमत्वाचा आणि त्याच्या विकासाचा वस्तुनिष्ठ प्रत्यय देते. छायाचित्रण सुंदर व कलात्मक आहे. कॅमेऱ्याच्या सहाय्याने तत्कालीन जमीन-दाराच्या हवेलीचे वातावरण निर्माण करण्यात दिग्दर्शक यशस्वी झाला आहे. हवेलीतील 'शॉटस्' अशा काही अँगलसनी घेतले आहेत की हवेलीच्या भव्यतेबरोबर तिची भयानक अमानुषताही प्रत्ययाला यावी. चद्रनाथाचे जरबी बोलणे, त्याचे गुडगुडी ओढणे, त्याचे पाखराची शिकार करणे, बदुकीच्या आवाजाने बिंदूच्या हातून काचपात्र फुटणे व त्यामुळे तिच्या आजारपणात झोपेत जखमी पक्षी व पिस्तुल येऊन त्याच्या चित्रविचित्र जीवघेण्या आकारातून चद्रनाथची भयकर राक्षसी वृत्ती दाखविणे ह्या साऱ्या गोष्टी कल्पकतेने दाखविल्या आहेत. मृणालला भेट म्हणून कोणीतरी कोकरू देणे व त्याचवेळी बिंदूचा हवेलीत प्रवेश होणे. बिंदूला बळ-

जबरीने सासरी पाठविताना नोकराने दोरीने बांधलेल्या कोकरास जबरदस्तीने ओढून आणणे, बिंदूच्या गाठोड्यातील चिंचा पाहून मृणालला आपले बालपण गवसणे, तसेच शेवटी मृणाल घर सोडून जाते त्यावेळी तिच्या छायाचित्रातून तिच्या मुक्तीचा व आत्मिक विकासाचा प्रतिकात्मक वापर करून मृणालची विश्वरूपता दाखविणे ह्या अनेक गोष्टीमुळे चित्रपटाला एक गूढ प्रतिकात्मकता लाभते.

चित्रपटाची सुरुवात मोठी झकास आहे. आधीच बंगाली लिपी चित्र लिपी. त्यात पुन्हा श्रेयनामावली देताना अक्षरातून ड्रॉईंगचा जो सुंदर वापर केला आहे तो देखणा आहे. नदी काठचा अंग धुण्याचा शॉट, वेषभूषा करतानाचा शॉट, दोघी जावांचे जुन्या वळणाचे अलंकार, मृणालने कविता लिहिताना वापरलेली देखणी दौत चंद्रनाथच्या बैठकीतील कलाकुसरीचे चांदीचे पानदान, ह्या वस्तुतूनही ह्या चित्राला एक घरंदाजपणा येतो.

हा चित्रपट माधवी मुकर्जी ह्या थोर अभिनेत्रीसाठी मात्र आवश्य बघावा. माधवी मुकर्जी ही जन्मजात–अभिजात अभिनेत्री, तिचा अभिनय उच्च दर्जाचे लेण लेऊन येतो हे तर खरच परंतु तिच्या अभिनयामुळे साऱ्या चित्रपटालाच फार मोठे वजन प्राप्त होते. ' स्त्रीरपत्र ' मधील माधवीचे मृणालचे काम अप्रतिम आहे. मुळातच तिचे डोळे अत्यंत भावपूर्ण आणि बोलके आहेत. मृणालच्या रूपाने साऱ्या स्त्री जातीची वेदना तिच्या कारुण्यमयी डोळ्यात मूर्तिमत उभी राहते. तिच्या मनात होणारी आंदोलने तिच्या मुग्ध चेहऱ्यावर स्पष्ट दिसतात. त्यासाठी कसलाही बावुगा. प्रयत्न न करता. दुसरी भूमिका बघण्यासारखी आहे ती बिंदूची. ह्या मुलीनं आपलं काम इतकं सहज केलं आहे की ते बघत राहावं. आपली अगतिकता तिच्या मूक चेहऱ्यावर अशी प्रकट होते की ह्या दुर्दैवी पोरीचा मृत्यू सहृदय माणसाला चटका लावून जातो. बिंदूच्या वेड्या नवऱ्याची भूमिकाही चांगलीच लक्षात राहाते-

' स्त्रीरपत्र ' हा खरोखरच एक श्रेष्ठ दर्जाचा बंगाली चित्रपट असून तो रसिकांनी अवश्य बघावा. आवर्जून बघण्यासारख्या ह्या चित्रपटाला १९७३ चे राष्ट्रपतीपदक, बंगाल सरकारचे उत्कृष्ट चित्रपटाचे पदक व फिल्मफेअर अवॉर्ड ही मिळाले आहे. त्याचे श्रेय प्रामुख्याने माधवी मुकर्जी ह्या थोर अभिनेत्रीला व गुणी दिग्दर्शक पुरन्दु पत्रीला आहे. ☐ ☐


## राजहंस प्रकाशन सूची

| | | | |
|---|---|---|---|
| १. | फिडेल, चे आणि क्रांती | अरुण साधू | ७–०० |
| २. | पुरंदऱ्यांची दौलत | ब. मो. पुरंदरे | ३–५० |
| ३. | शिलंगणाचं सोनं | ब. मो. पुरंदरे | ३–५० |
| ४. | शनवारवाड्यातील शमादान | ब. मो. पुरंदरे | ३–५० |
| ५. | पुरंदऱ्यांची नौबत | ब. मो. पुरंदरे | ४–०० |
| ६. | पुरंदरच्या बुरुजावरून | ब. मो. पुरंदरे | ४–०० |
| ७. | पुरंदऱ्यांचा सरकारवाडा | ब. मो. पुरंदरे | ७–०० |
| ८. | परसूच्या पशुकथा | वसंत सबनीस | २–०० |
| ९. | सहा साहसे | दा. सी. देसाई | २–०० |
| १०. | पूर्णिया | अनिल अवचट | ६–०० |
| ११. | गुजराथेतील मराठी राजवट | वि. गो. खोबरेकर | ७–०० |
| १२. | सांगत्ये ऐका | हंसा वाडकर | ८–०० |
| १३. | संध्याकाळ | गजानन जागीरदार | १०–०० |
| १४. | कोठे आणि कधीतरी | डॉ. सुधीर फडके | १०–०० |
| १५. | रातराणी | विजय तेंडुलकर | १२–०० |
| १६. | आणि ड्रॅगन जागा झाला | अरुण साधू | १४–०० |
| १७. | अग्निपुत्र | वसंत पोतदार | १४–०० |
| १८. | एका पराभवाची कहाणी | अनंत भावे | १५–०० |
| १९. | शतपावली | रवींद्र पिंगे | १०–०० |
| २०. | श्रीग्रामायन | श्री. ग. माजगावकर | १५–०० |

**आगामी प्रकाशने**

| | | |
|---|---|---|
| २१. | मी नेताजींना बघितलंय | अशोक शहाणे |
| २२. | टॉलस्टॉय–एक माणूस | सौ. सुमती देवस्थळे |

राजहंस प्रकाशन, १०२५ सदाशिव, पुणे ४११ ०३० : ५७३५९

# स्वदेशीचे आंदोलन : पृष्ठ ७ वरून

ठराव केला होता की, महत्त्वाच्या सर्व उद्योगधंद्यातून परकीय भांडवलाला सुट्टी दिली जाईल. समितीचे अध्यक्ष होते पंडित जवाहरलाल नेहरू. त्याच जवाहरलालजींनी परदेशी खासगी कंपन्यांच्या भारतातील भांडवलगुंतवणुकीबाबत सरकारचे धोरण जाहीर केले आणि साऱ्यांना धक्काच बसला. त्या भांडवलदारांना भरपूर नफा खाण्यास, आकर्षक डिव्हिडंट वाटण्यास आणि इतर अनेक बाबतीत भरपूर सवलती देण्यात आल्या होत्या. आणि कधी काळी सरकारने ते ताब्यात घेतलेच तर त्याबाबत भरपूर नुकसान भरपाई देण्यात येणार होती. पंडितजींच्या भाषेत परकीय भांडवलाची गुंतवणूक या देशात व्हावी यासाठी दोन्ही बाजूंना फायदेशीर अशी सौदेबाजी करण्यात आली. प्रत्यक्षात मात्र या फायद्याचे पारडे परदेशाच्या बाजूलाच जोरदारपणे झुकलेले होते. समाजवादाच्या पुकाऱ्याखाली संस्थानिक, बडे जमीनदार, बडे भारतीय उद्योगपती (Indian monopolists) यांना चाप लावण्याचा पुकारा करणाऱ्या सरकारला या देशाच्या संपत्तीवरील या नवर एकच्या आक्रमकाची मात्र आठवणही राहिली नाही.

याचा परिणाम स्वातंत्र्योत्तर काळात परदेशी भांडवल गुंतवणुकीची वाढ सातत्याने झाली असल्यास नवल नाही. १९४८ साली २६० कोटी, १९६५ मध्ये ९४०, कोटी १९७२ मध्ये १७०० कोटी इतक्या झपाट्याने ही वाढ झाली आहे. अधिकृत आकडेवाडीप्रमाणे तीन हजाराहून अधिक छोट्या-मोठ्या उद्योगधंद्यात आज परदेशी भांडवल गुंतवलेले आहे.

या भांडवल गुंतवणुकीचे अनेक फायदे आहेत असे नेहमीच मोघम सांगितले जाते. देशाच्या सध्याच्या परिस्थितीत उत्पादनवाढीस मदत करून देशावरील जबाबदारीचा बोजाच ह्या कंपन्या हलका करतात असे सांगितले जाते. हे कितपत खरे आहे ? एका कोणत्याही विशिष्ट कालखंडात या कंपन्यांनी किती गुंतवणूक भारतात केली आणि त्याच्या आधारावर समृद्धीच्या गंगेचे किती पाणी आपल्या देशाकडे वळवले याची माहिती घ्यावी, अभ्यास करावा आणि त्यावरून काही बोध घ्यावा अशी कोणतीही सुबुद्धी देखील आपल्या सरकारला झालेली नाही. १९६९ साली ज्या दत्तसमितीचा अहवाल प्रसिद्ध झाला त्यांनी याबाबत सरकारवर जोरदार आरोप केला आहे. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे एकमेकांच्या सहकार्याच्या झालेल्या करारमदारांच्या अटी यादेखील नीटपणे सरकारजवळ उपलब्ध नाहीत. मग त्यांची अमलबजावणी प्रत्यक्षात कशी होते आहे हे बघण्याचे तर दूरच राहिले. आणि ही इनर्फमेशन गॅप त्वरीत भरून काढण्यासाठी दत्तसमितीने सरकारला कानपिचक्या दिल्या होत्या. अर्थातच ठार बहिरे कान असणाऱ्या सरकारच्या लेखी हे अरण्यरुदनच ठरले. रिझर्व्ह बँक, फॉरेन एक्सचेंज विभागाचे प्रमुख, या साऱ्यांनी याबाबत सरकारच्या कानीकपाळी आरडा-ओरडा केला. कंपन्यांच्या भांडवल गुंतवणूक व त्याच्या अटींची माहिती मागवली पण ह्या कंठशोषाचाही अर्थखात्याच्या मख्खपणावर कोणताच परिणाम झाला नाही.

अत्यंत निष्ठूरपणे या परदेशी कंपन्या आपल्या देशाचे कसे शोषण करीत आहेत याची सबळ पुराव्याची असंख्य उदाहरणे उपलब्ध आहेत. त्यातले हे काही मासले.

१. या विषयाचे तज्ञ प्रा. मायकेल कीडरॉन यांनी या विषयावर सुमारे चारशे पानांचे एक पुस्तक लिहिले आहे. त्यांच्या मते १९४८ ते ६१ या अवघ्या तेरा वर्षांत भांडवल गुंतवणुकीच्या तिप्पटीने अधिक नफा या कंपन्यांनी आपापल्या देशात पळवला आहे.

२. श्री. लाखानी आणि श्री. हजारी (सध्याचे रिझर्व्ह बँकेचे डेप्युटी गव्हर्नर) यांनी औषधे तयार करणाऱ्या अठ्ठयाऐंशी कंपन्यांचा अभ्यास केला. या सर्व महाराष्ट्रातील आहेत. (भारतातील बहुतेक प्रमुख औषधी कंपन्यांची मुख्य उत्पादन केंद्रे ही मुंबईत आहेत.) यामध्ये असलेल्या नऊ संपूर्ण परदेशी भांडवली कंपन्यांना अवघ्या दोन वर्षांत एवढा नक्त नफा (टॅक्स वगैरे देऊन) मिळत होता की त्यांची संपूर्ण भांडवल गुंतवणूक तेवढ्या दोन वर्षांत वसूल होत होती. आणखी पधरा परदेशी कंपन्यांना आपली सारी भांडवल गुंतवणूक वसूल करण्यास चार वर्षे पुरत होती. व्यक्तिची प्रकृती सुधारणाऱ्या या औषध कंपन्या देशाची आर्थिक प्रकृती या लूटमारीने किती झपाट्याने बिघडवीत आहेत.

३. परदेशी औषधी कंपन्यांची नफेबाजी स्पष्ट करणारे एक उदाहरण मागच्याच वर्षी इंडियन डेअरी कार्पोरेशनच्या अध्यक्षांनी सांगितले. अमूल दुग्ध प्रकल्पाबरोबर आनंदजवळ माल्ट मिल्क फॅक्टरी तयार करण्याच्या संदर्भात बोलताना त्यांनी ही माहिती दिली. त्यांच्यामते हॉर्लिक्स तयार करणाऱ्या कंपनीचा नफा बघून आम्ही अक्षरशः आश्चर्यचकित झालो. हॉर्लिक्स कंपनीने पहिल्याच वर्षी नव्वद टक्के डिव्हिडंट दिला तर तिसऱ्या वर्षी हे प्रमाण एकशे दहा टक्क्यावर गेले !

४. काही भारतीय कारखानदारांनी खासदार, मंत्री आणि वृत्तपत्रे यांना अलिकडेच दिलेल्या निवेदनात असे म्हटले आहे की कोकाकोला कंपनीचा सत्तरसालाचा फायदा ह्या त्यांच्या भांडवल गुंतवणुकीच्या पचाहत्तरपट होता. कोलगेटची झेप तर याच्याही फार पुढची आहे. त्यांनी वाटलेल्या डिव्हिडंटची रक्कमही त्यांच्या भांडवल गुंतवणुकीच्या चार हजार आठशे साठ पट इतकी मोठी होती !

ही भयानक लूट आवश्यकच नाही का ? अत्याधुनिक उपकरणे, सतत प्रगती पथावर असणारे कौशल्य, नवनवे तंत्रविज्ञान यामुळे सतत देशात येत रहाते, देशाची प्रगती होते. हे कसे नाकारता येईल ? आणि आपल्यासारख्या विकसनशील देशाला त्याची थोडी किंमत मग द्यावी लागली तर त्यात कुरकुरण्यात काय हशील ? ही सारी विचारसरणी हा भ्रमाचा भोपळा आहे.

परदेशी गुंतवणूक असलेल्या प्रकल्पाची लवकर उभारणी होत नाही याचे खापर कदाचित भारतीय पार्टनर अगर सरकारी धोरण यांच्या माथ्यावर फोडता येईल. परंतु एकदा उभारलेली परदेशी यंत्रसामुग्री चांगल्या प्रकारे काम देत नाही याची जबाबदारी कोणावर ? उत्तम अत्याधुनिक उपकरणाचा व यंत्रसामुग्रीचा हा पाश्चिमात्य दावा अनेक ठिकाणी अनेक प्रकारे खोटा पडला आहे.

भारतीय उद्योग संघटनेने १९६८ साली केलेल्या पहाणीत अनेक

उदाहरणे नमूद आहेत. अनेक ॲटोमॅटिक लेथ, ड्रीलींग मशीन इतर उपकरणेही अनेक ठिकाणी वापरण्यास अकार्यक्षम ठरली होती. आणि विशेष म्हणजे भारतीय बनावटीच्या त्याहून स्वस्त पण कार्यक्षम अशा यंत्रानी त्यांची जागा घेतली होती. काही दिवसापूर्वी बडोद्याचे इंडियन पेट्रो केमिकल्सचे काम किंवा कोचीनच्या खत कारखान्याचे काम यांच्यामध्ये आलेल्या यांत्रिक अडचणीने हे पुन्हा एकदा सिद्ध केले आहे. तेव्हा परदेशी भागीदाराची स्तुती उत्कृष्ट तंत्रविज्ञानाचे सहकार्य या कसोटीवर फारशी खरी ठरत नाही.

उत्कृष्ट प्रशासन आणि तंत्रकौशल्य याचा फायदा या कंपन्याना मिळत नाही का? हा दावा तर धक्का बसावा एवढा खोटा आहे. सागर जैन यानी याचा अभ्यास केला. २१६ कंपन्यातील शंभराहून अधिक संख्येने असलेल्या परदेशी मॅनेजराना त्यानी प्रश्नावली पाठवली. त्यापैकी अठ्ठयाऐंशी जणांची उत्तरे आली. या पैकी ऐंशी परकीय भागीदारीतील तर आठ भारतीय होते. त्यांचे निष्कर्ष डोळ्यात क्षणक्षणीत अंजन घालणारे आहेत. या मॅनेजरापैकी एक तृतियांश महाभागाचे मॅट्रीकपेक्षा अधिक शिक्षण झालेले नव्हते. फक्त ३४ टक्के जणानी पदवी घेतली होती आणि त्यातील काहीनाच पदव्युत्तर शिक्षण होते. उरलेल्यांच्यापैकी बहुतेकांनी कॉलेज शिक्षण मध्येच सोडलेले होते. आणि काही जणाच्या जवळ फक्त मामुली डिप्लोमा दाखले होते. यापैकी त्रेचाळीस टक्के लोक आपल्या धंद्यातील सर्वोच्च पद भूषवीत होते, आणि उरलेल्याच्या जागा त्यापेक्षा थोड्या खालच्या होत्या.

अत्यंत अविवेकीपणे परदेशी कंपन्याना या देशाची लूट करण्यास सरकारने सर्वतोपरी कसे सहाय्य केले याचा आलेख अनेक उदाहरणे देऊन दत्त कमिटीने स्पष्ट केला आहे. कोणताही तंत्र विज्ञानाचा फायदा अजिबात नसताना अनेक वेळा संयुक्त भागीदारी करण्यास सरकारने परवानगी दिली आहे. अशा असंख्य वस्तू दाखवता येतील की भारतातील अनेक कंपन्या त्याचे उत्पादन उत्तम प्रकारे करतात. आणि तरीही परदेशी कंपन्याना समुद्रापलिकडचे विशेष (!) ज्ञान आणून त्याच गोष्टी करावयास आपण संधी देत आहोत. बिस्किटे, खेळणी, पेने, काचसामान, लिपस्टीक, तयार कपडे, टूथपेस्ट, आईस्क्रीम अशी असंख्य उदाहरणे देता येतील.

पधरा परदेशी कंपन्यांना ट्रान्झिस्टर आणि ग्रामोफोन रेकॉर्ड करावयाची दिलेली परवानगी हे कशाचे लक्षण? दत्त कमिटीने आपल्या अहवालात दिलेल्या इशाऱ्याकडे सरकारने सातत्याने दुर्लक्ष केले आहे. गेल्या सहा महिन्यातच घड्याळे, रेझरब्लेड, बॅटरी अशा अनेक गोष्टी करावयास नव्याने परवानगी देण्यात आली आहे. ब्रिटानिया बिस्किटाचे साम्राज्य वाढवण्यासाठी त्याना सर्व त्या सवलती देण्यात येत आहेत. भारतामध्ये बिस्किटे तयार करण्याचे उत्तम तंत्र अद्याप विकसित झाले नाही असे सरकारला वाटते काय? या स्वरूपाची उदाहरणे द्यावी तेवढी थोडीच आहेत.

फॉरेन एक्सचेंजबद्दल काही कडक निर्बंध घालण्यासाठी आणि परदेशी कंपन्याच्या व्यापारावर नियंत्रण ठेवण्यासाठी जो कायदा अलिकडेच पार्लमेंटमध्ये पास झाला तोही असाच गुळमुळीत धोरणाचे निदर्शक आहे. अनेक विरोधी खासदारानी त्यामध्ये काही कडक तरतूद करण्याची सूचना करूनही सरकारने ती स्वीकारली नाही. त्यामुळे अनेक नियमाप्रमाणे हे निर्बंध देखील ते वापरणारे अधिकारी आपल्या अक्कल हुशारीने खिळखिळे बनवतील. परदेशी भांडवलाला आपल्या देशी भांडवला एवढेच मानाचे पान आवर्जून देणारा भारत हा बहुधा जगातील एकमेव दिवाळखोर देश असावा!

साठ टक्के भांडवल भागीदारीचे शेअर हे भारतीय असावेत ही सरकारची नव्या नियमातील कल्पना प्रत्यक्षात कशी फलदायी होणार? हे साठ टक्के शेअर असंख्य भागीदाराच्यात विखुरलेले असणार. आणि चाळीस टक्केच काय परंतु वीस टक्के शेअर जरी एखाद्या छोट्या गटाकडे एकवटून असतील तर तो त्या उद्योग समूहावर व्यवस्थित पकड बसवू शकतो हे गणित काही नवीन नाही.

केवळ परदेशी ट्रेडमार्क आहे म्हणून आपण वेड्यासारख्या अनेक गोष्टी खरेदी करीत असतो. त्याची किंमत वा गुणवत्ता याचा सुतराम विचार आपण करीत नाही. ही आपली प्रवृत्ती अशीच वर्धिष्णू राहावी याची जरूर ती काळजी कंपनी, घाऊक आणि किरकोळ विक्रेते घेत असतातच!

सारे परदेशी वापरण्यातच विशेष गोडी वाटणारी एक विकृत कोकाकोला संस्कृतीही यामधून जन्म घेते. तरुण पिढीही याला झपाट्याने बळी पडत आहे हे भयानक आहे.

या देशात भांडवलाची विलक्षण टंचाई असताना सामान्य माणसाच्या फाटक्या खिशातून जीवनावश्यक गरज म्हणून बाहेर येणारा पैसा परदेशी कंपन्याच्या समुद्रापलिकडच्या गलेलठ्ठ बँकात जमा व्हावा याचा विचार आपण कधी करणार आहोत? देशाच्या अर्थव्यवस्थेचे हे परकीय आधार निमूटपणे घाव घालून तोडल्याशिवाय खेड्याच्या विकासाकडे पुरवण्यासाठी अर्थव्यवस्था निर्माण करण्याचा विचार तरी कसा शक्य आहे? अर्थात त्यासाठी हे आधार घेऊन इतर बरेच काही करावे लागेलच परंतु पहिली पायरी ही असेल. भावनेच्या भरात अथवा ठोक विचारांच्या पठडीने आपण वस्तुनिष्ठ विचार करण्याचे सोडूनच दिले आहे. (अष्टौप्रहर अमेरिकेला शिव्या मोजणारा असा एक कॉम्रेड मित्र कोकाकोलावरचे प्रेम मला हे सर्व सागूनही एका घोटानेही कमी करीत नाही!) म्हणूनच स्वदेशीची चळवळ पुन्हा एकदा जोरदारपणे हातात घेण्याची वेळ आली आहे. माझ्या खिशातून गेलेला पैसा न पैसा ज्या गोष्टीमुळे देशात राहात नाही त्या गोष्टीसाठी मी पैसा खर्चणारच नाही हा असहकार आपण पुकारला तर काय होईल? परदेशी रेझर ब्लेड न वापरल्याने आपल्या दाढीचे खुट वाढतील? कोलगेट न वापरल्याने तोडाला दुर्गंधी सुटेल? लिपस्टिक न लावल्याने सौंदर्यात उणीव पडेल? की कोकाकोला न प्याल्याने उत्साह उणा पडेल? हे सारे होणार असले तरीही हा असहकार पुकारावयास हवा पण आज तर सुदैवाने तीही स्थिती नाही. ग्राहक म्हणून आपण या मालावर बहिष्कार टाकू शकतो. दुकानदाराच्यापुढे निदर्शने करून त्यांना माल न ठेवण्यास सांगू शकतो. या साऱ्या मागच्या अर्थशास्त्रीय विचाराचा प्रसार करू शकतो. अंधारात न समजणाऱ्या शत्रूविरुद्ध लढाईपेक्षाही हा संघर्ष अधिक नेमका आणि म्हणून अधिक फलदायी ठरेल. □

[लेखातील माहिती ९ जूनच्या Illustrated Weekly च्या अंकात 'The last called business' या श्री. के. सी. खन्नाच्या लेखाच्या आधारे]

# साप्ताहिक भविष्य

## कृष्ण माईणकर

### दि. २० जुलै ७४ ते २६ जुलै ७४

### केंद्र-राज्य शासनात भ्रष्टाचाराचे प्रतिध्वनी

या आठवड्यात राजकारणातील आणि शासनातील काही व्यक्तींचे भ्रष्टाचार उघड होणार असून त्याचे प्रत्यक्षाप्रत्यक्ष साद-पडसाद निरनिराळ्या राज्यात व केंद्र शासनात उमटणार आहेत. रवी, मंगळ, केतू शनी व राहू हे ग्रह बराच पराक्रम गाजवणार आहेत. महाराष्ट्र, मध्यप्रदेश, आंध्र, दिल्ली, उत्तर प्रदेश, काश्मीर, केरळ, प. बंगाल, दिल्लीचे केंद्र शासन अशा वेधाने हे गौप्यस्फोटाचे ग्रहण फिरणार आहे. केंद्र सरकारने वेतन, नफा इत्यादी संबंधात नुकतेच जे निर्णय घेतले आहेत ते चलन फुगवटचाला आळा घालण्याकरता असले तरी यातूनच काही संबंधात अशा दुखावलेल्या व्यक्ती काळ्या पैशाचा उगम कसा व कुठे आहे ते सहज उघड करतील.

**मेष : नोकरीत स्थित्यंतर**

रवी सुखस्थानी कर्क राशीत, मंगळ पंचमस्थानी सिंह राशीत, हर्शल तुळेत आणि शनी मिथून राशीत, अशी एकंदर ग्रहस्थिती तुम्हाला या आठवड्यात आहे. सुखस्थानातील रवी तुम्हाला हवे ते सुख भोगू देणार नाही. पण इतर ग्रहमान मात्र तुम्हाला खूपच अनुकूल आहेत. रोज गुरुचरित्र वाचा म्हणजे मन शांत राहील. उद्योग व्यवसाय, व्यापार, नव्या कल्पना वा उद्योगाच्या नव्या योजना आता वेग घेऊ लागतील. रेंगाळलेल्या कामांना गती येईल. आता थांबू नका. पुढे जा असाच तुम्हाला ग्रहांचा आदेश आहे. नोकरीत घडणारे अनुकूल स्थित्यंतर आगामी काळाची नांदीच ठरेल. **महिलांस** : तुम्ही पदवीधर असून नोकरी करीत असाल तर काळ शुभ आहे.

**वृषभ : धाडसाने यश**

या आठवड्यात दि. २० ते २४ या दिवसांची कटाक्षाने नोंद घ्या. कर्क राशीतील रवी तुम्ही सध्या काम करीत असलेल्या क्षेत्रात तुमचे फार मोठे महत्त्व वाढवणार असून तुमचे औद्योगिक क्षेत्र विस्तारण्याची संधी तुम्हाला मिळणार आहे. कपड्याच्या स्टॉकसह एखादे नवे दुकान तुम्ही खरेदी करू शकाल. तुम्ही तसेच भाग्यवान असाल तर बंगल्यात राहाण्याची तुमची इच्छा पुरी होईल. दूरवर असलेले माता-पिता तुम्हाला भेटतील. मनात योजलेला प्रवास पुरा होईल. नवीनच लेखन करीत असलेल्या लेखकांना अचानक पहिली प्रसिद्धी मिळेल. **महिलांस** : मिळणारा पैसा जपून वापरा. धार्मिक कृत्यात मान मिळेल.

**मिथून : जमीन खरेदीचा योग**

दुसरा रवी तुमच्या कौटुंबिक जीवनात काही वादळे निर्माण करणार आहे. वादळे म्हणजे वाईटच असतात असे समजू नका. राहू व रवी यांचा त्रिकोण योग काही मांगल्येही घडवून आणील. आत्मसाक्षात्कारासारख्या घटना अशाच वेळी घडत असतात. मंगळ तिसरा सिंह राशीत आहे ही एकच घटना तुमच्या बाबतीत परमभाग्यकारक ठरावी. बाराव्या शनीची अथवा त्याच्या साडेसातीची तुम्हाला कोणतीच फिकीर करण्याचे कारण नाही. यावेळी तुम्हाला खरे वरदान लाभले आहे ते मंगळाचे. जमीन खरेदीची पुष्कळ दिवसाची तुमची इच्छा यावेळी पुरी होईल. आर्थिक स्थितीदेखील चांगलीच सुधारेल. **महिलांस** : नोकरीत बढती–बदलीचा योग. घरातल्या घरात एखादा लघुउद्योग सुरू करा.

**कर्क : राजकीय सन्मान**

तुमच्या चंद्राबरोबर रवीचे सहकार्य लाभल्यापासूनच खरे म्हणजे तुमचे सारे तंत्र व मंत्र बदलून गेले आहे. तुम्ही जर राजकारणात असाल तर तुमचे राजकीय जीवन उंचावणार आहे. एखादे अत्युच्च पद तुम्हाला लाभणार आहे. जर तुम्ही राजकारणात नव्याने पदार्पण करणार असाल तर रविवार ते बुधवार हे दिवस उत्तम आहेत. नोकरीत तसे वाईट नाही. पण कोणत्याही परिस्थितीत वरिष्ठांबरोबर वा मालकाबरोबर संघर्ष येऊ देऊ नका. तेथे माघार घेणे शहाणपणाचेच ठरेल. ही नोकरी जर तुम्हाला आवडत नसली तर दुसरी बघण्याचा तुम्हाला मोह होईल. म्हणून तो मोह टाळा. आर्थिक स्थिती सुधारेल. **महिलांस** : तुमची सार्वजनिक कार्याची हौस पुरी होईल. नोकरी नसल्यास ती मिळेल.

**सिंह : सामर्थ्य वाढेल**

खरे म्हणजे रवी हा तुमच्या राशीचा उद्धारकर्ता आहे. तो लाभस्थानी मिथून राशीत आल्यावर तुमचे सारे आर्थिक जीवन सहज बदलून जायला हवे होते. तसे ते जाईलही. पण शनीची वक्र दृष्टी त्यावर असल्यामुळे अर्थलाभात अडथळे निर्माण होतात. पण ही उणीव मंगळाने भरून काढायची ठरवलेले दिसते. मंगळ राशीत म्हणजे दैवी शक्तीचा प्रचंड साक्षात्कार होय. जे मनात आणाल ते साध्य कराल. इच्छापूर्ती, महत्त्वाकांक्षेला व्यापक क्षेत्र, प्रगतीची भरारी वगैरे तुम्हाला वश होणार आहे. सोमवार ते गुरुवार शुभ दिवस. **महिलांस** : एकटा मंगळ विरोधकांचे सारे बेत उधळून लावील. नोकरीत वरिष्ठांच्या कसोटीला तुम्ही उतराल.

**कन्या : खर्चाला नव्या वाटा**

रवी-शनी युती तुमचे आर्थिक स्थैर्य उभारून देत आहे. कर्क राशीतील मंगळा-

नेही तुम्हाला त्या दृष्टीने मदतच केली. पण आता मंगळ तुमच्यावर रुष्ट झाला आहे. तो व्ययस्थानी आल्यापासूनच तुमची आवक मदावली आहे. आणखी काही काळ तरी तो प्रामुख्याने हेच कार्य करीत रहाणार आहे. व्यापार, नवे उद्योग, नवे आर्थिक करार, पैशाची देवाण घेवाण सध्या अजिबात टाळणे हिताचे ठरेल. तब्येत दुरुस्तीसाठी अचानक खर्च उद्भवेल. मात्र कोठेही प्रतिष्ठेला तडा जाणार नाही. जीव साभाळून काम करा. सर्दी, ताप यापासून तब्येतीला किरकोळ त्रास. **महिलांस :** भाडण, सताप टाळा. जड कामे करू नका. गरोदर स्त्रियानी अधिक काळजी घ्यावी.

### तूळ : लॉटरीत धनलाभ

अंतरिक्षातील रवी या ग्रहाच्या राजाने तुमचे भाग्यस्थान प्रसन्न करण्याचे ठरवले आहे, तर मगळ नुकताच लाभस्थानी आला आहे. माणसाचे भाग्य जन्मस्थ ग्रह या बऱ्या-वाईट सामर्थ्यावर शेवटी घडत असते. तुम्हाला मूळचा मगळ जर अनुकूल असेल तर यावेळी तुम्ही लॉटरीच्या-रेसच्या अगर इतर अकल्पित पैशाच्या लाभाने 'श्रीमंत' होणार आहात. एरवी देखील उद्योग धंद्याला बरकत प्राप्त होऊन तुम्हाला पैसा मिळणार आहे. तुमच्या राहणीमानात बदल होणार आहे. शनिवार ते बुधवार कोणत्याही नव्या कामाची सुरुवात करायला उत्तम आहेत. चालू नोकरीत बरे दिवस येण्याची सुरुवात याच आठवड्यापासून होणार आहे. **महिलांस :** तुमच्या मनोकामना पुऱ्या करणारा असाच हा सप्ताह आहे.

### वृश्चिक : नोकरीत उच्चस्थान

सातवा केतू तुमच्या कौटुंबिक जीवनात अधून मधून वादळे निर्माण करीत असला तरी मगळाच्या जबरदस्त सामर्थ्यापुढे तो काहीही वाकडे करू शकणार नाही. रवी शनी आठवे आहेत. ते पित्त, रक्तदाब वगैरे जुन्या आजाराला आमंत्रण देऊ पाहातील एवढेच. पण त्याची देखील तुम्ही भीती बाळगण्याचे कारण नाही. हा आठवडा सर्वांत जास्त अनुकूल आहे. तो नोकरदारांना, जमीन महसुलखाते, रासायनिक खतांचे कारखाने, प्लॅस्टिकचे उद्योग, शेती व्यवसायात गुतलेले नोकर इत्यादी क्षेत्रातील नोकराना अनेक दिवस रेंगाळत राहिलेल्या पगारवाढीचा फायदा मिळेल. वरिष्ठ जागेवरच्या 'ऑफिसरांना उच्चस्थान लाभणार आहे. तब्बेतीची व खर्चाची काळजी घ्या. **महिलांस :** जमीन मालकाना चांगले दिवस आहेत. रक्तदाब वाढण्यासारखे मात्र काही करू नका.

### धनू : मंगळाची कृपा

आठव्या मगळाने तुमचे शारिरिक जीवन जवळ जवळ खिळखिळे करून टाकले होते. तुमची मानसिक अवस्था दारुण करून तुमचे मन खचून टाकले होते. पण परमेश्वरी कृपेने व गुरू महाराजानी या सगळ्या त्रासातून तारले आहे. आता हाच गुरू तुमच्यावर कृपा करणार आहे. तुमचे भाग्य उजळून टाकणार आहे. तुमच्या जीवनात प्रसन्नता आणण्याचा प्रयत्न करणार आहे. तुमच्या मनातील भीती, घर करून राहिलेली निराशा सारे सारे आता इतिहास जमा होणार आहे. तुम्ही लेखक, कवी वा तत्त्वज्ञानी असाल तर तुमची प्रतिभा जागी होईल. तुमच्या हातून चागले लेखन होईल. अपेक्षित पत्रे येतील. **महिलांस :** पतिराजाची बोलणी तुम्हाला आता खावी लागणार नाहीत. आनद मिळेल.

### मकर : थोडी सुधारणा

तुम्हाला खरी व्यथा आहे ती ससारसुख मनासारखे मिळत नाही म्हणून. पण या आठवड्यापासून त्यात सुधारणा होऊ लागेल. रवी-शनी शत्रुस्थानी बसून तुमच्या विरोधकांची व शत्रूची चागली कबक्ती करीत आहेत. सोमवारनतर एकदर परिस्थिती सुधारू लागेल. नोकरीतील पेचप्रसग सुटेल. वरिष्ठांचा गैरसमज दूर होईल. तुमचा कामाचा ताणदेखील कमी होईल. बेकारांना थोडेफार काम मिळेल. इजिनियरिंग पदवीधराना नोकरी मिळेल. औषधे, पाण्याचे पंप, तेलबिया यांचा व्यापार करणाऱ्याना चागले दिवस येतील. आर्थिक स्थिती साधारण बरी. **महिलांस :** दुसऱ्याच्या मनाप्रमाणे वागा. मन आनदी राहील. नोकरीत यश.

### कुंभ : मोठेपण मिळेल

रवी-शनीची अजून तुमच्यावर कृपा आहेच. मगळ नुकताच सिंह राशीत आला आहे. तो तुमचे मानसिक बल वाढवील. पण त्याच बरोबर तुमच्या ससारात काही उणीव निर्माण करील, समाधान असे वाटणार नाही. मुले थोडीफार निष्काळजीपणाने वागतील. दूरच्या ठिकाणचे नातेवाईक तुमचा आर्थिक भार वाढवतील. असे जरी असले तरी सार्वजनिक कार्यात, प्रामुख्याने राजकारणात तुमची मान उचावणार आहे. तुमची प्रतिष्ठा वाढणार आहे. आर्थिकदृष्ट्या तसे वाईट नाही. पण दीर्घ मुदतीचे करार करू नका. कर्ज काढण्याचे टाळा. शक्यतो मित्राकडून पैसे घेऊ नका. परदेश प्रवासाचा बेत अकस्मात ठरेल. लेखनात प्रगती होईल. **महिलांस :** गुरू उत्तम आहे. कुमारिकाचे विवाह थाटामाटात पार पडतील.

### मीन : नोकरी कायम होईल

गुरु बारावा आहे याचा तुम्ही उगीच धसका घेतला आहे. खरे म्हणजे तो तुमच्या राशीचा स्वामी आहे. तो जरी बारावा असला तरी तो तुमचे तसे वाईट करणार नाही. पण या आठवड्यात तुमच्या यशाची-विजयाची सारी सूत्रे आहेत मगळाच्या हातात. तुम्ही नोकरीत युनियन पब्लिक सर्व्हिस कमिशन मार्फत, अगर राज्यसघटनेमार्फत जर प्रयत्न करणार असाल तर त्यात तुम्हाला मोठेच यश मिळणार आहे. तुमचे सिलेक्शन अगदी हमखास होईल. चालू नोकरीतदेखील बढती, प्रमोशनचा योग आहे. या वेळी तुम्ही कोणताही नवा उद्योग सुरू करा. तुम्हाला आर्थिक व तात्रिक सहकार्य मिळेल. एका अत्युच्च श्रीमत व्यक्तीचा तुम्हाला आशीर्वाद मिळेल. **महिलांस :** शेजाऱ्याबरोबर भाडण टाळा. नोकरीतील त्रास कमी होईल. □ □


फुकट फुकट फुकट

## पांढरे डाग

गौतम औषधाने जवळजवळ ३० वर्षे पाढरे डागाचे रोग्याना ६ दिवसात फायदा देऊन प्रसिद्धी मिळविली आहे. एक पॉकेट औषध फुकट मागवून फायदा मिळवा.

**गौतम आयुर्वेद भवन (SD-2)**

# ग्रामायन

## २७।२८ जुलैला होणाऱ्या ग्रामायन बैठकीसमोर विचारार्थ आलेले आणखी एक टिपण . . .

१ : पूर्वी हरित क्रांतीविषयी फार मोठ्या अपेक्षा आपण बाळगून होतो. पण आता त्याविषयी बराच भ्रमनिरास झाला आहे. शेतीचे तंत्र सुधारले, मोठ्या भांडवली खर्चाच्या सरकारी योजनांतून वीज व पाणी पुरवठा वाढला, सहकारी संस्थांतर्फे स्वस्त कर्जपुरवठा केला गेला आणि भांडवली गुंतवणूक करून सरकारने खत कारखाने उभारले; तरी पण विकासाची गती मंदच राहिली. खेड्यातील गरिबी व बेकारी कमी न होता उलट वाढली आहे असे दृश्य आज आपणास दिसते आहे. हा अनुभव लक्षात घेऊन आणि जुने दोष टाळून आपण यापुढे ग्रामीण उन्नतीच्या प्रयत्नाची आखणी कशी करू शकतो याविषयी काही विचार मी आपणापुढे मांडणार आहे.

२ : गेल्या २५ वर्षांच्या आर्थिक उन्नतीच्या प्रयत्नात दोन मोठे दोष प्रकर्षाने आढळतात. ते म्हणजे—

(अ) ग्रामीण पातळीवर भांडवल उभारणीकडे दुर्लक्ष.

(ब) सर्वसाधारण जनतेच्या गरजा ज्यातून पूर्ण होतील अशा योजनांकडे दुर्लक्ष. या दोन्ही दोषांची जाणीव जेथे दिसते तेथे अंमलबजावणी अत्यंत ढिली राहिली आहे असे अनुभवास येते.

या मूलभूत दोषांतून अनेक परिणाम उद्‌भवतात.

अ : जेव्हा उत्पादन वाढ मोठ्या भांडवली खर्चाच्या योजनांतून होते तेव्हा उत्पादनवाढीचे केंद्रीकरण होणे स्वाभाविकच असते. आर्थिक विकासातून होणाऱ्या फायद्याचा जास्तीत जास्त वाटा आपल्याकडे ओढून घेण्याचा प्रयत्न साहजिकच यातून उद्‌भवतो.

आ : यामुळे ग्रामीण क्षेत्रातील नेतृत्वाची प्रमुख कसोटी—जास्तीत जास्त भांडवली गुंतवणूक आपल्या भागात कशी होते याविषयी जागरुक राहणे आणि सरकारी पैसा आपल्या भागाकडे जास्तीत जास्त ओढून घेणे—ही होय. यातून राजकारण व गटबाजी होणे क्रमप्राप्त आहे व त्याचा परिणाम म्हणजेच भ्रष्टाचार. असे नेतृत्व सरकारी साधनाची उधळपट्टी करणार. 'विशिष्ट गटां'साठीच कल्याणकारी योजना राबवणार. यातून दलित व दुबळ्या गटाच्या पदरात काहीच पडत नाही.

३ : हे दोष यापुढे टाळावयाचे असतील तर खालील गोष्टींवर लक्ष देणे आवश्यक आहे.

१ : उत्पादन वाढ व रोजगार निर्मिती याची सांगड घालणे जरुरी आहे.

२ : किमान वेतन व अन्नवस्त्रादी प्राथमिक गरजेच्या वस्तूंच्या भावाचे प्रमाण स्थिर राखणे.

३ : ग्रामीण क्षेत्रात भांडवलनिर्मिती होण्याचे प्रयत्न करणे.

४ : रोजगार हमी व किमान वेतन या बाबतीत धोरणांची अंमलबजावणी होते किंवा नाही याबद्दल जागरुक राहणारे ग्रामीण नेतृत्व उभे करणे हा ग्रामीण क्षेत्राचे आर्थिक उन्नतीचा महत्त्वाचा व पहिला टप्पा राहील. याबाबतीत विधायक भूमिकेने काम करावयाचे तर केवळ रोजगार द्या अशी मागणी शासनाकडे करून चालणार नाही. तर रोजगार कुठे मिळू शकेल, तो मिळण्यात काय अडचणी आहेत, हे समजून त्या दूर करण्याकरिता संघटन उभे करावे लागेल, या संघटनेचे स्वरूप व कार्यपद्धती काय असावी हे अनुभवातूनच स्पष्ट होईल, हा चर्चेचा एक महत्त्वाचा मुद्दा होऊ शकेल.

५ : रोजगार वाढविण्यासाठी जंगल विकास, दुग्ध व्यवसाय, सार्वजनिक बांधकाम आदि अनेक क्षेत्रांचा विचार करावयास हवा. तसे करताना काही वेळी रोजगार रहाण्याच्या गावापासून दूरवर उपलब्ध असेल तर कामकऱ्यांची वाहतूक, तात्पुरती रहाण्याची व्यवस्था यांची तरतूद कशी करायची हे ही ठरवावे लागेल. रोजगार व किमान वेतनाच्या हक्का विषयी जागरूक असलेल्या संघटनानी कौशल्य, कार्यक्षमतेची वाढ व नवीन क्षेत्रात शिरण्याकरिता आवश्यक प्रशिक्षण याकडे पुरेसे लक्ष दिले नाही तर त्यांच्या कामाची गती कुंठीत होण्याची भीती आहे. ग्रामोद्योगासाठी कर्ज पुरवठा, विक्रय याकरिता योग्य संघटना उभारणे हे ही त्यांचे कार्य राहील.

६ : किमान वेतन व अन्नवस्त्रादी सर्वसाधारण गरजेच्या वस्तू यांच्या भावाचे प्रमाण स्थिर राखण्याची पहिली पायरी म्हणजे ग्रेन बँक स्थापणे; त्यासाठी भांडवलाची उभारणी स्थानिक पातळीवर करण्याबद्दल आग्रह धरावा लागेल. व अन्न धान्य उत्पादन वाढीकडे लक्ष पुरवावे लागेल त्यामध्ये अल्प-भू-धारक शेतकऱ्यांना सहभागी करून घेता येईल. गावातील पडिक जमीन व दुपिकी जमीन (ज्याचा वापर मालक करीत नाहीत ती) अन्नधान्य उत्पादनासाठी लागवडीखाली आणणे वगैरे अशा प्रकारचे कार्यक्रम श्रमिक संघटनांनी घ्यावेत. गावातील गरजे इतका भरणा धान्य कोठारात झाला नाही तर सधन शेतकऱ्यावर शेतमाल विक्री करिता बाहेर जाणार नाही असा नैतिक दबाव आणावा लागेल. खते, वीज यासारख्या वस्तू प्रथमतः अन्नधान्य उत्पादनासाठी वापरल्या जातील हे पहावयास हवे. अशा प्रकारचे वातावरण संघटित प्रयत्नांतून उभे करावे लागेल. गांधी प्रणीत आर्थिक (ग्राम) स्वावलंबनाचा, सुधारलेल्या शेतीच्या तंत्राच्या संदर्भात नवीन अविष्कार यातून होईल.

७ शेतमाल व औद्योगिकरणातून उत्पन्न झालेली शेतीच्या विकासासाठी लागणारी साधने (खते, वीज, पंप-मोटर, ट्रक) यांच्या किंमतीत योग्य प्रमाण राखण्याकरिता प्रयत्न करावे लागतील. या वस्तू व सेवा यांचा वापर ग्रामयोजनेप्रमाणे व्हावयास हवा. अशी ग्रामयोजना सर्वांच्या सहकार्याने तयार व्हावयास हवी. तसे न झाल्यास, या वस्तू व सेवा केवळ स्वस्त आहेत म्हणून मूठभर लोक स्वत:साठीच वापरतील व सत्ता व धन याचे अधिक केंद्रिकरण मात्र होईल.

८ : ग्रामीण पातळीवर भांडवल निर्मिती : श्रमिकांच्या संघटनांनी रोजगार निर्मितीची मागणी करताना त्यातून भांडवल निर्मिती कशी होईल याचा विचार करावयास हवा. सामुहिक प्रयत्नाने जंगल व गवताच्या जमिनीची जोपासना व वाढ, पडित-दुपिकी जमिनीचा उपयोग वगैरे कार्यक्रम हाती घ्यावे लागतील. शिवाय या कार्यक्रमाकरिता लागणारे भांडवल स्थानिक पातळीवर अधिकाधिक उभे करण्याकडे लक्ष द्यावे लागेल. धान्य कोठाराच्या व्यवहारातील नफा, सहकारी पद्धतीने केलेल्या व्यापारातील नफा, फुकट जाणाऱ्या जल संपत्तीच्या वापरातून झालेले उत्पादन, सधनांवर बसविलेले कर यातून भांडवल उभे करता येईल. त्याच बरोबर व त्या आधाराने रोजगार हमीच्या योजना अधिक फलदायी स्वरुपाच्या करण्याचा प्रयत्न करता येईल.

—के. आर. दाते, मुंबई

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यानी साप्ताहिक मुद्रण १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर